चरित्र - ४०        सन १[illegible]८

लेखक - श्रीकृष्ण शास्त्री
आठल्ये.

पु. नांव - श्रीमच्छंकराचार्य
चरित्र.

( श्री प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स  ठाणे )

चरित्र

## बृहद्रूपावलिः ।

किंमत फक्त ४ आणे ट. ०॥ आणा.

श्रीमच्छंकराचार्यप्रणीता

## शतश्लोकी सटीका ।

आनंदगिरिकृतटीकासमेता. किं. रु. १ ट. २ आणे.

## उपदेशसाहस्त्री सटीका ।

रामतीर्थस्वामिकृतटीकासमेता. किं. रु. ३ ट. ४ आणे.
रेशमी पुठ्यांची किं. रु. ३॥ ट. ४ आणे.

## सिद्धान्तकौमुदी स्वरवैदिकीसमेता ।

अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिङ्गानुशासन, शिक्षा व अष्टाध्यायीसूत्रांचा वर्णानुक्रमकोश, सूत्राङ्कसहित, अक्षर मोटें, वैय्याकरणांनीं शुद्ध केलेली. कपड्यानें बांधलेलें बुक्. किं. २॥ रु. ट. ६ आणे. द्वितीयावृत्ति.

## सुभाषितरत्नभाण्डागारम् ।

द्वितीयावृत्ति. किं. रु. ३॥ ट. ६ आणे.

**विवाहविधिचंद्रिका.**— ह्मणजे ऋग्वेदआश्वलायन शाखीय विवाहप्रयोग, मंत्र, मंत्रभाष्य आणि मराठीभाषांतर ह्यांसहित. किं. १२ आणे. ट. १ आणा.

# ऋग्वेदीब्रह्मकर्म ।

जें २६ विषयांचें होतें; त्याचीच सुधारलेली द्वितीयावृत्ति विषय ४१ आहेत.

उत्तम शुद्ध करून, मोठ्या टाइपांनीं स्वरांसहित, जाड कागदावर रायल द्वादशपत्री सांच्यानें छापलेलें. विषय— १ प्रातःस्मरणम्. २ स्नान विधिः ३ उष्णोदकस्नानविधिः ४ भस्मधारणविधिः ५ प्रातःसंध्या. ६ आसनविधिः ७ लघुन्यासः ८ देवपूजा. ९ पुरुषसूक्तम्. १० श्रीसूक्तम्. ११ ग० अथर्वशीर्ष. १२ रुद्रः १३ देवे. १४ सौरसूक्तम्. १५ तृचाकल्पविधिः १६ द्वादशनमस्काराः १७ माध्यान्हसंध्या. १८ ब्रह्मयज्ञः १९ वैश्वदेवः २० बलीहरणम्. २१ त्रिसुपर्णम्. २२ सायंसंध्या. २३ यज्ञोपवीतधारणमंत्रः २४ श्राद्धसंकल्पः २५ दर्शश्राद्धम्. २६ उत्सर्जनप्रयोगः २७ स्नानवि० २८ ऋषिपूजनम्. २९ तर्पणम्. ३० उपाकर्मप्रयोगः ३१ सभादीपदानविधिः ३२ नूतन ब्र० उपाकर्म. ३३ पर्जन्यसूक्तानि. ३४ शांतिपाठः ३५ मन्युसूक्तम्. ३६ पवमानपंचसूक्तानि, तत्र पंच सू. ऋ. कथनम्. ३७ पुरुषसूक्तम्. ३८ पवमानसूक्तम् ३९ नतमंहो इति सू. ४० इतिवा इति सू. ४१ वामनसूक्तम् । किंमत फक्त १। रु. ट. ३ आ. रेशमी बांधीव प्रतीस १॥ रु. ट. ३ आणे.

**ऋग्वेदी श्रावणी.**— आकारवगैरे सदरप्रमाणें किंमत ८ आ. ट. ०॥· आणा.

**पवमानपंचसूक्तानि.**— आकार सदर प्र० किं. ८ आ. ट. १ आणा.

**रुद्रः**— आकार सदर प्र० किं. २ आ. ट. ०॥· आणा.

Moro Lakshman Parachure
17th November 1889

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य

# श्रीमच्छंकराचार्यचरित्र.

(माधवादिविरचित शंकरविजयांचे आधारानें.)

श्रीकृष्ण [illegible] आठल्ये

ह्यानीं रचिलें.

त

जनार्दन महादेव [illegible]

ह्यांनीं

मुंबईंत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

भगवद्गीता.

---

किंमत १२ आणे.

---

शके १८११ सन १८८९ इसवी.

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून, पर
भाषेंत भाषांतर करणें इत्यादि, ह्या पुस्तकासंबंधी सर्व
हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेवले आहेत. )

इदं

# पुस्तकं

कैलासवासिभ्यः।

नामदार रावसाहेब तथा

कम्पॅनियन् आफ् धि स्टार् आफ्

इण्डिया इत्युपपदधारिभ्यः। रायल्एशि-

ऍटिक्सोसायटीसभिधाया विद्वत्पर्षदः सभास-

द्भ्यः। तस्या एव पर्षदो मुम्बापुरस्थशाखाउपा-

ध्यक्षेभ्यः। मुम्बापुरगतयुनिव्हर्सिटीनामकसर्ववि-

द्योपचयविचारमुख्यस्थानस्थ डीनपदवीधारिभ्यः।

मुम्बापुर्यां हायकोर्टाभिधन्यायाधिष्ठानगतगव्हर्नमेंट्

वकीलसंज्ञकवादिप्रतिवाद्यन्यतरपक्षसमर्थना-

धिकारिभ्यः। मण्डलिको पाह्न ना-

रायणसूनुविश्वनाथशर्मभ्यः।

ग्रंथकर्त्रा तेषां वैदिकधर्मैक-

निष्ठतां विद्याभिरुचिं च

विज्ञाय सप्रेमपुरःसरं

समर्पितम्

---

हें पुस्तक, रावसाहेब विद्यमान असतां आह्मीं त्यांस समर्पण केलें; परंतु छापून होईपर्यंत ते ईशेच्छेनें; ह्या लोकीं राहिले नाहींत; ह्याबद्दल फार दुःख वाटतें.

॥ श्रीशंकरः प्रसन्नोस्तु ॥

# ॥ प्रस्तावना ॥

---

पयोऽधिवित्ररीसुनिःसृतसुधाझरीमाधुरी ।
धुरीणभणिताधरीकृतफणाधराधीशितुः ॥
शिवंकरसुशंकराभिधजगद्गुरोः प्रायशो ।
यशो हृदयशोधकं कलयितुं समीहामहे ॥

शंकरविजय.

ज्यांनीं या भरतखण्डांत—वेदबाह्य जे जैनधर्म आदिकरून अनेक धर्मी लोक त्यांनीं आपले धर्म स्थापन केल्यामुळें सर्वत्र दबाह्य कर्म सुरू होऊन वैदिक धर्माचा ऱ्हास झाला—अशा ळीं या भूमीवर अवतीर्ण होऊन संपूर्ण आर्य भूमीचा उद्धार केला; व वैदिक मत स्थापित केलें; आणि सर्वथा द्वैतमताचें खंडन करून अद्वैत मत स्थापिलें; असे जे सत्पुरुष, व सर्व जगताचे गुरु **श्रीमच्छंकराचार्य** यांचें **चरित्र** सर्वांस माहित असणें अत्यंत अवश्य आहे; कारण, त्यांचे जगतावर केवढे उपकार आहेत, हें वर निर्दिष्ट केलेंच आहे; त्यांत विशेषेंकरून ज्यांचीं कर्में वेदावरून चालतात, त्यांचेवर तर फारच उपकार समजले पाहिजेत, जो तसें समजत नसेल त्यासारखा कृतघ्न कोणीच नाहीं; कारण या देशांत नानाप्रकारचीं मतें होऊन ज्याला वाटेल तो पंथ त्यानें स्वीकारावा. आमच्या वैदिक धर्माचें सर्वस्व व आदिकारण जो वेद तो मिथ्या आहे, असें ह्मणणारे जे चार्वाकप्रभृति नास्तिक त्यांचें प्राबल्य ज्यास्त झालें; तेव्हां वैदिकधर्म अगदीं नष्ट झाला ह्मटला तरी चालेल. अशा वेळीं वैदिककर्में नष्ट झाल्यामुळें यज्ञादिककर्मांस तर तिलांजलीच मिळाला, परंतु नित्यकर्मेंही नष्टप्राय झालीं तेव्हां—

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

या भगवद्वाक्याप्रमाणें, जेव्हां साधूंचा छल होऊन दुष्टांचें प्राबल्य होतें अशा वेळीं सहजच धर्म नष्ट होतो; तेव्हां साधूंच्या रक्षणाकरितां व धर्माच्या स्थापनेकरितां **भगवान्** अवतार घेतात. त्याप्रमाणें वर निर्दिष्ट असा जेव्हां धर्मलोप झाला, तेव्हां **श्रीशंकरांनीं** या भूमीवर **शंकराचार्यरूपानें** अवतार घेऊन नास्तिकमतांचा नाश करून, वैदिकधर्माची स्थापना केली. हा जो **शंकरांनीं** अवतार घेतला, त्याविषयीं **कूर्मपुराणांत व्यासांनीं** अगोदरच वर्णन केलें आहे; तें असें–

कलौ रुद्रो महादेवो लोकानामीश्वरः परः ।
करिष्यत्यवतारं स्वं शंकरो नीललोहितः ॥
श्रौतस्मार्तप्रतिष्ठार्थं भक्तानां हितकाम्यया ।
उपदेक्ष्यति तत् ज्ञानं शिष्याणां ब्रह्मसंमितम् ॥
सर्ववेदांतसारं च धर्मान्वेदनिदर्शनान् ।

**अर्थ**—श्रुतिस्मृतिप्रतिपादित धर्मांची प्रतिष्ठा करण्याकरितां, व तेणेंकरून भक्तांचें हित होण्याकरितां, परमेश्वर जो **महादेव** तो कलियुगांत स्वतः अवतार धारण करील; आणि ज्यांत ब्रह्मस्वरूपाचा विचार सांगितला आहे, असें तें वेदांतांतील सारभूत ज्ञान, शिष्यांस उपदेशील. यावरून हा अवतार सप्रमाण आहे, ह्मणून **शंकराचार्य** प्राकृतपुरुष होते असें ह्मणणारांनीं उगाच धाडस करूं नये.

आतां हा जो **शंकरांनीं** अवतार घेतला, त्याचें सर्व वर्णन त्यांचे शिष्यांनीं ग्रंथरूपानें लिहिलें आहे; तें जर ते न लिहिते तर आज आह्मांला अशा पुरुषाचें चरित्र समजण्यास कांहीं आधार नव्हता, कारण भिन्नमतवाद्यांनीं त्यांचें खरोखर स्वरूप न दाखवितां

कांहीं तरी वर्णन केलें असतें. आतां विरुद्धलोक खऱ्या गोष्टीचेंही कसें वर्णन करितात, हें सर्वांस माहित आहे; करितां उगाच त्या लेखाकडे मी वळत नाहीं. एकंदरींत त्या ग्रंथकारांचे आमच्यावर मोठे उपकार आहेत; परंतु ते ग्रंथ मूळचे संस्कृतांत असल्यामुळें, व संस्कृत भाषेचें ज्ञान थोडक्याच लोकांस असल्यामुळें आबालवृद्धांस तें समजणें फार कठीण आहे, करितां असें पवित्र **चरित्र** सर्वांस समजावें; असें मनांत आणून माझ्या बुद्धिशक्तीप्रमाणें मीं मूळ ग्रंथ धरून त्यांतील कथाभाग न सोडतां ह्या चरित्रपुस्तकाची रचना केली आहे.

**आचार्यांचे** चरित्राबद्दल एकंदर चार ग्रंथ आढळतात; त्यांत पहिला **आनंदगिरींनीं** केलेला **शंकरविजय,** यांत चवऱ्याहत्तर प्रकरणें आहेत. हा कलकत्त्यास शके १७८९ दांत **श्रीनवद्वीपगोस्वामी आणि श्रीजयनारायण तर्कपंचाननयांनीं** शोधून छापला आहे. दुसरा **विद्यारण्यकृत,** ज्यास **माधव** असेंहि ह्मणतात; त्यांनीं केलेला **शंकरविजय** आहे, त्यांत सोळा सर्ग आहेत. यांत **आचार्यांच्या** जन्मापासून अवतारसमाप्तीपर्यंत चांगली माहिती दिली आहे. हाच मूळ आधार धरून हें चरित्र लिहिलें आहे. हा ही मुंबईत छापला आहे. तिसरा **चिद्विलासस्वामींनीं** केलेला **शंकरविजयविलास,** ह्मणून आहे; त्यांत बत्तीस प्रकरणें आहेत. चवथा **सदानंदकृत शंकरविजय,** आहे. त्यांत सत्रा सर्ग असून सर्व कथाभाग माधव (विद्यारण्य) कृत शंकर विजयाप्रमाणें बहुधा आहे. हे जे एकंदर चार शंकरविजय आहेत; त्यांत विद्यारण्यकृत मूळ धरून बाकी दोन विजयांचें प्रकरणवार तात्पर्य काढून पुढें जोडलें आहे. चवथा जो सदानंदकृत आहे, तो व मूळ ह्मणून घेतलेला शंकरविजय एकच असल्यामुळें त्याचें तात्पर्य देण्याचें प्रयोजन वाटलें नाहीं.

आतां हे चार विजय मिळून तात्पर्य एकच आहे, परंतु कोठें जास्त वर्णन आहे, व कोठें संक्षेप आहे. अर्वाचीन कोशकार[१] हे सर्व **शंकरविजय** मूळ **शंकराचार्यां**वर न लावितां त्यांचे पुढें जे आणखी त्या स्थानीं **आचार्य** झाले; त्यांचें वर्णन आहे, असें ह्मणतात. त्यांत आनंदगिरींचा जो शंकरविजय आहे, तो मूळ आचार्यांचा व विद्यारण्यकृत शंकरविजय त्यांचे मागून झालेल्या **आचार्यां**चा, कारण आनंदगिरिकृत शंकरविजयांत **आचार्यां**च्या मातापितरांचीं जीं नावें आहेत; तीं नावें विद्यारण्यकृत विजयांत नसून दुसरीं आहेत; बाकी ब्रह्मसूत्रावर भाष्य केलें, मंडणमिश्राशीं वाद केला, मठस्थापना केल्या, वगैरे सर्व कृत्यें जमतात. तेव्हां एकदेशीय विकृत झालें ह्मणून ती वस्तु नाहीं ह्मणणें हें योग्य नाहीं, याविषयीं **"एकदेशविकृतमनन्यवत्"** हा न्याय स्वीकारणें योग्य आहे. किंवा एकाचींच अनेक नांवें असतात. तेव्हां कोणी एक ह्मणतो; दुसरा दुसरें ह्मणतो. व हीं नांवें कृतीनें फिरतात. आनंदगिरिकृत विजयांत **आचार्यां**चे वडिलांचें नांव **विश्वजित्** असें आहे; व माधवकृत विजयांत **शिवगुरु** आहे; तेव्हां **शिवगुरु** हें नांव ते शिवभक्त होते यावरून पडण्याचा संभव आहे. हा जो आह्मी तर्क करितों तो बाकीचें चरित्र सर्व एक असल्यामुळें आहे. परंतु आमचे मतें हे सर्व विजय जरीं भिन्न कालीं झाले आहेत; तरीं ह्यांचा वर्णन करण्याचा सर्व झोंक मूळ जे **शंकराचार्य** झाले त्यांना उद्देशूनच आहे; असें आंतील वर्णनावरून कोणीही कबूल करील.

**आचार्यांनीं** अनेक ग्रंथ केले; त्यांत मुख्य **प्रस्थानत्रयीवर भाष्य** केलें; प्रस्थानत्रयी ह्मणजे **ब्रह्मसूत्रें, श्रीभगवद्गीता,**

---

१ रा० रा० कैलासवासी रघुनाथ भास्कर गोडबोले.

दशोपनिषदें, हीं तीन मिळून आहे, शिवाय उपदेशसाहस्री आदिकरून अनेक वेदांतपर ग्रंथ केले आहेत. त्यांत जे प्रसिद्ध असून ज्यांची मला माहिती मिळाली, त्यांची यादी पुढें दिली आहे. बाकी एकंदरींत पहातां ते कर्तुं अकर्तुं, अन्यथा कर्तुं समर्थ् असल्यामुळें थोड्याकालांत हीं अनेक ग्रंथ करण्याची शक्ति त्यांस होती; परंतु कांहीं ग्रंथ केवळ **आचार्यांच्या** नांवावर विकतात. कारण **आचार्यांनीं** जी प्रस्थानत्रयी केली त्याची भाषा, त्याचें अर्थगांभीर्य, हीं मनांत आणिलीं असतां सहज ध्यानांत येईल. तथापि मंदबुद्धिजनाला सहज समजावें, अशा हेतूनें चर्पटपंजरिका आदिकरून लहान ग्रंथही अनेक व निदान हजारपाचशें तरी स्तोत्रें केलीं असतील. सातारा येथें एकागृहस्थाकडे तीनशेंपर्यंत स्तोत्रें आहेत असें समजतें. त्यांच्या कवितेची अशी कांहीं शैली आहे कीं जसा अधिकारी असेल त्याप्रमाणें त्यानें अर्थ करावा. शिवाय पदलालित्य, व साहजिकउपदेश, असून त्यांत रसाळ व प्रासादिक अशी वाणी आहे. त्यांतील कोणताही श्लोक ह्मटला तर हा **आचार्यांचा** आहे, असें बहुधा कोणीहि अनुमान करील.

आतां **आचार्यांच्या** कालाबद्दल विचार करूं. **आचार्यांच्या** कालाबद्दल अनेक मतें आहेत; कोणी ह्मणतात **आचार्यांना** होऊन सातशें किंवा आठशें वर्षें झालीं; कोणी ह्मण-

१ अलीकडे नामदार तेलंगसाहेब यांणीं मुद्राराक्षस नाटक शुद्ध करून छापलें आहे; व त्याला एक इंग्रजी निबंध जोडून त्यांत **आचार्यांच्या** उत्पत्तीचा काल ठरविण्याविषयीं बराच यत्न केला आहे; परंतु त्यांनीं जे हेतु धरून अनुमान काढलें आहे; तसेंच प्रोफेसर मॅक्स मुलर, डाक्तर भांडारकर, यांनींही निरनिराळे हेतु धरून आचार्यांच्या कालाविषयीं अनुमानें केलीं आहेत; परंतु ह्या अनुमानाचा हेतु सदोष असल्यामुळें त्यांचीं तीं अनुमानें एक मेकांना मोडून

तात कीं सहाव्या शतकाच्या शेवटीं व सातव्याच्या आरंभीं आचार्य असावेत, परंतु हीं सर्व अनुमानें असून केवल बुद्धितरंग आहेत; ह्मणून त्याला जुळेल असें कांहीं तरी प्रमाण देतात परंतु अर्वाचीन कोशकारांनीं आचार्यांचे कालाव-द्दल बराच विचार करून सप्रमाण असा काल ठरविला आहे. ते असें ह्मणतात कीं, आनंदगिरी आदिकरून ग्रंथकारांनीं जी उणीव केली ती जैन लोकांनीं पूर्ण केली. तेव्हां तीं जिनविजयांतील प्रमाणें लिहून त्यांनीं बराच विचार केला आहे. व तो सप्रमाण आहे, असें वाटतें करितां त्यांतील उतारा येथें दिला असतां उपयोग होईल.

"ऋषिर्बाणस्तथाभूमिर्मर्त्याक्षौ वाममेलनात् ॥
एकत्वे न लभेदंकस्ताम्राक्षस्तद्धि वत्सरः ॥
विश्वजिच्च पिता यस्य विख्यातश्च चिदंबरे ॥
तस्य भार्याविकादेवी शंकरं लोकशंकरं ॥
प्रसूता सर्वलोकस्य तारणाय जगद्गुरुम् ॥
शंकरेण निशीथे हि स्वकीयेन च तेजसा ॥
ब्रभ्रवत्काशितं सर्वं सूत्यागारं स्वलीलया ॥
वामाशाय न ब्रभ्रस्य माघे कृष्णे शुभे दिने ॥
चतुर्दश्यां निशीथे तु पुष्पवंतौ तदाघटे ॥
ग्लौर्वासरे प्रादुरासीद्वादकृच्छ्रंकरो महान् ॥
पश्चात्पंचदशे वर्षे शंकरस्य गते साति ॥

---

टाकतात; म्हणून त्यांवरून कांहींच निर्णय होत नाहीं. शिवाय ग्रंथकारानें कंटरवानें काढलेल्या शकापेक्षां तीं अनुमानें जरी कदाचित् सहेतुक असलीं, तरी विशेष कारणावांचून तीं खरीं आहेत, असें म्हणतां येत नाहीं; व ग्रंथकाराचालेख खोटा मानण्यास कारण नाहीं यास्तव शंकर-विजय व जैनविजय यावरून जो काल येतो तोच खरा आहे; व तोच विश्वसनीय होय असें अम्हांला वाटतें.

भट्टाचार्यकुमारस्य दर्शनं कृतवान् शिवः ॥
द्वाविंशद्वर्षविज्ञेया स्थितिरासीद्धिमालये ॥
शंकरस्य शरीरस्यावसानमभवत्तदा ॥
नंदोवसुर्भूमिनेत्रे मेलने शक उत्तमः ॥
ज्ञातव्यः पंडुपुत्रस्य जातोवामे न वै तदा ॥
दुर्मुखे मार्गशीर्षे च शुक्लपक्षे त्रयोदशी ॥
सोमप्रदोषे सायान्हे कैलासे शंकरो गतः ॥

**अर्थ**–( अंकानां वामतो गतिः ) इकडे लक्ष देऊन सांगितलेले अंक, एकं झाल्यावर दहंस्थानींचा, त्यापुढें शतंस्थानींचा, असा क्रम समजावा. ऋषि ह्मणजे ७ बाण ५ भूमि १ आणि मर्त्याक्ष २ असें डावे डावेकडे मांडल्यानें २१५७ होतात. यावरून असें समजावें कीं **युधिष्ठिरशकाचीं** वर लिहिलेलीं वर्षें गत झाल्यावर २१५८ व्या वर्षीं **रक्ताक्षी संवत्सरीं श्रीमच्छंकराचार्यांचें** जन्म झालें. त्यांच्या वडिलांचें नांव **विश्वजित्** होतें; व तो **चिदंबर** येथील रहाणारा होता. त्याची स्त्री **अंबिका देवी** ( विशिष्टा ) ती सर्व लोकांचें कल्याण करणाऱ्या व त्यांस गुरुरूपानें तारणाऱ्या अशा शंकराला ( **शंकराचार्यांस** ) प्रसवली. **शंकराचार्य** जन्मले तेव्हां **उत्तरायण** होतें. व **माघ वद्य** १४ असून **सोमवार** होता. सूर्य व चंद्र कुंभ राशींत होते. **आचार्यांचें** जन्म **मध्यरात्रीस** झालें असतां त्यांच्या तेजानें प्रसूतिगृह सूर्यप्रमाणें प्रकाशित झालें. याप्रमाणें हा पुरुष मोठा तेजस्वी व पाखंड्यांस वादांत जिंकणारा असा वादी उत्पन्न झाला. हा आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षीं **कुमारिलभट्टास** त्याच्या अंतकाळीं भेटला. हा बत्तीस वर्षांचें वय होई तोंपर्यंत पृथ्वीवर होता. व पुढें हिमालयावर याचें देहावसान झालें.

त्या वेळेस युधिष्ठिर शक २११८९ जाऊन २११९० होता. व **मार्गशीर्ष शुक्लपक्षींचा सोमप्रदोष** असून संवत्सर **दुर्मुख** होता. ( जिनविजय ).

वर जो शक दाखविला त्यास प्रत्यंतर **कुमारिलभट्ट** श-ब्दावर पूर्वी लिहिलेंच आहे तें असें कीं.

**अष्टचत्वारि वर्षाणि जन्मकालाद्गतानि वै ॥**
**प्रादुर्भवः शंकरस्य ततो जातोऽतिवादिनः ॥**

ह्मणजे **कुमारिलभट्टाच्या** वयास ४८ वर्षे झालीं असतां **शंकराचार्यांचें** जन्म झालें; तथापि हें वाक्य परस्परांचें परस्परांस सापेक्ष्य आहे, असें जर कोणास वाटेल तर **आचार्यांच्या** जन्मशकाविषयीं जैनग्रंथांत दुसरें एक प्रमाण आढळतें तें या प्रमाणें आहे.

**ऋषिर्वसुर्वसुर्ज्ञेयः पांडवानां महात्मनाम् ॥**
**गणना शेषकालस्य शकस्य शिवजन्मनि ॥**

**अर्थ–आचार्यांचें** जन्म झालें, त्या वेळेस युधिष्ठिरशक ३०४४ वर्षांपैकीं आठशें सत्यायशीं वर्षें भोगून जाण्याचा शेष राहिला होता. अर्थात् वरील शकाशीं येणेंकरून मेळ बसतो. याप्रमाणें **आनंदगिरी** इत्यादिक वैदिकपंडितांनीं **आचार्यांचा** काळ दर्शिवण्यांत केलेली जी उपेक्षा व तिच्या योगानें ते कधीं झाले, त्याविषयीं आज पर्यंत सर्वत्र झालेली अनिश्चय बुद्धि तिची जैनपंडितांनीं तोच काळ दोन तीन प्रकारानें दाखवून निश्चयात्मकता केली, हें काम त्यांनीं खचितच अतिशय मोठें केलें, यांत संशय नाहीं; ह्मणून हा एक त्यांचा अमूल्य उपकार व गुणच समजणें अवश्य असून आह्मी वाचकांस कळवितों कीं **भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्यांस,** होऊन गेल्यास आज युधिष्ठर शकाच्या ४९८१ व्या वर्षी २८२४ वर्षें झालीं आहेत.''

याप्रमाणें अर्वाचीन कोशकारांनीं ठरविलें आहे, व ज्योतिषा-वरूनहि पहातां तोच अजमास येतो. हा अर्वाचीन कोश सन १८८१ शींत छापला आहे. तेव्हां श्रीमच्छंकराचार्य यांचा अवतार होऊन आज संवत् १९४५ ह्मणजे शके १८११ मध्यें अठ्ठाविसशें तेहतीस ( २८३३ ) वर्षें झालीं.

सदानंदस्वामींनीं जो शंकरविजय ग्रंथ केला आहे, त्यावरून आचार्यांचा काल स्पष्ट होतो. त्यांत आचार्य केव्हां झाले याविषयीं प्रमाण आहे. तें असें—

धर्मेद्वाविंशतिशके सप्तशद्विसहस्रके ॥
अब्देसर्वेजितेजातः सहेवैपञ्चमीदिने ॥
सुमूहूर्तेशुभेलग्ने ह्युच्चस्थग्रहपंचके ॥
सासतीसुषुवेबालं शंकराख्यंजगद्गुरुम् ॥

अर्थ—अंकानां वामतो गतिः या न्यायानें युधिष्ठिर शकाच्या दोन हजार सातशें बेविसाव्या वर्षी सर्वेजित् संवत्सरांत पौषमासीं पंचमीच्या दिवशीं सुमुहूर्तावर शुभलग्नीं व पांच ग्रह उच्च असतां ती सती जगद्गुरु जे श्रीमच्छंकराचार्य त्यांना प्रसवली. यावरून कलियुगाचे आरंभीं युधिष्ठिर शक ३०४४ वर्षें नंतर विक्रम शक १३५ वर्षें नंतर शालिवाहन शक १८११ वर्षें मिळून युधिष्ठिर शकाला आज ४९९० वर्षें झालीं. त्यांत युधिष्ठिर शकाचीं २७२२ वर्षें वजा घातलीं असतां २२६८ वर्षें आचार्यांना झालीं; असें सिद्ध होतें.

यावरून अर्वाचीन कोशकारांनीं जो आमचे ग्रंथकारास आचार्यांचा शक वगैरे न दिल्याचा दोष दिला आहे तो निरर्थक आहे, असें सिद्ध होतें.

---

१ लेखी, पुस्तक (माझे चुलते ती० रा. रा. वासुदेव हरि आठल्ये वकील रत्नागिरी यांचें ) पत्र ८ पृष्ठ २ श्लोक ३३।३४

श्रीपरमहंस विद्वन्मुकुट श्रीकृष्णानंदस्वामीवास्तव्यकाशी यांणीं **आचार्यां**च्या कालबद्दल प्रमाण सांगितलें तें असें—

भास्कररायकृत **दीक्षामीमांसा** ह्मणून एक ग्रंथ काशींत एका गृहस्थाच्या घरीं आहे. त्यांत **आचार्य** केव्हां जहाले त्या बद्दल श्लोक आहे. व त्या ग्रंथास बृहच्छक्तिसंगमतंत्र प्रमाण आहे.

**वर्षेष्वतीतेषु शतेषु षट्सु तिष्येऽवतीर्णो मुनिशंकरार्यः शिष्यैश्चतुर्भिः सहितं शिवादि पारंपरीकावधिमानमामः**

यांत कलीचीं सहाशें वर्षें गेल्यानंतर आचार्य अवतीर्ण झाले, असें लिहिलें आहे. व आज गत कलि ४९९० वर्षें आहे करितां त्यांतून सहाशें वर्षें वजा केलीं असतां ४३९० वर्षें आचार्यांनां झालीं असें सिद्ध होतें.

याप्रमाणें ग्रंथकारही निरनिराळीं प्रमाणें देतात परंतु एकंदरींत सरासरीनें विचार केला असतां आचार्यांना होऊन २००० वर्षें झालीं असावीं असें वाटतें. परंतु जीं ग्रंथाचीं प्रमाणें आढळलीं तीं सुज्ञांपुढें ठेविलीं आहेत; त्यांचा विचार ते करितीलच.

आतां **श्रीमत्परमेश्वर**कृत महाभूमीचे ठिकाणीं जें हें प्रसिद्ध भरतखण्ड आहे, त्यांतील कित्येक देशांत स्वस्व प्राकृत भाषांतून सगुण निर्गुण भगवत्स्वरूपविषयक अद्वैतशान्तिरसाचें कवितारूपानें व्याख्यान करणारे जे अलीकडे महान् महान् साधु होऊन गेले आहेत; त्यांचे कविताशक्तीला आधार ह्मटला असतां जे प्राचीन **व्यास, वाल्मिकी**प्रभृति संस्कृतकविश्रेष्ठ त्यांचींच काव्यें होत. तथापि सूक्ष्मदृष्टीनें विचार करून पहातां असें दिसून येईल कीं, वरील कवींचीं काव्यें कलियुग लागल्यावर थोड्याकालानें बौद्धादिक अनेक बाह्यमतांनीं उच्छेदित करून नष्टच केलीं होतीं; तीं **श्रीमच्छंकराचार्य** जगद्गुरु

यांणीं साकल्यानें उदयास आणून आपल्या अत्युत्तम ज्ञानभक्तियुक्त व रसभरित अशा वाणीनें भूषित केली. ह्मणूनच अर्वाचीन कवींच्या कविताशक्तीस आधार झाली; एरव्हीं झाली नसतीं; आणि तसें आहे ह्मणूनच, सर्व मोठमोठे कवि आचार्यांस आपल्या ग्रंथांत फार मोठा मान देऊन अत्याल्हादपूर्वक स्तुत्याभार रूपानें स्तवितात; अतएव कलियुगामध्यें संस्कृताचे आद्य कवि आणि सकल संस्कृत आणि प्राकृत कवींच्या कविताशक्तीस आधारभूत, **श्रीजगद्गुरु आचार्यच** आहेत.

**श्रीमज्जगद्गुरु आचार्य** यांच्या प्रस्थानत्रयींतील **प्रतीकें** घेऊन प्रथमतः त्यांचे शिष्यांनीं ग्रंथ केले. नंतर तोच आधार धरून, संस्कृत ग्रंथकार **विद्यारण्य** आदिकरून व प्राकृत ग्रंथकार **मुकुंदराजा**दिक यांनीं वेदांतांत ग्रंथ केले. यावरून संस्कृत व प्राकृत ग्रंथकार जे **आचार्यां**नंतर झाले त्यांस ग्रंथ करण्याचे कामीं आदिकारण **श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु** हेच आहेत असें निर्बाध सिद्ध झालें.

**आचार्यांनीं** धर्माची संस्था होण्याकरितां चार दिशांला चार मठ स्थापून तेथें एकेक शिष्य ठेवून व्यवस्था केली. प्रथममठ **शृंगेरी**, दुसरा **जगन्नाथ**, तिसरा **द्वारका**, चवथा **बदरिकाश्रम.** याप्रमाणें करून त्यांत **सुरेश्वर, पद्मपाद, हस्तामलक**, व **त्रोटक** अशा चार शिष्यांची अनुक्रमें स्थापना केली. आणि **तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, गिरि, पर्वत, सागर, सरस्वती, भारति, पुरी**, असे मठपर्याय करून ते चार मठांला वांटून दिले. ते असे शृंगेरीमठाला, **सरस्वती, भारति**, आणि **पुरी**, जगन्नाथमठाला **वन** आणि **अरण्य.** द्वारकामठाला **तीर्थ**, आणि **आश्रम.** ३ बदरिकाश्रम मठाला **गिरी, पर्वत, सागर.** याप्रमाणें अद्याप चालू आहे.

ही संज्ञा त्या त्या मठीं जे अधिकारी होतात, त्यांचे नांवापुढें लागते.

आतां या संज्ञा करण्याचा उद्देश काय असा कोणी प्रश्न करील, परंतु त्याबद्दल कांहीं आधार मिळत नाहीं; तथापि ह्या सर्व संज्ञा स्थानबोधक असल्यामुळें त्या त्या स्थानाचा अधिकार त्या त्या संज्ञा धारण करणारांनीं चालवावा असें अनुमान होतें.

आतां **कुडलगी** व **संकेश्वर** हे दोन मठ हल्लीं प्रसिद्ध आहेत, परंतु हे मूळ **आचार्य**कृत नसून **शृंगेरी**मठांतील अधिकारी यांणीं केलेले आहेत; त्याविषयीं अशी हकिकत आहे कीं, **श्रीमद्भगवत्पादपूज्यश्रीमच्छंकराचार्यां**चे शिष्यपरंपरेपैकीं **विश्वरूपाचार्य** ह्यांनीं **शंकरभारती ( शंकरानंद )** ह्यांस आपल्या मागें शृंगेरीचे मठास शिष्य केलें; ह्यांस देव गोसावी असेंही ह्मणत असत; हे शके १४२२ चे सुमारास श्रीक्षेत्र काशीयात्रेला निघाले व प्रथम **श्रीमच्छंकराचार्यां**चे गुरु **गोविंदभगवत्पादपूज्य** यांची गुहा पहाण्याकरितां हिमालयपर्वतावर गेले. तेथें जातानां आपल्या शिष्यांस सांगितलें कीं, मी अमुक दिवशीं बाहेर येईन परंतु त्या दिवशीं आलों नाहीं तर आपल्यापैकीं एकाला गुरु करून शृंगेरीला निघून जावें. गुरूच्या आज्ञेप्रमाणें शिष्यांनीं त्यांची वाट पाहिली तथापि नियमाप्रमाणें स्वारी आली नाहीं; तेव्हां आज्ञेप्रमाणें एकाला गुरु करून ते सर्व शिष्य शृंगेरीला जाण्याकरितां निघाले, ते **कुडलगी**ला येऊन राहिले, व नंतर शृंगेरीला जाणार इतक्यांत शंकरभारती येऊन त्यांस मिळाले; नंतर त्यांच्या मनांत शृंगेरीला जावें असें आलें, परंतु तेथील मंडळींनीं सांगितलें कीं आपण ( शंकरभारती ) एक गुरु जिवंत

असतां दुसरा स्थापन करावयाचा नाहीं; असा या मठाचा संप्रदाय असून आपण त्याचे विरुद्ध वागलां ह्मणून आह्मी आपल्यास श्रृंगेरीला येऊं देत नाहीं. असें सांगून एक पुस्तकरूपी संन्यासी करून श्रृंगेरीच्या गादीवर बसविलें व **शंकरभारतीला** गांवांत येऊं दिलें नाहीं. तेव्हां पुढें शंकरभारती **कुडलगीला** येऊन तेथें नवीन मठ स्थापना करून आज्ञेनें नवीन केलेल्या शिष्यास तेथें स्थापन करून त्यांनीं, निजामाच्या मुलखांतून मिळालेलीं गावें त्याचे स्वाधीन केलीं; व ते पुनः काशीयात्रेला गेले. याप्रमाणें त्या **कुडलगी** मठाची उत्पत्ति आहे.

याप्रमाणें कुडलगीचा मठ स्थापन करून **शंकरभारती** जेव्हां पुनः महायात्रेला निघाले, ते मार्गांत **संकेश्वरचे** उत्तरेस **वल्लभगड** ह्मणून किल्ला आहे, तेथें **हरिद्रानामकदेवी** आहे तिच्या दर्शनास गेले, तेव्हां संकेश्वरीं जाऊन **श्रीशंकराची** पूजा करावी असा स्वामींना दृष्टांत झाला, त्यामुळें **शंकरभारती** नित्य **कश्मला** ह्मणजे **हिरण्यकेशी** नदींतील **शुक्लतीर्थांत** स्नान करून पूजा करीत. त्या काळीं विजापूरच्या बादशाहाचा वजीर **हजरत इभ्राइम क्यादल** याचा **रणदुल्लाखान** नांवाचा सरदार वाटेनें जात असतां ह्या स्वामीस पाहून प्रसाद घेऊन त्यांस कांहीं गांवें इनाम करून दिलीं. त्यायोगानें **संकेश्वर** येथें मठाची स्थापना झाली; व **कोल्हापूरमहाराजांनीं** पुढें कांहीं गांवें दिलीं; तेव्हां त्याच मठास **करवीरमठ** असें ह्मणूं लागले. अशा परंपरेनें हा मठ स्थापन झाला आणि त्या कालच्या राजाश्रयानें **मलप्रभेच्या** उत्तरेपासून तहत **काशीपर्यंत** आपला शिष्यसंबंधी सर्व हक्क चालू केला. आतां मूळ, **शंकराचार्यांनीं ( शंकरभारती )** या

गादीवर पूर्वी गृहस्थाश्रम अनुभविलेले शिष्य बसविले. तीच असलेली परंपरा अद्याप चालू आहे. कुडलगी व संकेश्वर हे श्रृंगेरीचे परंपरेपैकीं आहेत; ह्मणून तेथील ज्या भारती आदिकरून संज्ञा त्या दोन ठिकाणीं चालू आहेत.

आचार्यांनीं उपनिषत्सिद्धांत जो अद्वैत तो या ग्रंथांत वेळोवेळीं मतखण्डनाचे वेळीं स्पष्ट केलाच आहे, तथापि थोडक्यांत कळण्याकरितां श्रुतिवाक्यानें सांगतों.

"योऽन्यां देवतां उपासते स पशुः" "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म।" "सदेव सौम्येदमग्र आसीत् । आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् । एकमेवाद्वितीयं ब्रह्म" "सर्वं खल्विदं ब्रह्म" "नेह नानास्ति किंचन" ज्ञानादेव तु कैवल्यं "ब्रह्म विदाप्नोति परम्" यदाह्येवैष एतस्मिनुदरमंतरं कुरुते अथ तस्य भयं भवति" "असन्नेव स भवति असद्ब्रह्मेति वेदचेत्" "अस्तिब्रह्मेतिचेद्वेदसंतमेनं ततोविदुः" "योवेद निहितं गुहायां परमेव्योमन् सोऽश्नुते सर्वान्कामान् सह" "तत्त्वमसि" "अहं ब्रह्मास्मि" "प्रज्ञानं ब्रह्म" "अयमात्मा ब्रह्म" इत्यादि श्रुतिवाक्यानि.

**अर्थ**–तिहीं कालीं अबाधित त्यास सत्य असें ह्मणावें. तेंच ज्ञान अनंतशब्देंकरून देश, काल, वस्तु, यांणीं जो परिच्छेदतद्रहित आहे. तेंच सत् अशा उपलक्षणानें सृष्टीच्या पूर्वी असतें झालें. अथवा आत्माच सृष्टीपूर्वी असता झाला. सदादिलक्षणांनीं युक्त ब्रह्म आणि आत्मा हीं दोन भिन्न नाहींत; कारण ब्रह्म सजातीय, विजातीय आणि स्वगतभेद, यांनीं रहित आहे; व एकच अद्वितीय असें आहे. तेथें नाना ह्मणजे अनेक कांहीं नाहीं, असें असून नसतां जें जें दिसतें तें तें भ्रमानें ह्मणजे

अज्ञानानें आहे, वास्तव ज्ञानानेंच मोक्ष आहे. ब्रह्मवेत्ताच परब्रह्मास पावतो, ह्मणजे ब्रह्मस्वरूप होतो. जो कोणी ब्रह्म आणि आत्मा या दोहोंमध्यें भेद मानतो तो भय पावतो आणि जो ब्रह्माला असत् ह्मणतो तो स्वतःच असत् होतो, ह्म० नाहींसाच होतो. ब्रह्म आहे तसेंच आहे. ह्मणून जो ब्रह्म आहे असें ह्मणतो तोच तद्रूप जाणावा. गुहेंत ह्मणजे पंचकोशांत निहित जें ब्रह्म तें जो जाणतो त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. ह्मणून तेंच तूं आहेस असें, शरण येऊन पुसणाऱ्या शिष्यास गुरूनें सांगावें; व त्यानेंहि मी ब्रह्म आहें; असें त्रिपुटीवांचून अनुभवावें. याप्रमाणें आचार्यांचा सिद्धांत आहे, व तो पूर्वींच्या वसिष्ठ, व्यासादिकांचे सिद्धांताशीं जुळतो. याविषयीं योगवासिष्ठ, भगवद्गीता, रामगीता वगैरे ग्रंथ पाहिले असतां सहज लक्ष्यांत येईल.

आतां या चरित्रांत तीन परिच्छेद केले आहेत. **आचार्यांच्या** जन्मापासून ते गुरुगृहीं जाऊन आश्रम घेईपर्यंत एक. **मंडन**मिश्र आदिकरून पंडितांशीं कांहीं वादकरून तीर्थाटन केलें व अनेक शिष्यहि केले आणि अद्वैत मार्ग सुरु केला, हा दुसरा. दिग्विजयाला आरंभ करून कैलासाला गेले हा तिसरा.

आतां ज्या **शंकरविजया**वरून हें चरित्र लिहिलें त्याचें थोडें तात्पर्य येथें सांगणें अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं. या माधवकृत ( विद्यारण्यकृत ) शंकरविजयांत एकंदर सोळा सर्ग आहेत. त्यांत प्रथम सर्गांत **आचार्यांचा** अवतार होण्याचें कारण सांगितलें आहे. दुसऱ्यांत **आचार्यांचें** जन्म कसें झालें तें वर्णन आहे. तिसऱ्यांत **आचार्यांच्या** सहाय्याकरितां ज्या ज्या देवांनीं जन्में घेतलीं, तें वर्णन दिलें आहे. चवथ्या सर्गांत

आचार्यांच्या आठ वर्षांच्या वयाच्या आंत त्यांणीं काय काय केलें हें वर्णन आहे. पांचव्यांत आचार्यांनीं चतुर्थाश्रम घेतला इत्यादिवर्णन आहे. सहाव्यांत नष्ट झालेली जी आत्मविद्या तिचें स्थापन केल्याचें वर्णन आहे. सातव्यांत श्रीव्यासाचें दर्शन झाल्याचें वर्णन आहे. आठव्यांत मंडनमिश्र व आचार्य यांचा वाद झाला तें वर्णन आहे. नवव्या सर्गांत सरस्वतीला मध्यस्थ करून आचार्यांनीं आपली सर्वज्ञता दाखवून मंडनमिश्रास जिंकलें; तो भाग वर्णिला आहे. दहाव्यांत आचार्यांनीं योगबलानें अमरकराजाच्या देहांत प्रवेश केला तो भाग आहे. अकराव्यांत उग्रभैरव जो कापालिकमताग्रणी त्यास आचार्यांनीं जिंकलें तो भाग आहे. बाराव्यांत हस्तामलक आणि त्रोटक यांस शिष्य केलें तो भाग आहे. तेराव्यांत वार्तिकांत जी ब्रह्मविद्या तिला चालन देऊन त्यावर भाष्य केलें, तो भाग वर्णिला आहे. चवदाव्यांत पद्मपादाला तीर्थयात्रा कथन केली. पंधराव्यांत आचार्यांनीं दिग्विजय केला, तो भाग आहे. सोळाव्या सर्गांत शारदापीठावर आरोहण करून स्वारी कैलासाला गेली, तो भाग वर्णिला आहे. याप्रणें संक्षेपानें या ग्रंथांत अनुक्रमानें विषय आहेत.

शिवाय आनंदगिरीकृत शंकरविजय, व चिद्विलास शंकरविजयविलास, सदानंदकृत शंकरविजय, असे तीन ग्रंथ उपलब्ध झाले; त्यांत दोहोंचीं तात्पर्यें काढून अनुक्रमानें ग्रंथाच्या शेवटीं दिलीं आहेत. सदानंदकृत शंकर विजयमूळाबरोबर आहे, सबब त्याचें तात्पर्य दिलें नाहीं. हीं तात्पर्यें जोडल्यानें त्या ग्रंथांत काय आहे, हें वाचकांस कळण्यास चांगलें होईल. व एकंदरींत ग्रंथतात्पर्य चांगलें समजेल, यांत मूळ ग्रंथाचें अक्षरशः भाषांतर नसून गोष्टीच्या रूपानें लोकांस बोध होईल तितकाच भाग घेतला आहे.

आतां हें पुस्तक करण्यास ग्रंथांची जी मदत लागली ती सर्व कैलासवासी **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक.** सी. एस्, आय्, यांचे ग्रंथालयांतून झाली. सदरील तीनाहि विजय त्यांचेकडून मिळाले, व चवथा रत्नागिरी येथें ती० रा० रा० **वासुदेव हरि आठल्ये** यांचे पुस्तकसंग्रहांतून मिळाला; याबद्दल मी त्यांचे उपकार मानतों.

आतां हें **श्रीजगद्गुरूचें** चरित्र मूळ संस्कृतांतून मराठींत रूपांतर करून सर्व आबालवृद्धांस समजण्याकरितां जें लिहिलें आहे; त्याचें सुज्ञलोक अवलंबन करून दोषपरित्यागपूर्वक आदर करोत; अशी आशा बाळगून हें त्यांचे पुढें ठेवित आहें, तरी याचा ते आदर करोत व **सच्चिदानंदस्वरूपी** जे जगद्गुरु **श्रीमच्छंकराचार्य** ते सुप्रसन्न होवोत, अशी ईशचरणीं प्रार्थना करितों.

ग्रंथकर्त्ता

**श्रीकृष्ण रामकृष्ण शास्त्री आठल्ये.**

# श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य-
# श्रीमच्छंकराचार्यकृत
## प्रसिद्ध ग्रंथांची यादि माहितीवरून व ग्रंथाधारें मिळाली ती—

* १ ब्रह्मसूत्रावर भाष्य ( अथातोब्रह्मजिज्ञासा इत्यादि व्याससूत्रांवर )

* १ दशोपनिषदांवर भाष्य (ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरेय, ऐतरेय, छान्दोग्य, बृहदारण्यक, ) हीं दहा उपनिषदें.

* १ श्रीमद्भगवद्गीताभाष्य.

१ केनोपनिषदावर दोन भाष्यें आहेत. एक पदभाष्य व एक वाक्यभाष्य.

१ श्वेताश्वतर उपनिषदावर भाष्य.

१ भारतांतील सनत्सुजातीयावर भाष्य.

१ नृसिंहतापनीयावर भाष्य.

१ गायत्रीभाष्य.

२ उपदेशसाहस्री पद्यरूपा व गद्यरूपा. ( सटीक )

१ शतश्लोकी सटीक ( वेदान्तकेसरी किंवा अध्यात्म प्रकाशिका. )

१ विष्णुसहस्रनामावर भाष्य

१ अपरोक्षानुभूति.

१ स्वात्मनिरूपण ( यांत वर्णानुक्रमानें आर्या आहेत.

१ विवेकचूडामणी.

१ दक्षिणामूर्तिस्तव.

१ आत्मषट्क ( श्लोक ६ )

१ गोविंदाष्टक.

१ विज्ञाननौका. ( श्लोक ९

१ मनीषापञ्चक.

१ साधनपंचक.

१ तत्वानुसंधान.

१ प्रबोधसुधाकर ( यांत १५ प्रकरणें असून आर्याबद्ध आहे. )

१ अद्वैतकौस्तुभ ( यांत परिच्छेद ६४ आहेत. ही त-

* हे तीन ग्रन्थ मिळून प्रस्थानत्रयी असें नांव आहे.

त्वानुसंधानाची टीका आहे.
१ वेदान्तमुक्तावलि.
१ वेदान्तसार ( पद्यात्मक )
१ हरिमीडे हरिस्तुति ( यांत ४४ श्लोक आहेत; व यावर आनंदगिरीची टीका आहे. )
१ आत्मबोध ( ६७ अनुष्टुप् श्लोक आहेत; व सटीक आहे.
१ तत्वबोध ( सटीक )
१ महावाक्यविवरण.
१ महावाक्यविवेक.
१ वाक्यवृत्तिदर्पण ( श्लोक ५२ )
१ वाक्यवृत्तिमध्यम.
१ वाक्यवृत्ति लघु श्लोक १८
१ आत्मचिन्तन ( श्लोक २७)
१ रत्नपञ्चक.
१ विवेकादर्श.
१ पञ्चीकरण.
१ सिद्धान्तबिंदु ( श्लोक १० असून त्यावर टीका आहे. )
१ षट्पदी ( आर्या असून टीका आहे. )
१ एकश्लोकी ( श्लोक वृत्ताचा आहे. )
१ एकश्लोक (अनुष्टुप् आहे.)
१ त्रिश्लोकी.
१ चतुःश्लोकी.
१ आत्मपंचक.
१ मनीषापञ्चक. ( श्लोक ९ आहेत. )
१ साधनपञ्चक.
१ कौपीनपञ्चक.
१ काशिपञ्चक.
१ वैराग्यपञ्चक.
१ शिवमानसपूजा. ( वृत्तश्लोक ४ आहेत. )
१ ,, ( अनुष्टुप् श्लोक २० आहेत. )
१ विष्णुमानसपूजा ( श्लोक ९ आहेत. )
१ चतुःषष्ठ्युपचार भवानीमानसपूजा. ( श्लोक ७२ आहेत. )
१ भगवन्मानसपूजा.
१ निर्वाणषट्क ( श्लोक ९ आहेत. )
१ सप्तश्लोकी गीत ( श्लोक ७)
१ निर्वाणदशक (श्लोक १०)
१ सदाचार ( यावर प्राकृत ओवीबद्ध टीका आहे व ओव्या २११८ आहेत. )

१ चर्पटपञ्जरी.
१ द्वादशपञ्जरिका.
१ आत्मानात्मविवेक.
१ अद्वैतानुभूतिः
१ बालबोधिनी.
१ हरिनाममाला (श्लोक १९)
१ ब्रह्मनामावलीस्तोत्र.
१ प्रश्नोत्तरनामावली (आर्या)
१ नक्षत्रमाला (श्लोक २७ यांत चंद्रमौलेश्वर व व्यंकटेश्वर यांची स्तुति आहे.)
१ निगमचूडामणी.
१ मोहमुद्गर.
१ यतिपञ्चक.
१ काशिकास्तोत्र.
१ विष्णुनामाष्टक.
१ शिवभुजंगप्रयातस्तोत्र.
१ शिवपञ्चाक्षरस्तोत्र.
१ शिवापराधक्षमापनस्तोत्र.
१ लक्ष्मीनृसिंहस्तोत्र.
१ नारायणस्तोत्र.
१ त्रिपुरसुंदरीस्तोत्र.
१ देव्यपराधक्षमापनस्तोत्र.
१ अन्नपूर्णास्तोत्र.
१ सौंदर्यलहरी (यांत पार्वतीचें पादादि केशांत वर्णन १०० श्लोकांनीं केलें आहे यावर विद्वन्मनोरमा व कैवल्याश्रमरचित सौभाग्यवर्द्धनी टीका व आणखी टीका आहेत.)
१ आनंदलहरी (दोन ग्रंथ आहेत.)
१ विष्णुपादादिकेशांतवर्णनस्तोत्र. (सटीक)
१ शिवस्तोत्र.
१ शिवसर्वोत्तम.
१ ललितास्तवराज.
१ दत्तात्रेयसहस्रनामस्तोत्र (श्लोक १४२)
१ महालक्ष्मी शक्तियोगमाय भवानीस्तोत्र (श्लोक १०)
१ अंबाष्टक (मत्तमयूरीवृत्त असून सटीक आहे श्लोक ८)
१ पांडुरंगाष्टक.
१ शिवनामावल्याष्टक.
१ कालभैरवाष्टक.
१ अच्युताष्टक.
१ कृष्णाष्टक.
१ जगन्नाथाष्टक.
१ यमुनाष्टक.
१ अच्युताष्टक. (दुसरें)
१ धन्याष्टक.

१ शिवरामाष्टक.
१ गंगाष्टक.
१ त्रिवेणीस्तव.
१ नर्मदाष्टक.
१ यमुनाष्टक. ( दुसरें )
१ मणिकर्णिकाष्टक.
१ गोविंदाष्टक ( सटीक )
१ भैरवाष्टक.
१ शारदास्तुति.
१ शिवस्तोत्र.
१ चंद्रशेखरस्तोत्र.
१ विठ्ठलस्तोत्र.
१ रामलक्ष्मणस्तोत्र.
१ नीलकंठशैवसंवाद.
१ वेदान्तसार शिवस्तव.
१ अपराधभञ्जनस्तोत्र.
१ कृष्णतांडव.
१ कामाक्ष्यष्टक.
१ राजयोग.

याप्रमाणें हे सर्व ग्रंथ वेदान्तप्रतिपादक आहेत शिवाय.

१ योगतारावली. (योगावर)
१ अमरुशतक (कामशास्त्रावर. यावर दिवभूपाल यांणीं शृंगाररसदीप नावाची टीका केली आहे, व एक दुसरीही आहे. हा ग्रंथ मंडणमिश्राबरोबर वाद झाला तेव्हां सरस्वतीचे वादाचेवेळीं केला. )

याप्रमाणें ही आचार्यांचे ग्रंथांची दिशा आहे. त्यांचे सर्व ग्रंथ समजणें ह्मणजे अशक्य आहे; तथापि आह्मी जी वर माहिती दिली आहे हे, बहुतेक ग्रंथ उपलब्ध असून कांहीं छापलेही आहेत. शिवाय जो कोणी ज्यास्त माहिती देईल त्याचे आह्मी आभारी होऊं.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

# श्रीमच्छंकराचार्यचरित्रम्.

कुलोपास्यं च पल्लीशं महालक्ष्मीं तथैव च ।
उमयासहखड्गेशमाराध्यप्रणतोऽस्म्यहम् ॥
नमामि शंकराचार्यगुरुपादसरोरुहम् ।
यस्य प्रसादान्मूढोऽपि सर्वज्ञो भवति क्षणात् ॥
मातरं पितरं नत्वा गुरुं चैव जगद्गुरुम् ।
कुर्वे प्राकृतभाषायामाचार्यचरितं शुभम् ॥
आचार्यचरिताम्बोधिस्तर्तुं शक्यो न दुस्तरः ।
माधवकृतिमालम्ब्य तत्पारं गम्यते मया ॥
सर्वज्ञयुष्मद्गुणसंघमद्य शेषोऽपि नो वर्णयितुं समर्थः ।
किं युष्मदंघ्र्यब्जनिषेवणाप्तज्ञानस्तथा त्वत्कृपयात्तवेषः ॥

ग्रंथारंभीं ग्रंथसमाप्ति निर्विघ्न व्हावी म्हणून इष्टदेवतेचें व कुलदेवतेचें वंदन करून ज्यांविषयीं हा ग्रंथ लिहावयाचा अशा श्रीमच्छंकराचार्यांना वंदन करून अल्पमति असतांही त्यांच्या कृपाकटाक्षावर भरंवसा धरून मी हें त्यांचें चरित यथामति लिहितों.

एकदां ब्रह्मादि समस्त देव मिळून कैलासपर्वतीं गेले आणि तेथें उदयाचलावर जसा चंद्रमा शोभतो त्याप्रमाणें शोभायमान् जे श्रीशंकर त्यांची उपासना करून हात जोडून प्रार्थना केली कीं, हे देवाधिदेव, सुगतांस ( जैनांस ) फसविण्याकरितां आमच्या हिताकरितां भगवान् विष्णूंनीं बुद्धाचें रूप धारण केलें आहे तो सर्व प्रकार आपण जाणतच आहां; परंतु जें मत विष्णूंनीं त्यांस फसविण्याकरितां सांगितलें तेंच मत तूर्त प्रबल होऊन वैदिक मार्ग अगदीं नष्ट होत चालला आहे. व त्या

मतानें ही पृथ्वी व्यापून गेली आहे; तेव्हां त्या मताचा नाश आपल्यावांचून दुसऱ्याकडून होणारा नाहीं. तो करण्याविषयीं आपणच समर्थ आहां. आतां ते सौगत असें ह्मणतात कीं वेद हें एक उपजीविकेचें साधन आहे. त्यांत सांगितलेलें सर्व मिथ्या आहे; अशामुळें कोणी संध्यादिक कर्मेंही करित नाहींत. मग यज्ञादिक कर्मांची तर गोष्टच नको. यज्ञ हीं दोन अक्षरें जर कोणी उच्चारलीं तर तात्काल कर्णांचें आच्छादन करितात. आतां जर यज्ञ न होतील तर आमचे हविर्भाग सर्व नष्ट होतील. तेव्हां आपण श्रुतीचें रक्षण जसें होईल तसें अवश्य केलें पाहिजे व अशा प्रकारचीं दुसरीं कापालिक, भैरव, जैन, इत्यादिक मतें वेदाला निन्द्य मानणारीं अशीं भूतलीं झालीं आहेत. त्या सर्वांचें निरसन व्हावें व वैदिकमार्ग चालू व्हावा, कीं जेणेंकरून ह्या सर्व जगताला सुखप्राप्ति होईल. याप्रमाणें देवांचें भाषण ऐकून शंकर भाषण करितात कीं, हे देवहो; तुह्मीं स्वस्थ असा. तुमचा मनोरथ पूर्ण करण्याकरितां मी मनुष्यदेह धारण करून धर्माची संस्थापना व दुष्टांचा निग्रह जसा होईल तसें करीन. जसा विष्णू आपल्या चार भुजांनीं भक्तांचें रक्षण करितो, त्याप्रमाणें ब्रह्मसूत्रावर भाष्य करून मी चार शिष्यांच्या योगानें वैदिकधर्माचें रक्षण करीन. व मी शंकर या नावानें प्रसिद्ध व सर्व यतीमध्यें श्रेष्ठ असा होईन; तेव्हां तुह्मींही मानुष रूप घेऊन माझें सहाय्य करण्याकरितां भूतलीं यावें. असें केलें असतां तुमचा मनोरथ सिद्धीस जाईल. अशी देवांला आज्ञा करून स्कंदाकडे अवलोकन करून, व जगदुद्धार व्हावा असें मनांत आणून आज्ञा केली कीं, आपण पृथ्वीवर जाऊन कर्म उपासना, व ज्ञान, याप्रमाणें त्रिकांडात्मक जो वेद त्याचा उद्धार करावा कीं जेणेंकरून सर्व ब्राह्मणांचा उद्धार होईल. व त्या योगानें सर्व जगताचें रक्षण होईल.

आतां योगकांडाचा उद्धार संकर्षण व पतंजलि हे माझा भावी हेतु जाणून करितील. त्याप्रमाणें तुह्मीं न्यायशास्त्रामध्यें केवल प्रवीण असें सुब्रह्मण्य या नामेंकरून प्रसिद्ध होऊन विशिष्ट कर्मकांडाचा उद्धार करावा. मध्यमकांड जें योगशास्त्र त्याचे उद्धारार्थ अंशभूत असे संकर्षण व पतंजलि उत्पन्न होतील. आणि शेवटचें जें ज्ञानकाण्ड, त्याचा उद्धार मी स्वतः करीन. तेव्हां आपण प्रथम वेदविरोधी जे बुद्धादिक त्यांना जिंकून वेदमर्यादा स्थापन करावी. आपल्या सहाय्याकरितां ब्रह्मदेव मंडण या नामें करून व महेंद्र सुधन्वा या नामेंकरून प्रसिद्ध असे उत्पन्न होतील. अशी शंकराची वाणी श्रवण करून तसें करितों असें सर्वांनीं मान्य केलें. नंतर इंद्र सुधन्वा नामें राजा होऊन स्वर्गाप्रमाणें पृथ्वीचें पालन करूं लागला. व षडाननाचे अवताराची प्रतीक्षा करणारा असा, जरी तो सर्वज्ञ असल्यामुळें वैदिककर्मावर त्याचा विश्वास होता; तरी त्या खोट्या शास्त्रावर श्रद्धा ठेवून संपूर्ण बौद्ध जमवून तें मत त्यानें स्वीकारिलें. नंतर स्कंदांनीं भट्टपाद या नामेंकरून अवतार धारण करून कर्मकाण्डाचा उद्धार करीत व जैमिनीसूत्राचा भावार्थ प्रगट करून वेदतात्पर्यार्थानें सर्व मतें मोडून, संपूर्ण जगत् वेदमतानें प्रकाशित केलें. अशा प्रकारें दिग्विजय करीत करीत भट्टपाद त्या सुधन्व्याच्या नगरांत आले. भट्टपाद आपल्या नगरांत आले असें ऐकून राजाला अत्यंत आनंद झाला व त्यांला सामोरे जाऊन त्याणें मोठ्या थाटानें आपल्या घरीं आणून आसनादिक उपचारानें त्यांची पूजा करून भट्टपाद व सर्व बौद्ध यांसह जेव्हां राजा त्या सभेंत बसला तेव्हां, इंद्रसभेंत जसा सुरगुरु शोभतो त्याप्रमाणें भट्टपाद त्या ठिकाणीं शोभले. इतक्यांत त्या सभेसन्निध एक वृक्ष होता, त्यावरील

कोकिलानें शब्द केला तो ऐकून राजाला बोध होण्याकरितां त्या कोकिलाचें मिष करून भट्टपाद त्या राजाला ह्मणतात—हे कोकिल, मलीन, नीच व श्रुतीला दूषित करणारे अशांची जर तुला संगती नसती तर तुझ्यासारखा योग्य प्राणी जगतांतही मिळणें कठीण झालें असतें. परंतु या नीचसंगतीनें तुझें कांहीं स्वरूप होत नाहीं. हें भट्टपादांचें वाक्य श्रवण करून त्या सभेंत असणारे जे बौद्ध ते, पुच्छाचे ठिकाणीं आघात झाला असतां जसा सर्प सक्रोध होतो; त्याप्रमाणें ते सर्व हा गूढार्थ जाणून सक्रोध झाले. नंतर भट्टपाद व बुद्ध यांचा वाद होऊन भट्टपाद यांणीं आपल्या बुद्धिरूप शस्त्रानें त्या सर्वांचें खंडन केलें. तथापि कोणाचा पक्ष खरा आहे, व कोणाचा खोटा आहे. याचा निर्णय करण्याकरितां त्या बुद्धांनीं असें ठरविलें कीं या पर्वतावरून पतन झालें असतां ज्याचा नाश होणार नाहीं, त्याचा पक्ष खरा आहे. करितां भट्टपाद जर आपला पक्ष खरा ह्मणत असतील, तर त्यांणीं पर्वतावरून उडी टाकावी. असें जेव्हां ठरलें तेव्हां सर्व लोक आपसांत परस्परांकडे पाहूं लागले. तेव्हां भट्टपादांनीं वेदाचें स्मरण करून अशी प्रतिज्ञा केली कीं; जर वेद सत्य आहेत तर या पतनापासून माझा नाश होणार नाहीं, असें ह्मणून त्यांणीं त्या पर्वतावरून उडी टाकिली, त्यापासून त्यांना कांहीं दुःख न होतां ज्याप्रमाणें एखादा कापसाचा गोळा पतन झाला असतां त्याला इजा होत नाहीं त्याप्रमाणें त्यांना कांहीं इजा झाली नाहीं. ज्यांनें वेदाचे रक्षणाकरितां पतन झालें त्यांला दुःख कसें होईल. नंतर ते बुद्ध ह्मणूं लागले कीं, हे राजा, हें जें कृत्य झालें, त्यास कांहींतरी मंत्रादिकांचें साह्य असलें पाहिजे ह्मणून पतन झालें असतांही इजा झाली नाहीं; करितां ह्यांनीं दुसरें

कांहीं प्रमाण करावें तर आह्मी तें सत्य मानूं. तेव्हां राजानें एक घागर आणून कोणालाही न समजतां तीमध्यें एक सर्प ठेविला, आणि सर्वांस असें सांगितलें कीं, यांत काय वस्तु आहे ती सांगावी. जो खरें सांगेल त्याचा पक्ष खरा आहे. आणि जो खोटा ठरेल त्याचा शिरच्छेद केला जाईल. तेव्हां बुद्धांनीं सांगितलें कीं याचें उत्तर आह्मी उद्यां देऊं. नंतर दुसरे दिवशीं त्यांणीं ज्योतिषशास्त्राच्या योगानें विचार करून या घागरींत सर्प आहे असें सांगितलें. नंतर भट्टपादांना प्रश्न केला तेव्हां ते ह्मणाले कीं शेषावर शयन करणारी अशी नारायणाची मूर्ती यांत आहे. तेव्हां राजाला अत्यंत खेद झाला. कारण आंतील वस्तूचें यथार्थ ज्ञान राजास होतें; इतक्यांत आकाशवाणी झाली कीं हे राजा, तूं खिन्न होऊं नकोस, कारण ब्राह्मण सांगतो हेंच खरें आहे. तेव्हां राजाला आनंद होऊन त्याणें तो घट मोकळा केला. तेव्हां आंत भगवंताची मूर्ती शेषावर शयन केलेली पाहून राजास संतोष झाला. मग राजानें दूतांस आज्ञा केली कीं माझे राज्यांत जितके बौद्ध आहेत, त्या सर्वांचा नाश करावा. कोणीही ठेवूं नये. त्या राजाज्ञेप्रमाणें सर्व बुद्धांचा नाश झाल्यानंतर राजानें, भट्टपादांच्या सहाय्यानें सर्वत्र वैदिकधर्म स्थापन केला. तेणेंकरून कर्ममार्गाची प्रवृत्ति अप्रतिहत चालू झाली. याप्रमाणें कर्ममार्गाची प्रवृत्ति सुरू झाल्यावर आतां आपण स्वतः अवतीर्ण होऊन जगदुद्धार करावा, असें श्रीशंकरांनीं मनांत आणून केरलनामक देशामध्यें वृषपर्वतावर पूर्णानदीचे कांठीं ज्योतिर्लिंगस्वरूपानें प्रगट झाले. नंतर त्यांच्याच प्रेरणेनें कोणी एका राजानें त्या ठिकाणीं देवालय बांधलें. त्या ज्योतिर्लिंगाचे नजीक कालटी या नामेंकरून एक गांव आहे. तो सर्व ब्राह्मणांस अग्रहार[1] दिलेला अ-

१ इनाम.

सून त्यामध्यें ब्राह्मण आपलीं षट्कर्में उत्तम रीतीनें आचरण करीत होते. तेथील राहणारा विद्याधिराज या नामेंकरून कोणीएक पंडितश्रेष्ठ, श्रीशंकराची उत्तम भक्ती करणारा असा होता. त्याला पूर्वपुण्यानुरोधानें शिवगुरु या नामेंकरून पुत्र झाला. त्या पुत्राचें ज्ञान केवल शिवाप्रमाणें, व तो बुद्धीनें सुरगुरु जो बृहस्पति त्याची बरोबरी करणारा असा होता; ह्मणून त्याचें शिवगुरु असें अन्वर्थ नांव ठेविलें. नंतर उपनयनकालीं त्याचें उपनयन करून अध्ययन करण्याकरितां विद्याधिराज यांणीं आपल्या मुलाला गुरुगृहीं पाठविलें. पुढें त्याठिकाणीं संपूर्ण अध्ययन झाल्यानंतर गुरूंनीं आज्ञा केली कीं, आतां तुह्मीं आपल्या घरीं जाऊन मातापितरांस भेटून पुढें जो योग्य आश्रम करावयाचा त्याचा स्वीकार करावा. त्या कालीं शिवगुरु ह्मणाले कीं, हे गुरो असा कांहीं नियम नाहीं कीं, अध्ययन झाल्या नंतर [1]गृही झालेंच पाहिजे. कारण कित्येक वैराग्यसंपन्न होऊन भिक्षुपदाप्रत गमन करितात. आतां कित्येक "[2]ब्रह्मचर्यं **समाप्य गृही भवेद्गृहाद्वनी भूत्वा प्रव्रजेत्.**" इत्यादि वाक्यांनीं विवाद करितात; परंतु [3]इहामुत्र भोगाचे ठिकाणीं विरक्त असून जो विचारवान् आणि साधनचतुष्टयानें युक्त असेल त्यानें चतुर्थाश्रम घ्यावा. अशाविषयीं "[4]**यदि चे तरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेद्गृहाद्वा वनाद्वा। एवा ह्येते ह्यद्दृष्टा यज्ञरूपाः। न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैकेऽमृतत्वमानशुरिति**" या श्रुतिप्रमाणावरून मध्यमाधिका-

---

१ गृहस्थाश्रमी. २ अर्थ. ब्रह्मचर्य समाप्त करून गृहस्थाश्रमी व्हावें. नंतर वानप्रस्थाश्रम करून शेवटीं संन्यास घ्यावा. ३ या लोकीं व परलोकीं. ४ कदाचित् जर तसेंच पूर्ण वैराग्य होईल तर ब्रह्मचर्याश्रमांतून अगर वानप्रस्थांतून संन्यास करावा. ज्ञानानेंच मोक्ष आहे. कर्मानें किंवा प्रजेनें किंवा धनानें अगर त्यागानें मोक्षप्राप्ति नाहीं.

त्यांनाच तो क्रमनियम लागू आहे; शुद्धसत्ववान् व ज्यांचें उत्कट वैराग्य असेल त्यांला तो नियम लागू नाहीं. याकरितां मी नैष्ठिकाश्रम ह्मणजे आमरणांत ब्रह्मचर्य स्वीकारून, दंड व अजिन धारण करून, आपल्यापाशीं वेदाध्ययन करण्याकरितां व ज्याचें विस्मरण होईल त्याचें पुनः पठन करण्याकरितां राहण्याविषयीं इच्छा करितों. आतां दारासंग्रह, जो आहे तो जोंपर्यंत त्याचा अनुभव आला नाहीं तावत्कालपर्यंत सुखकारक आहे असा वाटतो.

याप्रमाणें शिवगुरूचा आणि त्याचे गुरूचा संवाद झाला. इतक्यांत शिवगुरूचे वडील विद्याधिराज हे, त्यांना घरीं नेण्याकरितां आले. नंतर त्यांणीं गुरूला योग्य गुरुदक्षणा देऊन, त्यांचा निरोप घेऊन, आपल्या घरीं गेले, नंतर विद्याधिराजानें आपल्या मुलाची बुद्धि कशी आहे, व याणें अध्ययन कसें केलें आहे, त्याची परीक्षा पाहण्याकरितां वेदांतील कांहीं प्रश्न केले; नंतर मीमांसा, काणाद, गौतम, सांख्य, आदिकरून षट्दर्शनांतही प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें शिवगुरूंनीं उत्तमप्रकारें दिलीं, ह्मणजे ज्यांत परमत खंडन करून आपलें मत यथायोग्य कोटिक्रमानें स्थापन केलें. अशीं तीं उत्तरें ऐकून विद्याधिराजांना फार संतोष झाला. कारण अगोदर मुलाची वाणी जरी शास्त्रहीन व असंस्कृत असली तरी आनंदाला कारण होते; मग ही वाणी तर सर्वशास्त्रसंमत, अशी ऐकून आनंद होईलच यांत कांहीं संशय नाहीं. नंतर विद्याधिराजांनीं शिवगुरूच्या विवाहाकरितां, त्या प्रांतांत राहणारा मद्यपंडित या नामेंकरून एक ब्राह्मण होता; त्याच्या पाशीं कन्येची याचना केली. पुढें उत्तम मुहूर्त पाहून त्याचा विवाह केला. नंतर त्या उभयतांनीं आपल्या स्वकर्मानें उत्तमप्रकारें कालक्रमण

केलें. परंतु त्यांना संतति झाली नाहीं. ह्या वर्षी होईल पुढील वर्षी होईल अशा प्रकारें आशा करितां करितां त्यांचें अर्धें आयुष्य निघून गेलें, तथापि संतति झाली नाहीं. एके समयीं शिवगुरू आपल्या भार्येला बोलले कीं, आपल्याला संतति नाहीं; त्यामुळें आपल्याला उभयलोक शून्य झाले आहेत. कारण **"नापुत्रस्य लोकोऽस्ति"** ह्मणजे अपुत्राला परलोकप्राप्ति नाहीं, अशी श्रुति आहे; व इहलोकींही वंशवृद्धी न झाल्यानें पुढील वंशाची प्रसिद्धीही नष्ट झाली, करितां पुत्रप्राप्ति जेणेंकरून होईल तो यत्न केला पाहिजे. नंतर भार्या बोलली कीं, आपण उभयतां शंकराची सेवा करूंया, ह्मणजे त्याच्या प्रसादानें आपणांस खचितच संतति होईल. तो इच्छित देण्याविषयीं समर्थ आहे. याविषयीं उपमन्यूची[1] कथा प्रसिद्ध आहे. याप्रमाणें उभयतांनीं विचार करून श्रीशंकराची सेवा करण्याला आरंभ केला; तो असा कीं, कांहीं दिवस एकभुक्त, कांहीं दिवस उपोषण, कांहीं दिवस केवल जलपान, व कांहीं दिवस अगदी निरशन, याप्रमाणें त्या वृषक्षेत्राचे ठिकाणीं राहून सेवा केली. असें करीत असतां, श्रीशंकरांनीं विप्रस्वरूप धारण करून शिवगुरूंनीं शयन केलें असतां स्वप्नामध्यें येऊन विचारिलें कीं

---

१ उपमन्यूनें आपले सोबतीचीं मुलें दूध पितात असें पाहून आपल्य आईपाशीं दुधाबद्दल फार आग्रह धरला परंतु घरीं अत्यंत दरिद्र अस त्यामुळें दूध कोठून मिळणार! तेव्हां त्याच्या आईनें पिठामध्यें पाणी घालून हें दूध घे असें सांगून त्याला दिलें तेव्हां तें प्राशन करून त्याल जो आनंद झाला तेणेंकरून तो नाचूं लागला. जेव्हां हें वर्तमा बाकीच्या मुलांना समजलें तेव्हां याची थट्टा करून हांसूं लागले. तेव्ह त्याणें हसण्याचें कारण विचारल्यावरून त्यांणीं तो सर्व प्रकार सांगितला तेव्हां त्याणें शंकराची अराधना केली आणि क्षीरसमुद्राचाच अधिपति होऊन बसला.

मी तुह्मां उभयतांच्या तपानें संतुष्ट झालें करितां इच्छित वर मागावा. तेव्हां शिवगुरु ह्मणाले आह्मांला संतति नाहीं, ती कृपा करून द्यावी. तेव्हां शंकर ह्मणाले तुह्मांला बहुत वर्षें आयुष्य व अल्पज्ञ असे बहुत पुत्र पाहिजेत किंवा सर्वज्ञ व अल्पायु असा एक पुत्र पाहिजे ? तेव्हां शिवगुरूंनीं विचार करून सांगितलें कीं, जरी अल्पायु असला तरी चिंता नाहीं परंतु सर्वज्ञ असा पुत्र पाहिजे. तेव्हां श्रीशंकर बोलले कीं तुह्मांला सर्वज्ञ असा पुत्र होईल. आतां तुह्मीं तप न करितां घरीं जावें. नंतर तीं उभयतां त्या ब्राह्मणवाक्यावर विश्वास ठेवून शंकराचें ध्यान करीत घरीं आलीं; आणि ब्राह्मणांना अनेक प्रकारें सुवर्णादिक दानें देऊन संतोषित केलें. नंतर शिवप्रसादानें तिला शिवतेजानें युक्त असा गर्भ राहून, तो दिवसें दिवस वाढूं लागला. नंतर दशममासीं शिवगुरुपत्नी जी सती ती शुभग्रहयुक्त अशा शुभलग्नीं, ज्याप्रमाणें पार्वती कुमाराला (कार्तिकेयाला) प्रसवती झाली, त्याप्रमाणें पुत्रातें प्रसवली. त्या वेळीं शिवगुरूंनीं स्नान करून भूमि, गाई, सुवर्ण आदिकरून दानें केलीं. तेव्हां दिशा सुप्रसन्न झाल्या, वायु सुगंध वाहूं लागला, तसेंच सर्व प्राणिमात्रांनीं आपला वैरभाव सोडून ते आनंदानें परस्पर खेळूं लागले, वृक्षांनीं पुष्पांची व फलांची वृष्टि केली. शिवाय असा चमत्कार झाला कीं; अद्वैतमतविरुद्ध मतांचें अवलंबन करणाऱ्यांच्या हस्तांतून एकाएकीं सर्व पुस्तकें गळून पडलीं. वेदांतशास्त्राला आनंद झाला, व व्यासाचें हृत्कमल विकासाला पावलें, देवांनीं पुष्पवृष्टि केली. गंधर्व गाऊं लागले. होमशाळेंतील अग्नि प्रदीप्त झाले. त्या काळीं ती सती जशी पृथ्वी मेरुपर्वतानें शोभते, व आकाश जसें सूर्याचे योगानें शोभतें, तशी विद्याविनययुक्त अशा पुत्रानें शोभली. नंतर

ज्योतिष्यांनीं जातक करून त्या जन्मकालाचें फल सांगितलें कीं, हा पुत्र सर्वज्ञ, स्वतंत्र शास्त्राची रचना करणारा, व महान् पंडितांना सभेमध्यें जिंकणारा असा होईल. व सर्व भूतलीं याची किर्ति होईल. आतां शिवगुरूंनीं आयुष्याबद्दल विचारिलें नाहीं; व त्यांणीं सांगितलेंहि नाहीं. कारण शुभ जाणणारे जे जन आहेत ते, अशुभ जाणत असतांही अशुभ बोलत नाहींत. नंतर शिवगुरूंनीं स्वतः सूतिकागृहांत जाऊन पुत्रमुख पाहिलें तेव्हां ग्रीष्मऋतूच्या उन्हानें तप्त झालेला, जसा चंद्रदर्शनानें आनंदित होतो, तसा शिवगुरूला आनंद झाला. नंतर जातकर्मादि संस्कार करून त्याचें नांव लोकाचें कल्याण करणारा असा पुत्र होईल ह्मणून, **शंकर** असें अन्वर्थ ठेविलें. नंतर **शंकर** क्रमानें रांगूं लागले व चालूंहि लागले. व किंचित्किंचित् मधुर भाषणही बोलूं लागले. अशा प्रकारें दोन वर्षें गेलीं.

ह्याच वेळीं कांहीं देवांनीं शंकराचार्यास सहाय्य करण्याकरितां अवतार घेतले. त्यांत **पद्मपाद** हे विष्णूचे अंशभूत असून सर्व शास्त्रांत निष्णात असे होते. **हस्तामलक** ह्मणून जे होते तो वायूचा अवतार. व **तोटकाचार्य** या नामेंकरूनही वायूचाच अंशभूत अवतार होते. तसेंच **उदंक** या नामेंकरून नंदींनीं अवतार घेतला. **सुरेश्वर**[1] नामेंकरून ब्रह्मदेवाचा[2] अवतार व **आनंदगिरी** बृहस्पतीचा[3] अवतार. **सनन्द** ह्मणून होते तो सूर्याचा अवतार. व वरुणांनीं **चित्सुख** या

---

१ ज्याला मंडनमिश्र असें प्रसिद्ध नांव होतें तो. २ याविषयीं मतांतर आहे तें असें. नास्तिक जे चार्वाकादिक त्यांचें शास्त्र बृहस्पतीनें दैत्यसंमोहनाकरितां केलें परंतु ब्रह्मदेवाला राग येऊन त्याणें सुरगुरूला शाप दिला तेव्हां ते भूलोकीं मंडनमिश्र या नांवानें अवतीर्ण झाले. ३ हा शंकरांनीं प्रेरणा केल्यावरून नंदिकेश्वरांनीं अवतार घेतला असेंहि कोणी म्हणतात.

नामेंकरून अवतार घेतला. या प्रमाणें देवांनीं अवतार घेतले. नंतर आपल्या पतीला[१] सहाय्य व्हावें या हेतूनेंच काय ब्रह्मदेवाच्यो स्त्रियेनें सरस्वती या नामानें प्रसिद्ध असा अवतार घेतला. ती शोण ह्मणून एक नद आहे त्याचे तीरीं राहणारा विष्णुमित्र याची कन्या; ती सर्व शास्त्रांत निपुण अशी झाली. तेव्हां सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. तिणें अधिपतीची कीर्ति ऐकिली त्याणेंही तिची कीर्ती ऐकिली. तेव्हां उभयतांलाही परस्परांचे दर्शनाची इच्छा उत्पन्न झाली. नंतर उभयतांच्या मातापितरांनीं मिळून त्यांचा विवाह त्या उभयतांच्या परस्पर प्रेमामुळें, व त्यांचे इच्छेस्तव मोठ्या समारंभानें केला. नंतर ज्या वेळीं मुलगी सासरीं जाऊं लागली त्या वेळीं तिच्या आईनें उपदेश केला कीं, मुली तूं आतां आपल्या सासरीं जाणार, तेथें हा बाल्यभाव टाकून आपल्या शीलरक्षणाविषयीं तत्पर अस. कारण आतां हा तुझा बालस्वभाव त्या ठिकाणीं संतोष देणारा नाहीं. तेथें आपल्या पतीच्या आज्ञेंत वागत जा, कारण स्त्रियांचें विवाहाचे पूर्वी रक्षण आईबाप करितात आणि नंतर पति रक्षक होतो, करितां निरंतर पतीला शरण असावें त्याप्रमाणें सासू, श्वशुर, दीर आदिकरून यांचे आज्ञेचा कधींही भंग करूं नको. अशा प्रकारें उपदेश करून तिची रवानगी करून दिली. ती सासरीं गेल्यानंतर तीं उभयतां स्वकर्माच्या ठिकाणीं तत्पर अशीं आनंदानें कालक्रमण करितीं झालीं. याप्रमाणें आचार्याला सहाय्य देण्याकरितां देवांनीं आपआपल्या अंशांनीं अवतार घेतले.

इकडे शंकराचार्यांनींहि बाल्यत्वाला उचित अशा अनेक क्रीडा केल्या. त्यांना प्रथमवर्षींच अक्षरज्ञान, व देशाची भाषा,

१ मंडनमिश्र यानें दुसरें नांव.

ह्यांचें ज्ञान झालें. दुसऱ्या वर्षी पुस्तकें वाचूं लागले. तिसऱ्या वर्षी काव्य, कोश, पुराण, आदिकरून ह्यांचें ज्ञान झालें; व स्वतः त्याचा अर्थ करण्याची शक्ति आली. शिवाय त्यांना एकवार श्रवणानेंच ग्रहण करण्याची शक्ति असल्यामुळें त्यावर गुरु अत्यंत ममता करीत; नंतर शिवगुरूंनीं त्याचा तृतीयवर्षी चूडाकर्मविधि[१] केला. तेव्हां त्यांनीं सर्व वेदांचें अध्यन केलें आणि तर्कादिशास्त्रांत निष्णात अशा आचार्यांनीं अनेक पाखंड मतांचें खंडन करून, तत्पक्षीयांचा मोड केला. असा बुद्धिवान् पुत्र ज्याला झाला, त्याला किती आनंद होईल हें सांगण्याची गरज आहे असें नाहीं. कारण मूर्ख पुत्राच्या कदाचित्समयोचित भाषणानें सुद्धां मातापितरांना अत्यंत आनंद होतो; मग अशा पुत्राच्या भाषणानें आनंद होईलच. असो, याप्रकारें आनंदसमुद्रांत केवळ मग्न अशा त्या शिवगुरूंनीं आतां मुलाचें पंचमवर्षीच उपनयन करावें असें मनांत आणिलें; परंतु " **धातुरिच्छावलीयसी** " ह्मणजे आपल्या इच्छेपेक्षां विधात्याची इच्छा प्रबल, ह्मणून त्याचे इच्छेप्रमाणेंच सर्व घडणार, या मुळें तो योग घडून न येतां मध्येंच शंकराचार्यांच्या तृतीयवर्षानंतर व पंचमवर्षाच्या आंत ह्मणजे चतुर्थवर्षीच शिवगुरूचा काल झाला. नंतर त्यांचें और्ध्वदेहिक[२] केलें. व पुढें एक वर्षानंतर आचार्यांचे मातेनें त्यांचें उपनयन पंचमवर्षी आपले बांधवजन बोलाऊन यथाविधि केलें. नंतर आचार्यांनीं गुरुपाशीं शिक्षादिक सहा अंगें व चार वेद मिळून दशग्रंथांचा अभ्यास केला. त्या कालीं लहान वयांत इतकें अध्ययन केलें, ह्मणून संपूर्ण लोक आश्चर्य करूं लागले. शिवाय गुरुपाशीं जे इतर

---

१ हा विधि शेंडी राखण्याचा आहे. ह्यालाच चौलकर्म असें म्हणतात.
२ मरणोत्तर क्रिया.

शिष्य होते, त्यांना त्यांची बरोबरी होईना. नंतर दोन तीन महिन्यांत सर्व शास्त्रांचा अभ्यास करून, **आचार्य** गुर्वाज्ञेनें तेथेंच अन्य शिष्यांनाहि सर्व शास्त्रांचे पाठ सांगूं लागले. याप्रमाणें वेदांमध्यें केवल ब्रह्मदेव, वेदांगें जीं शिक्षा आदिकरून त्यांमध्यें गार्ग्य, आणि वेद, व तदंगें यांच्या कथा तात्पर्यकथनाविषयीं केवल वाचस्पतीच कीं काय, व वेदोक्त कर्मवर्णनाविषयीं जसे जैमिनी, व वेदवचनतत्वज्ञानमूलामध्यें केवल व्यास असे अल्पवयांतच सर्वांस भासूं लागले, व हे केवल वाणीविलासानें युक्त असे मूर्तिमान् व्यासच आहेत, असें सर्व जन ह्मणूं लागले. एकदां **शंकराचार्य** गुरुगृहीं असतां आपल्या सहाध्यायांसह भिक्षेला निघाले, ते एका अत्यंत दरिद्री अशा ब्राह्मणाचे घरीं गेले, तेव्हां ब्राह्मणस्त्रीनें सर्वांस वंदन करून, प्रार्थना केली कीं; मी अत्यंत निर्धन व हतभागिनी आहें, करितां यत्किंचित्हि देण्याविषयीं समर्थ नाहीं. असें सांगून तिनें पुनः विचार केला कीं, मीं यांना भिक्षा नाहीं ह्मणून सांगितलें, तेव्हां हे आतां विमुख जातील असें वाटून तिनें एक आंवळा मोठ्या भक्तीनें **आचार्यांला** दिला. आणि सांगितलें कीं, ही भिक्षा घेऊन कृपा करावी. तेव्हां **आचार्यांच्या** अंतःकरणांत दया येऊन त्या वेळीं त्यांनीं लक्ष्मीचा स्तव केला. तेव्हां ती प्रगट होऊन स्तवाचें कारण विचारितां **आचार्य** बोलले कीं, ह्या ब्राह्मणाला आपण आपल्या कृपाकटाक्षानें सधन करावें. तेव्हां देवी बोलली कीं, ह्यानें पूर्वजन्मीं कोणाला कांहीं दिलें नाहीं, तेव्हां ह्याला सधन कसें करावें ? तेव्हां **आचार्य** बोलले कीं, ज्याला तुझें दर्शन झालें त्याचा पूर्वदोष कांहींहि असो परंतु तुझ्या दर्शनाचें फल झालेंच पाहिजे. व यानें मला आमलकीफल भक्तीनें अर्पण केलें आहे, करितां त्याचें फल त्यास

दिलेंच पाहिजे. या भाषणानें देवीला मोठा संतोष होऊन तिनें सुवर्णाच्या आंवळ्यांनीं तें गृह पूर्ण केलें, आणि आपण स्वस्थानीं गेली. नंतर हें सर्व कृत्य पाहून संपूर्ण लोक मोठें आश्चर्य करून **आचार्यांची** स्तुति करूं लागले. व ती कीर्ति सर्वत्र प्रसिद्ध झाली. नंतर **आचार्य** आपल्या गुरूच्या घरीं सर्व मंडळीसह गेले.

याप्रमाणें **आचार्य** गुरुगृहीं सकल वेदशास्त्रादिकांचा अभ्यास करून त्यांत पारंगत झाले. नंतर सप्तमवर्षी आपल्या घरीं येऊन वेदाचें अध्ययन[1] व अध्यापन[2] या योगानें व मातेच्या सेवेनें कालक्रमण करूं लागले. तेव्हां त्यांच्या तेजानेंच लोक त्यांस मान देऊं लागले. कोणे एके काळीं त्यांची माता **श्रीअंबिका** ही नदीवर स्नानाला गेली असतां, नदी दूर असल्यामुळें सूर्यतापानें अत्यंत त्रस्त होऊन मूर्च्छित झाली. तेव्हां तिची ती स्थिति पाहून जवळच्या लोकांनीं तिला घरीं नेलें. असें पाहून **आचार्यांनीं** नदीपाशीं जाऊन प्रार्थना केली कीं, त्वां आमच्या घरा नजीक वहावें. तेव्हां तिनें मान्य करून उद्यां प्रातःकाळीं तसें करीन असें सांगितलें तें ऐकून **आचार्य** घरीं आले. दुसरे दिवशीं सकाळीं **आचार्यांच्या** गृहा सन्निध स्वच्छोदक वहाणाऱ्या अशा त्या नदीला पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. नंतर ती कीर्ति त्या केरल देशच्या राजानें ऐकून त्यांच्या दर्शनलालसेनें उत्तम पोषाख व कांहीं संपत्ति व हत्ती वगैरे देऊन, त्यांना आपल्या नगरांत आणावें अशा हेतूनें आपल्या प्रधानांपैकीं जो अत्यंत ज्ञाता होता त्याला पाठविलें; त्यानें जाऊन, **आचार्यांला** वंदन करून येण्याचा उद्देश कळविला. आणि हें द्रव्य हत्ती व हीं वस्त्रें, वगैरे राजानें

१ स्वतः करणें. २ दुसऱ्यास सांगणें.

आपल्याकरितां पाठविलीं आहेत, त्यांचा स्वीकार व्हावा. आणि आपल्या चरणरजानें राजगृह पवित्र करावें अशी राजाची इच्छा आहे, असें कळविलें. तेव्हां आचार्य बोलले, आमचें भिक्षा हें भक्षण, कृष्णाजिन हें वस्त्र, व कष्टसाध्य अशीं जीं त्रिकाल स्नानादि तीं करून आह्मी कालक्रमण करणारे; करितां, हत्ती वगैरे जें आपण आणिलें आहे, त्याचा आह्मांला कांहीं उपयोग नाहीं. करितां आपण जाऊन राजाला असेंच कळवावें. अशी ती आचार्यवाणी श्रवण करून तो प्रधान परत जाऊन संपूर्ण वर्तमान राजाला कळविता झाला. तेव्हां तर राजाला फारच दर्शनाची इच्छा झाली, आणि एक दिवस तो स्वतः दर्शनाला आला, तेथें येऊन वंदन करून, त्यांनीं दिलेल्या आसनावर बसल्यानंतर, आचार्यांनीं कुशल प्रश्न करून येण्याचें कारण विचारिलें; तेव्हां राजानें दहा सहस्र मोहोरा पुढें ठेवून विनंति केली कीं, आपल्या केवल दर्शनाकरितां मी आलों आहें, व कांहीं ग्रंथ केले आहेत तेही आपण अवलोकन करावे, अशी इच्छा आहे. असें ह्मणून ज्यांत सर्व शृंगारादि रस पूर्ण आहेत, अशीं तीन नाटकें त्यांना दाखविलीं तीं पाहून त्याच्या बुद्धीबद्दल प्रशंसा करून मोहोरांबद्दल आचार्य बोलले कीं, राजा, ह्या द्रव्याची आह्मांला इच्छा नाहीं, करितां आपण हें परत न्यावें आणि तशी इच्छा नसेल तर एखादें देवालय बांधावें ह्मणजे झालें. आतां याशिवाय तुझी काय इच्छा असेल ती माग. अशी ती अमृतरूपी व प्रसादोन्मुख वाणी श्रवण करून राजानें सांगितलें कीं, मजला संतान नाहीं; करितां माझ्या सारखाच मला पुत्र व्हावा एवढीच इच्छा आहे. हें ऐकून आचार्य बोलले कीं, तुझ्यासारखा तुला पुत्र होईल. असा वर देऊन जाण्याविषयीं निरोप दिला. नंतर राजा अत्यंत

आनंदयुक्त होऊन आज्ञा घेऊन आपल्या नगरीला गेला. पुढें त्याला त्याप्रमाणें पुत्र झाला.

नंतर आचार्यांनीं षड्दर्शनें व वेदे यांमध्यें बहुत शिष्य पढविले. पुढें माता व बंधुवर्ग यांनीं विचार केला कीं, यांचा आतां विवाह करावा; कारण संपूर्ण विद्येमध्यें निष्णात असे असून मोठा लौकिकही संपादन केला आहे, तेव्हां ह्यांना योग्य अशी स्त्री मिळाली पाहिजे, ह्मणून ते सर्व बंधुजन त्या शोधाला लागले. इकडे साक्षात् शंकर भूतलीं अवतीर्ण झाले आहेत, ह्मणून त्यांचे दर्शनाकरितां अगस्त्य, उपमन्यु, आदिकरून ऋषी आचार्यांच्या घरीं आले. तेव्हां त्यांस आचार्यांनीं वंदन करून आसनादि उपचार देऊन त्यांची मधुपर्कपूर्वक पूजा केली. व सर्व आपआपल्या स्थानीं बसून मोक्षमार्गसंबंधी गोष्टी करितांहेत इतक्यांत आचार्यांची माता येऊन, सर्वांस वंदन करून बोलली कीं, आपल्या येण्यानेंच आह्मीं कृतार्थ झालों, कारण, या कलियुगांत आपल्यासारख्यांचीं दर्शनें होणें हें अत्यंत दुर्लभ आहे. आतां तुमच्या अग्रभागीं जो माझा पुत्र आहे, ह्यानें आपल्या अल्पवयांत संपूर्ण विद्या संपादन केली. व त्याची लीलाही अद्भुत आहे, करितां ह्याचें मोठें कौतुक वाटतें. तेव्हां ह्यानें पूर्वजन्मीं असें कोणतें तप केलें होतें कीं, ज्यापासून असलें सामर्थ्य ह्याला प्राप्त झालें. तें मला ऐकण्याची इच्छा आहे. करितां जर मी ऐकण्यास योग्य असेंन तर सांगण्याची कृपा व्हावी. याप्रकारें तिचें वचन ऐकून अगस्त्य ह्मणाले, पूर्वीं तुझ्या पतीनें पुत्रप्राप्तीकरितां शंकराची आराधना केली, तेव्हां शंकर प्रसन्न होऊन वर माग असें ह्मणतांच मला पुत्र व्हावा अशी त्यानें प्रार्थना केली. तेव्हां शंकर ह्मणाले,

---

१ दोन न्याय, दोन मीमांसा, दोन योग, मिळून सहा दर्शनें (शास्त्रें). २ ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद.

"वरयस्व शतायुषः सुतानपि वा सर्वविदं मितायुषम् ।
सुतमेकमितीरितः शिवं सति सर्वज्ञ मयाचतात्मजम् १"

अर्थ–शतायु असून अल्प जाणते असे वहुत पुत्र पाहिजेत किंवा अल्पायु असून सर्वज्ञ असा एक पुत्र पाहिजे. अशी आज्ञा केल्या नंतर हे सती, तुझ्या पतीनें सर्वज्ञ असा एकच पुत्र मागितला. तेव्हां सर्वज्ञ पुत्र होईल असा वर देऊन शंकर स्वस्थानीं गेले. नंतर शंकरांनीं स्वतःच पुत्ररूपानें तुमच्या उदरीं जन्म घेतलं. कारण देवादिकांमध्येंही त्यांचेवांचून दुसरा कोणीही सर्वज्ञ नाहीं. याप्रकारें अगस्तीचें भाषण ऐकून पुनः प्रश्न केला कीं, मुलाचें आयुष्य किती आहे तें सांगावें; कारण सर्वज्ञ परंतु अल्पायु आहे, असें आपण सांगितल्यावरून अत्यंत खेद होतो. असें तिचें भाषण ऐकून **अगस्त्यऋषी** बोलले कीं ह्या तुझ्या पुत्राला सोळा वर्षें आयुष्य आहे, तथापि कांहीं कारणानें आणखी सोळा वर्षें भूतलीं वास करील. मिळून एकंदर बत्तीस वर्षें आयुष्य आहे, असें बोलत असतां संपूर्ण ऋषी संकेतानें तें भाषण पूर्ण करूं न देतां अगस्तीऋषीसह **आचार्यां**चा निरोप घेऊन स्वस्थानीं गेले. सर्व ऋषि गेल्यानंतर ज्याप्रमाणें महावाताच्या योगानें कदलीनें पतन पावावें त्याप्रमाणें ती सती अत्यंत शोकानें मूर्च्छित पडली. तेव्हां **आचार्य** ती मातेची स्थिति पाहून तिला ह्मणाले कीं, आई, या संसाराची स्थिति क्षण भंगुर आहे, तेव्हां शोक करणें हें व्यर्थ आहे. कारण रथाचे ध्वजावरील सूक्ष्म वस्त्र जसें अत्यंत चंचल असतें, त्याप्रमाणें चंचल जें हें शरीर त्याविषयीं मूढही शोक करीत नाहींत; आणि तूं तर सुज्ञ आहेस, तेव्हां शोक करणें हें तुला योग्य नाहीं. कारण जसे जन, भिन्न मार्गांनें येऊन एकत्र मिळतात आणि पुनः आपआपल्या मार्गांनें जातात

त्याप्रमाणें हा, पुत्र दारा आदिकरून यांचा समागम आहे; ह्मणून तूं शोक करूं नको. आतां या संसारांत सुखाचा लेश नसून केवळ दुःख आहे, ह्मणून मी चतुर्थाश्रम घेऊन संसार बंधापासून मुक्त व्हावें असें इच्छितों. करितां तसें करण्याविषयं आपण आज्ञा द्यावी. असें आचार्यांचें भाषण ऐकून तिल द्विगुणित दुःख झालें; कारण पुत्र अल्पायु आहे, असे ऋषिवाक्य पूर्वी ऐकिलें होतें आणि मी संन्यास घेणार, असें जेव्हां दुसरें पुत्रवाक्य ऐकिलें तेव्हां तिला फारच दुःख झालें. कंठ सद्गदित होऊन ती भाषण करिते, मुला, ही संन्यास घेण्याची बुद्धि सोडून देऊन गृहस्थाश्रम कर; कारण यज्ञादिक क्रिया करून नंतर संन्यास घ्यावा असा क्रम आहे. शिवाय मला सोडून जाणें हेंहि तुला योग्य नाहीं; कारण पतीच्या पश्चात् तुझ्यावांचून माझें रक्षण करणार कोणी नाहीं. आणि कालगतीनें मी मरण पावलें असतां तुझ्यावांचून माझें और्ध्वदेहिक कोण बरें करील ? असें बोलून अत्यंत शोकानें ग्रस्त होऊन मूर्च्छित झाली. याप्रमाणें शोक करणारी जी माता तिचा तो मोह उत्तम वाणीनें घालवून आतां पुढें काय करावें, असा विचार करून या अष्टमवर्षीच कसेंही करून मातेची थोडी तरी पडती आज्ञा घेऊन संन्यास घ्यावा असा आचार्यांनीं निश्चय केला. आणि ती आज्ञा अशा युक्तीनें घ्यावी असा विचार करून ठरविलें कीं, या रीतीनें आज्ञा मिळेल. मग एके दिवशीं नदीमध्यें स्नानाच्या उद्देशानें ह्मणून जाऊन खोल पाण्यांत प्रवेश केला. इतक्यांत एका मगरानें एक पाय धरला तेव्हां आचार्यांनीं मोठ्यानें आरोळी मारिली. तो पुत्राचा शब्द ऐकून माता तेथें येऊन पाहते तों मुलाचा पाय मगरानें धरिला आहे. व मुलगा सोडविण्याविषयीं यत्न करीत आहे,

परंतु तो सुटत नाहीं, असें पाहून फार शोक करूं लागली, इतक्यांत आचार्य बोलले कीं, आई जर करितां मला संन्यास घेण्यास आज्ञा होईल, तर मात्र मजला हा सोडील, नाहीं तर सोडित नाहीं. तेव्हां तिनें विचार केला कीं, जरी संन्यास घेतला तरी पुत्राचें दर्शन होईलच, करितां अनुज्ञा दिली असतां चिंता नाहीं; असा विचार करून आज्ञा दिली. तेव्हां आचार्यांनीं आपल्या मनानें संन्यासदीक्षा घेतांच त्या नक्रानें त्यांस सोडिलें. यांत आचार्यांनीं असें सुचविलें कीं, संसाररूपी नक्रापासून मुक्त होण्यासही संन्यासावांचून दुसरें साधन नाहीं. नंतर आचार्य तीरावर येऊन आईला ह्मणाले, आई, आतां मला आज्ञा द्यावी; कारण संन्याशाला उचित जे धर्म ते मला केले पाहिजेत व ते करण्याविषयीं मी इच्छितों. आतां तुझ्या अन्नवस्त्रादिकाची व्यवस्था या वडिलोपार्जित धनानें होईल. आतां तूं असें ह्मणशील कीं, संन्यास घेतल्यावर जर कदाचित् रोगादिकांनीं पीडित झालें अथवा मृत झालें असतां माझी सेवा अथवा और्ध्वदेहिक कोण करील; तर हे आपले आप्त व बंधुजन तुला सहाय्य करतील; व और्ध्वदेहिकही करतील, करितां मला जाण्यास आज्ञा असावी. तेव्हां ती ह्मणाली कीं, जर माझें और्ध्वदेहिक दुसरे करतील तर तूं जन्म घेऊन फल काय? कारण और्ध्वदेहिक करणें हेंच पुत्राचें मुख्य कर्तव्य आहे व याविषयीं सर्व धर्मशास्त्रग्रंथांत प्रमाणें आहेत, करितां तें तूंच केलें पाहिजे. तेव्हां ती गोष्ट मान्य करून आचार्य ह्मणाले आई ज्या वेळीं तूं रोगानें पीडित होशील किंवा तुझा अंतकाल समीप येईल, त्या वेळीं तूं माझें स्मरण कर ह्मणजे मी तुझ्याजवळ येईन, आणि पुढें और्ध्वदेहिक संस्कारही करीन, असें मातेला सांगून आपल्या बंधुवर्गाच्या स्वाधीन आईला करून

रक्षण करण्याविषयीं सांगितलें आणि आईला ह्मणाले, कीं हे आपले बांधव तुझें रक्षण माझ्यापेक्षां शतपट करितील. करितां कोणत्याही प्रकारें चिंता करूं नये. याप्रकारें व्यवस्था करून संन्यास घेण्याकरितां गुरूकडे जाण्याचा निश्चय केला. इतक्यांत जी नदी मातेला श्रम होऊं नये ह्मणून **आचार्यांनीं** आपल्या गृहानजीक आणिली होती; तिच्या प्रवाहानें तेथें नदीच्या तीरीं असलेली एक कृष्णाची मूर्ति हालूं लागून स्थानापासून भ्रष्ट झाली होती. तेथें असा शब्द झाला कीं, मी या नदीच्या प्रवाहतरंगानें पीडित झालों आहें; करितां माझी योग्य ठिकाणीं स्थापना करावी. तेव्हां **आचार्यांनीं** त्या मूर्तीची स्थापना आपल्या गृहाच्या संनिध करून तिच्या पूजेची वगैरे व्यवस्था बांधवांना सांगून आईची आज्ञा घेऊन गुरूपासून संन्यास घेण्याकरितां ते गृहांतून निघाले, नानाप्रकरचीं वनें, नगरें, ग्राम, पर्वत, नद्या इत्यादिकांचें उल्लंघन करून ठिकठिकाणीं अद्वैतविरोधी मताचें खंडण करीत व अद्वैतसिद्धांत स्थापन करीत **नर्मदा**तटाकीं ज्या वनामध्यें **गोविंदनाथांचा** आश्रम होता त्या वनांत त्यांनीं प्रवेश केला.

तेथें तो गोविंदनाथांचा आश्रम पहिला कीं, ज्यामध्यें नानाप्रकारचे पनसादिक फलवृक्ष व चंपक आदिकरून पुष्पवृक्ष आहेत, असा तो रम्य आश्रम पाहून त्या आश्रमांत आचार्यांनीं प्रवेश केला. आणि त्यांचे गुहेला तीन प्रदक्षिणा करून द्वारामध्येंच साष्टांगनमस्कार घालून गोविंदनाथांचा स्तव करण्यास आरंभ केला; कीं जो विष्णूचा पर्यंक ह्मणजे शय्यास्थान व शंकराचें भूषण व ज्यानें हीं सर्व पृथ्वी धारण केली, असा जो शेष त्याचा साक्षात् आपण अवतार आहां. तसेंच आपलीं सहस्रमुखें असतां आपले शिष्य भय पावतील ह्या हेतूनेंच कीं

काय एकच मुख धारण करून, जे संपूर्ण शिष्यांवर अनुग्रह करणारे पतंजली तेच साक्षात् आपण आहां. तसेंच ज्यानें पाताळीं जाऊन साक्षात् शेषापासून अशेषज्ञान संपादन केलें व अखिल जगतावर उपकार करण्याच्या उद्देशानें, ज्यांनीं व्याकरणावर महाभाष्य केलें; ते पतंजलीच आपण आहां. आणि व्यासशिष्य जे शुक त्यांचे शिष्य जे गौडपाद त्यांपासून अखिल ब्रह्मज्ञान प्राप्त झालेले अशा आपणास ब्रह्मज्ञान प्राप्त व्हावें ह्मणून अनन्यभावानें शरण आहें, करितां मजवर कृपा व्हावी. अशी ती गंभीरवाणीनें युक्त विज्ञप्ति ऐकून, गोविंदनाथांनीं विचारलें कीं, तूं कोण आहेस ? तेव्हां आचार्य बोलले:—

स्वामिन्नहं न पृथिवी न जलं न तेजो
न स्पर्शनो न गगनं न च तद्गुणा वा ।
नापींद्रियाण्यपि तु विद्धि ततोऽवशिष्टो
यः केवलोस्ति परमः स शिवोहमस्मि ॥ १ ॥

**अर्थ**—हे स्वामिन्, पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश व त्यांचे गुण, यांतून मी कोणी नाहीं. तसेंच इंद्रियांचा समुदायही मी नाहीं, तर याहून निराळा असा, शिवरूपी मी आहें. याप्रमाणें अद्वैतसाक्षात्कारयुक्त असें आचार्यांचें वचन ऐकून गोविंदनाथांचे हृदयांत अत्यंत आनंद झाला; ते ह्मणाले कीं, जो प्रसिद्ध शंकर तोच तूं आहेस; असें मी समाधिदृष्टीनें जाणतों. नंतर आचार्यांनीं जवळ येऊन गुरूची पादपूजा केली. यांत आचार्यांनीं असें सुचविलें कीं गुरूला शरण गेल्यावर त्यांची पादपूजा अवश्य करावी. पुढें आचार्य तेथें कांहीं दिवस राहिल्यावर त्यांस गोविंदनाथांनीं उपदेश देऊन परमहंस दीक्षा दिली.

याप्रमाणें आचार्य गुरुगृहीं असतां एकदां वर्षाकाळीं बहुत

पर्जन्य पडल्यामुळें तेथील नदीला महापूर येऊन, तीराव असणारे सर्व वृक्ष तर वाहिलेच, परंतु तेथें तीरावर वास क णारे संपूर्ण लोकही वाहूं लागले; तेव्हां त्यांचा तो आक्रोश श्रव करून परमदयाळू असे जे आचार्य त्यांनीं गुरूकडे पाहून, एक कमंडलूला अभिमंत्रण करून नदीला आज्ञा केली कीं, या क मंडलूमध्यें तूं प्रवेश करावा; तेव्हां तो सर्व प्रवाह त्या कमंडलूंत शिरला; आणि सर्व लोक दुःखापासून मुक्त झाले. आतां हें कृत्य कदाचित्, असंभवनीय दिसेल, परंतु जो साक्षात् शंक राचा अवतार त्याची कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ अशी शक्ति मानली तर वरील आक्षेपास दत्तजलांजलीच मिळेल.

नंतर गोविंदनाथांनीं सांगितलें कीं, तुझा अवतार वैदिक-धर्मस्थापनेकरितां आहे; यास्तव तूं आतां जन्ममरणरूप जो संसार हाच कोणी दावाग्नि त्याचा नाश करणारी मेघपंक्ती-रूप जी तत्वपद्धति ह्म० हें सत्य आहे, व हें असत्य आहे, असें स्पष्ट सांगण्याकरितां शंकरपुरी जी काशी तेथें जाऊन कांहीं दिवस वास करावा. पुढें शारीरभाष्य करण्याविषयीं सांगण्याचे पूर्वी त्याविषयींची आख्यायिका सांगण्यास आरंभ केला. पूर्वी हिमालयपर्वतावर अत्रिऋषींनीं यज्ञ केला; त्या वेळीं इंद्रादिक देव व सर्व ऋषि, त्या ठिकाणीं आले होते. त्या वेळीं पराशरपुत्र व्यासही तेथें आले. आणि त्यांनीं वेद शिरोभागाचें (उपनिषद्भागाचें) विवरण[1] चालविलें. त्या वेळीं मीं त्यांना प्रश्न केला कीं, हे आर्य, आपण वेदसमूहाचे विभाग केले; परंतु "अथातो ब्रह्मजिज्ञासा"[2] इत्यादिक आपण केलेलीं जीं

---

१ व्याख्यान. २ हें उत्तरमीमांसेचें प्रथम सूत्र आहे व हीं सर्व सूत्रें श्रीवेदव्यासकृत आहेत. यावर जें आचार्यांनीं भाष्य केलें त्यालाच शारीरकभाष्य असें म्हणतात.

ब्रह्मसूत्रें त्यांवर भाष्य नाहीं, त्यामुळें पाहिजे ते आपल्या मताप्रमाणें हवा तसा अर्थ करितात, • करितां तसें होऊं नये ह्मणून आपण त्या ब्रह्मसूत्रांवर भाष्य करावें. याप्रमाणें माझें भाषण ऐकून, व्यास बोलले कीं, जसा आपण मला प्रश्न केला तसाच सर्व देवांनीं श्रीशंकराला पूर्वी केला तेव्हां मी भाष्य करीन असें त्यांस अभिवचन मिळालें आहे. त्याप्रमाणें तो सर्वज्ञ शंकरच तुझा शिष्य होऊन भाष्य करून तुझें यश विस्तृत करील. याप्रमाणें मला सांगून व्यास कैलास पर्वतावर गेले. तस्मात् सर्व तत्ववेत्त्यांमध्यें श्रेष्ठ जो तूं तो निरवयव अशा निबंधनानें जगदुद्धार करण्याविषयीं यत्न कर. आतां ज्या ठिकाणीं स्वच्छ उदकानें भागीरथी वाहते तेणेंकरून फारच शोभणारी अशी जी विश्वेशपुरी ह्मणजे काशी, तेथें जाऊन त्या ठिकाणीं ब्रह्मसूत्रावर भाष्य करावें. तेथें सर्व देवता तुला सहाय्य करतील. नंतर पूर्ण कृपाकटाक्षानें अवलोकन करून आचार्यांना निरोप दिला. तेव्हां जरी गुरुसंगतीचा विरह होणार ह्मणून दुःख झालें तरी गुरूची आज्ञा शिरसावंद्य करून व गुरूच्या पादकमलावर मस्तक ठेवून निघाले; ते कांहीं दिवसांनीं काशीला आले. तेथें विष्णुपदापासून उत्पन्न व जिचें शंकरानीं मस्तकाचे ठिकाणीं धारण केलें, व जी हिमालयपर्वतापासून प्रकट झालेली, अशा भागीरथीमध्यें स्नान करून ज्याचें सर्व देवादिकही अर्चन करितात अशा त्या विश्वेश्वराचे चरणकमलाचें अभिवंदन करून तेथें कांहीं दिवस वास करण्याचा निश्चय केला.—

इति प्रथमपरिच्छेदः

## परिच्छेद २.

श्रीमच्छंकराचार्य काशीमध्यें असतां कोणीएक ब्राह्मणाचा

पुत्र ज्यानें संपूर्ण वेदाचें अध्ययन केलेलें, व या संसारसमुद्रापासून तरण्याची इच्छा करणारा, व त्याचप्रमाणें वैराग्यसंपन्न असल्यामुळें ज्यानें स्त्रीपरिग्रह वगैरे कांहींच केलेला नाहीं; असा येऊन आचार्यांचे चरणकमलीं वंदन करून तसाच दंडवत् पुढें पडला. तेव्हां त्याला उठवून आचार्यांनीं विचारिलें कीं, तूं कोण आहेस, तुझें राहण्याचें ठिकाण कोणतें, व आज कोठून आलास तें सांग? तुझ्या धैर्यावरून तूं मोठा प्रौढ बुद्धीचा आहेस असें वाटतें. याप्रकारें गुरुवाक्य ऐकून बालक बोलला, महाराज, मी ब्राह्मणपुत्र आहें, कावेरीतीरीं चोल ह्मणून देश आहे तेथील राहणारा, आतां आपण सर्वज्ञ आहांत. तेव्हां जास्त सांगितलें पाहिजे असें नाहीं. आतां मी कां आलों आहें, असें आपण ह्मणाल तर माझे मनांत भूतलावर जे महान् साधू आहेत त्यांचीं दर्शनें घ्यावीं असें येऊन फिरत फिरत येथें आलों; इतक्यांत माझ्या पूर्वसुकृतानें ह्मणा किंवा ईशकृपेनें ह्मणा आपलें दर्शन झालें आणि त्या आपल्या दर्शनाच्या योगानेंच कृतार्थ झालों. आतां आपण माझे गुणदोषांचा विचार न करितां मला संसारसागरापासून मुक्त करावें; कारण आपण पर्जन्याप्रमाणें कृपा करणारे आहांत. महाराज, आपल्या कृपाकटाक्षापासून होणाऱ्या सुखाची बरोबरी, सूर्य, चंद्र, इंद्र, कुबेर, अग्नि, वायु, ब्रह्मदेव यांचे नगरांची प्राप्ति झाली असतांही होऊं शकत नाहीं. याप्रमाणें बालकाचें वाक्य ऐकून आचार्यांनीं त्यावर पूर्ण कृपा करून त्यास संन्यास दिला. आणि आपला शिष्य करून, त्याचें **सनंदन** असें नांव ठेविलें. हाच आचार्यांनीं प्रथम शिष्य केला. नंतर त्यांनीं त्या ठिकाणीं जे मुमुक्षु होऊन शरण आले, त्यांस आपले शिष्य केलें. पुढें साक्षात् विश्वेश्वराचे शिष्य जे वामदेवादिक होते, तेही आचा-

यांचें शिष्यत्व करूं लागले. तेव्हां त्यांसही आचार्यांचे शिष्य असें लोक ह्मणूं लागले; व तेही प्रत्यक्षशंकरसमागमानें आपल्याला धन्य मानूं लागले.

याप्रमाणें आचार्य श्रीकाशीक्षेत्रीं असतां एकेदिवशीं सर्व शिष्यांसहवर्तमान गंगास्नानार्थ व आन्हिककर्मार्थ गंगेवर चालले असतां मार्गांमध्यें भयंकर चार कुत्रीं बरोबर घेऊन चांडालवेषधारी अशा श्रीशंकराची गांठ पडली; तेव्हां आचार्यांनीं त्या अंत्यजाला पाहून एका बाजूला होण्याविषयीं सांगितलें. त्यानें उत्तर केलें कीं, ब्रह्म एक, अद्वितीय, निरवद्य, असंगी आहे, व सत्य, ज्ञान, अनंत असें ब्रह्माचें स्वरूप आहे; व आत्माही अद्वितीय आहे, असें वेदतत्वज्ञ बोलतात. तेव्हां वेदांत्यांमध्यें श्रेष्ठ अशा तुजला भेदबुद्धि असणें हें मोठें आश्चर्य आहे. यावरून हें तुझें काषायित वस्त्र दंड, व कमंडलु, हीं सर्व गृहस्थांना फसविण्याकरितां असावींत, असें मला वाटतें. आतां दूर हो असें जें तुझें ह्मणणें तें आत्म्याला किंवा शरीराला? जर आत्म्याला असेल, तर आत्मा भिन्न नाहीं. शरीराला असेल तर [१]अन्नमयत्वाच्या योगानें शरीरही भिन्न नाहीं. आतां हें सर्व जाणण्याविषयीं तूं समर्थ आहेस; करितां याचें उत्तर द्यावें. शिवाय जसें गंगेमध्यें किंवा मदिरेमध्यें सूर्यप्रतिबिंब एकच आहे, तसें ब्राह्मण किंवा चांडाल यांचे शरीरांत आत्मा एकच आहे. आतां देहादिकांचे ठिकाणीं तुझ्यासारख्या तत्वज्ञान्याला अहंभाव असणें हेंही सर्वथा अनुचित आहे. आतां तूं ह्मणशील कीं, मी हें सर्व जाणतों; तथापि लोकरीतिला अनुस-

---

(१) शरीरामध्यें अन्नमयादिक कोश आहेत म्ह० त्यांतील भागास निरनिराळी संज्ञा दिली आहे. ते कोश सर्व शरीरांत सारखेच आहेत त्यामुळें शरीरतः भेद नाहीं.

रून तुला बाजूला हो असें ह्मटलें तर, विमुक्तिमार्गविद्येप्रत प्राप्त झालेला जो तूं त्या तुला या तुच्छजनसंग्रहाची इच्छा असणें हेंही बरोबर नाहीं. शिवाय तुझ्यासारखे तत्वज्ञानीही या भगवंताच्या मायाकृत इंद्रजालांत सांपडतात, हें मोठें आश्चर्य वाटतें." याप्रमाणें चांडालाचें भाषण श्रवण करून **आचार्यांना** मोठा विस्मय झाला, आणि भाषण करितात, महाराज आपण भाषण केलें हें सर्व सत्य आहे, आतां आपल्या वचनावरून हा अंत्यज आहे व हा ब्राह्मण आहे अशी जी भेदबुद्धि त्या बुद्धीचा मी त्याग केला. शिवाय आपण अंत्यज नसून कोणी तरी श्रेष्ठ ज्ञानी आहां असें मी समजतों. आतां अभेदबुद्धि होणें फार कठीण आहे. कारण, कोणी उपनिषदार्थ आत्म्याशीं युक्त करितात, कोणी त्याचें निदिध्यसन करितात. परंतु भेदरहित अशी कोणाचीही बुद्धि होत नाहीं. आतां जो हें जगत् व आत्मा हीं एकस्वरूप आहेत, असें बुद्धीच्या निश्चयानें मानतो तो ब्राह्मण असो, अगर चांडाल असो तो वंदनीय आहे यांत कांहीं संशय नाहीं. तसेंच जो ब्रह्मदेव आदिकरून पिपीलिकेपर्यंत एकच चैतन्य मानतो व ज्याचा मीपणा नष्ट झाला तो कोणीही असो, त्या तत्ववेत्त्याला मी गुरुस्थानीं मानतों. याप्रमाणें **आचार्यांचें** भाषण ऐकून एकदम तें अत्यंजस्वरूप टाकून **श्रीशंकरांनीं** आपलें स्वरूप व्यक्त करून दर्शन दिलें, तेव्हां **आचार्यांनीं** भक्तीनें व हर्षानें त्या **अष्टमूर्ति शंकराचा** स्तव केला. हे शंभो !! देहदृष्टीनें मी आपला दास आहें; तस्मात् आपली कृपा असावी. जीवदृष्टीनें मी आपला अंश आहें. आणि शुद्ध आत्मदृष्टीनें तूं तोच मी आहें. याला प्रमाण "**तत्त्वमसि**" इत्यादि श्रुति आहेत. याप्रमाणें स्तुति केल्यानंतर **श्रीशंकर** बोलले कीं, हे सच्छ्रेष्ठ **आचार्य**, व्यासाप्रमाणें तूंही

मला कृपापात्र आहेस. आतां सर्व शिष्टाग्रणी जे **व्यास**, त्यांनीं सर्व वेदांपासून सार काढून **“ अथातो ब्रह्मजिज्ञासा। जन्माद्यस्ययतः । शास्त्रयोनित्वात् । तत्तु समन्वयात् ”** इत्यादि सूत्रसमूह केला आहे. त्यांवर कलिदोषांनीं युक्त अशा कित्येक किंचिद्वेद जाणणारांनीं कुत्सित भाष्यें करून त्यांचा विपरीत अर्थ केला आहे; करितां निश्चित वेदार्थ समजण्यासाठीं तूं त्यांवरून भाष्य करून सर्व कुबुद्धिमतांचा नाश कर. कारण तूं सर्व वेदांताच्या अर्थाला जाणणारा आहेस. शिवाय त्या तुझ्या भाष्याला सर्व इंद्रादिक देव मान्य करतील; व तुझा सर्वत्र सभेमध्यें जय होईल; करितां भेदाभेदवादी असा **भास्कर,** व शाक्तवादी जो **अभिनवगुप्त,** भेदवादी **नीलकंठ,** शैवमतवादी **गुरु प्रभाकर,** आणि गुरुमतानुयायी **मंडण,** इत्यादिक जे भिन्न भिन्नमताला अनुसरणारे पंडित आहेत त्यांस भाष्य केल्यानंतर जिंकून, सर्व पृथ्वीवर अद्वैतमत स्थापन करावें, आणि स्थापित धर्माच्या रक्षणार्थ ठिकठिकाणीं शिष्य स्थापन करावेत. याप्रमाणें आपलें अवतारकृत्य करून, नंतर मजप्रत यावें. असें सांगून शंकर अंतर्धान पावले. नंतर **आचार्य** विस्मित होत्साते शिष्यांसह गंगेवर गेले. आणि आन्हिक कृत्य करून सूत्रभाष्य करण्याचा निश्चय केला. पुढें शिष्यांसह **आचार्य** फिरत फिरत त्या त्या तीर्थांचें सेवन करीत करीत, हिमालयपर्वतीं बदरिकाश्रमाला गेले. आणि तेथें कांहीं दिवस वास करून प्रथम गंभीर, भव्य, मधुर अशा ब्रह्म[1]-**सूत्रावर** भाष्य करून नंतर ब्रह्मविद्या प्रतिपादक जीं **ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरेय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्य,** ह्या दशोपनिषदांवर भाष्य केलें.

(१) ज्यांत ब्रह्माचें प्रतिपादन आहे अशीं व्यासांनीं केलेलीं सूत्रें याला उत्तरमीमांसा ह्मणतात.

नंतर महाभारतांतील सकल वेदार्थसारभूत जी **भगवद्गीता** तिजवर भाष्य करून, पुढें भारतांतील **सनत्सुजातीय** यावर व्याख्या करून, **नृसिंहतापनी** याचीही व्याख्या केली. आणि **उपदेशसाहस्री** आदिकरून वेदांतप्रतिपादक अनेक ग्रंथ केले कीं, ज्या ग्रंथांच्या योगानें विरक्त असे यति अविवेकरूपी जो पाश त्या पाशापासून मुक्त होतील. त्या कालीं **शंकराचार्य**रूपी सूर्योदयानें अंधकाररूपी जे दुर्वाद ते तात्काल नष्ट झाले.

नंतर **आचार्यांनीं** आपण केलेले ग्रंथ आपल्या शिष्यांसही पढविले, तेव्हां त्या सर्व शिष्यवर्गांत श्रेष्ठ जो **सनंदन** त्याला विशेषेंकरून सांगितलें, कारण त्याची गुरूचे ठिकाणीं पूर्ण भक्ति असून, वैराग्यही जागृत होतें. एकदा **आचार्यांनीं** आपल्या **सनंदन** शिष्याची भक्ति कशी आहे ती इतर शिष्यांला समजावी ह्मणून आपण गंगेच्या परतीराला जाऊन त्याला सांगितलें कीं, तूं समोर मजपाशीं यावें तेव्हां तें गुरुवाक्य ऐकून त्यानें विचार केला कीं, संसारसागरापासून तारण्याविषयीं जर श्रीगुरू समर्थ आहेत; तर मग या अल्पजलाशयापासून तारतीलच, यांत कांहीं संदेह नाहीं. असा विचार करून निघाला, तेव्हां तो जिथें जिथें त्या उदकावर पाय ठेवी तिथें तिथें त्याला आधारभूत असें कमल उत्पन्न होई. याप्रकारें तो पलीकडे गेला, आणि नम्रतापूर्वक गुरुचरणीं वंदन करून तो हात जोडून उभा राहिला. तेव्हां **आचार्यांना** मोठा संतोष होऊन त्यांनीं त्याला आलिंगन दिलें. आणि त्या दिवसापासून त्याचें **पद्मपाद** असें नांव प्रसिद्ध केलें.

नंतर **आचार्य** शिष्यांना अत्यंत निर्दोष जी आत्मविद्या[1] ती पढवीत असतां अत्यंत गर्वानें युक्त, पाशुपतमताभिमानी, असे

---

१ जांत आत्मज्ञान सांगितलें आहे ती.

कितीएक पंडित येऊन आचार्यांवर आक्षेप करूं लागले. कीं, पशुपती हाच मुख्य ईश्वर आहे, व त्यानें मोक्षाला साधनीभूत असे पांच पदार्थ सांगितले आहेत ते असे. **कार्य, कारण, योग, विधि** आणि **दुःखान्त.** आतां कार्य ह्मणजे महत्तत्त्वादि, कारण ह्म० मूलभूत प्रकृति, योग ह्म० समाधि, विधि ह्म० त्रिकालस्नानादि, व दुःखांत ह्म० मोक्ष, या पांच पदार्थांपैकीं प्रकृति ही जगताला उपादानकारण[1] आहे व पशुपती जो ईश्वर तो निमित्तकारण[2] आहे. याविषयीं प्रमाण "**स ईक्षां चक्रे स प्राणमसृजत**" इत्यादि श्रुति आहे. या वरून त्याला ईक्षा[3]पूर्वक कर्तृत्व आहे, तें ईक्षापूर्वक कर्तृत्व जसें घटाला निमित्तकारण जे कुलालादि त्यांच्या ठिकाणीं स्पष्ट आहे, तसें याच्या ठिकाणीं आहे. आतां ब्रह्म हें जगताला उपादानकारण आहे असें जें तुमचें ह्मणणें तें संभवत नाहीं; कारण, अवयवयुक्त, जड, अशुद्ध, या लक्षणांनीं युक्त जें ब्रह्म तें उपादानकारण संभवणार नाहीं. कारण जें ज्यामध्यें उत्पन्न झालें, त्यांचे धर्म त्यांमध्यें असले पाहिजेत, असें असतां निरवयवत्वादि जे ब्रह्माचे धर्म ते जगतामध्यें दिसत नाहींत ह्मणून ब्रह्म हें जगताला उपादानकारण आहे असें ह्मणतां येत नाहीं. असें ऐकून **आचार्य** बोलले कीं, तुमचें हें मत बरोबर नाहीं; कारण ब्रह्मावांचून इतराला निमित्तकारणत्व किंवा उपादानकारणत्व मानिलें तर उपनिषदांमध्यें,

---

१ जें कारण कार्याबरोबर असतें त्याला उपादानकारण म्हणावें. जसें घट हें कार्य आहे त्याला कारणभूत जी मृत्तिका ही कार्याबरोबर म्हणून मृत्तिका ही घटाला उपादानकारण आहे. २ ज्या निमित्तानें कार्य उत्पन्न होतें त्याला निमित्तकारण म्हणावें. जसें कुलालचक्र दंडानें फिरविलें असतां घट उत्पन्न होतो म्हणून ते दंडादिक घटरूपी कार्याला निमित्तकारण झालें. ३ अवलोकन करणें.

ज्याच्या ज्ञानानें अश्रुत[1] श्रुत होतें आणि अविज्ञात[2] विज्ञात होतें तें मी विचारतों, अशी जी प्रतिज्ञा सांगितली आहे, तिला विरोध येऊं लागेल. कारण निमित्तकारणाच्या ज्ञानानें कार्याचें ज्ञान होत नाहीं, ह्मणून येथें उपादानकारणच घेतलें पाहिजे. आतां जें उपादानकारण घ्यावयाचें तें जर प्रकृति घेतली तर "एकमेवाद्वितीयम्[3]" या श्रुतीनें उत्पत्तीच्या पूर्वी ब्रह्मावांचून अन्य पदार्थच नाहीं असें जें प्रतिपादन केलें आहे त्याला विरोध येऊं लागेल, ह्मणून प्रकृतीला उपादानकारण न मानतां "बहुस्यां प्रजायेय[4]" या श्रुतीनें ब्रह्मालाच मानिलें पाहिजे. आतां कार्यामध्यें उपादानकारणाचा कांहीं तरी अंश असला पाहिजे असें जें आपलें मत तेंही बरोबर नाहीं. कारण, गोमयापासून उत्पन्न होणारे जे वृश्चिकादि त्यांचे ठिकाणीं गोमयांश कांहींच दृष्ट होत नाहीं. यावरून कार्य व उपादानकारण या दोहोंचें अत्यंत सादृश्य असलें पाहिजे असें नाहीं. आतां भेद मानणारा जो तूं त्या तुला मुक्तिही होणार नाहीं. कारण भावापासून[5] होणारें सर्व कार्य अनित्य आहे. करितां ब्रह्म हेंच मुख्य मानलें पाहिजे. याप्रमाणें सगर्व जे पाशुपतानुयायी त्यांचें अनेकप्रकारें खंडण केलें. तेव्हां गरुडाच्या पक्षघातानें जसे सर्प विषाचा परित्याग करितात, त्याप्रमाणें त्यानें आपल्या असत्याग्रहाचा परित्याग करून आचार्यमताचा स्वीकार केला.

एकदां **आचार्य** गंगातटाकीं शिष्यांना भाष्याचा पाठ सांगून थोडी विश्रांति घेण्याकरितां स्वस्थ बसले आहेत इतक्यांत वृद्ध ब्राह्मणाचें स्वरूप घेऊन **व्यासांची** स्वारी तेथें आली. नंतर **व्यासांनीं** प्रश्न केला कीं, तूं कोण आहेस आणि पाठ कशाचा

---

१ न ऐकिलेलें. २ न जाणलेलें. ३ ब्रह्म एक आहे व अद्वितीय आहे. ४ जें प्रजायेय म्हणजे होऊन पुष्कळ झालें. ५ देहादिक.

चालला आहे ? तेव्हां **आचार्यांनीं** उत्तर देण्याच्या पूर्वींच शिष्यांनीं सांगितलें कीं, ज्यांनीं दशोपनिषदांवर व व्याससूत्रावर भाष्य केलें, आणि संपूर्ण भेदवादाचा नाश केला, असे हे आमचे गुरु आहेत. असें प्रथमच्या प्रश्नाचें उत्तर सांगून, हें शारीरभाष्य चाललें आहे, असें दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें. तें ऐकून वेषधारी **व्यासांनीं आचार्यां**ला विचारिलें कीं, हे तुमचे शिष्य आपण भाष्यकार आहां असें सांगतात. यावरून मला मोठा विस्मय वाटतो. करितां जर आपण व्याससूत्रार्थ खरा जाणत असाल तर एखादें सूत्र ह्मणून त्याचें व्याख्यान करावें. असें त्यांचें भाषण ऐकून **आचार्य** बोलले कीं, सूत्रार्थ जाणणारे जे गुरू त्यांस माझा नमस्कार आहे. आतां मी सूत्रार्थ जाणतों असा जरी मला अभिमान नाहीं तथापि जें आपण विचाराल तें यथामती सांगेन. तेव्हां व्यासरूपी ब्राह्मण बोलला कीं, तृतीय अध्यायाचे आरंभीं जें **“ तदनंतरप्रतिपत्तौ रंहतिसंपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाभ्यां ”** या सूत्राचा अर्थ आपण जाणत असाल तर सांगावा ? तेव्हां तात्पर्यानें **आचार्यांनीं** सूत्रार्थ सांगितला, तो असा, मरण कालीं भूतसूक्ष्मदेहबीजांनीं युक्त असा जीव, देहांतराप्रत जातो. कसा तर प्रश्ननिरूपणाभ्यां ह्म० **तांडिश्रुतींत** गौतमांनीं जैमिनीला प्रश्न केला कीं, जीव देहांतर कसें करितो ? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, जीव चंद्रमंडलापासून ओषधीमध्यें येऊन धान्यद्वारा पुरूषाचे उदरांत जाऊन रेतोरूपी होतो, आणि तें रेत योनीच्या ठिकाणीं निषिक्त झालें असतां क्रमानें वाढतें; आणि तो रेतोरूपी जीव आपल्या कर्मानुरोधानें ज्या योनींत जातो तो देह त्याला प्राप्त होतो.

याप्रमाणें **आचार्यांनीं** सूत्रार्थ सांगितल्यानंतर त्या ब्राह्मणानें

अनेक शंका घेतल्या परंतु त्या सर्वांचें **आचार्यांनीं** योग्य व सम र्पक समाधान केलें.

ह्याप्रमाणें उभयतांचें संभाषण चाललें असतां जवळ **पद्मपाद** शिष्य होते त्यांनीं **आचार्यांला** सांगितलें कीं, हे गुरो हा ब्राह्मण नव्हे; तर सर्व वेदांतरहस्य जाणणारे जे **व्यास** तेच आहेत. आत आपण साक्षात् **शंकर,** आणि हे मूर्तिमंत **व्यास** तेव्हां उभय तांच्या विवादांत मी किंकरानें काय बोलावें. असें शिष्यवचन ऐ कून **आचार्यांनीं** त्यांना हात जोडून प्रार्थना केली कीं, आपण साक्षात् **व्यास** आहांत, तेव्हां मी केलेलें अद्वैतासिद्धांत प्रतिपादक ब्रह्मसूत्रावरील भाष्य आपल्याला संमत असेल तर स्वरूपानें द र्शन द्यावें. असें भाषण ऐकल्यानंतर **व्यासांनीं**, मस्तकीं जटाभार असून कृष्णाजिन परिधान केलें आहे व अंगकांति मेघासारखी असून ज्ञानमुद्रा धारण केल्या आहेत, अशा प्रकारचें रूप दाखवि लें, तेव्हां तें रूप पाहून **आचार्यांनीं** शिष्यांसह वंदन केलें. आणि अनेकप्रकारें स्तुतिही केली. तेव्हां **व्यास** बोलले कीं, हे **शंकर,** आपण आमच्या योग्यतेला पूर्वींच पावलेले आहां. आणि आपल्या ह्या अखंडित पांडित्यानें मी फार संतोष पावलों. ज्याप्रमाणें माझा पुत्र **शुक** मला प्रिय आहे, त्याप्रमाणें आपणही प्रिय आहां. आपण माझे सूत्रावर भाष्य केलें असें श्रीशंकराच्या **सभांकर्ण** नामक दूतानें सांगितल्यावरून तें कसें झालें आहे हें पाहण्याच्या इच्छेनें मी येथें आलों. तेव्हां **आचार्य** बोलले कीं, **सुमंतु, पैल,** **वैशंपायन** इत्यादिक आपले शिष्य आहेत; तेव्हां त्यांपुढें अल्प मति मी कोणीकडे ? तथापि आपल्या सूत्रावर भाष्य केलें हें जें माझें साहस त्याला आपण मान दिला, तेणेंकरून मी कृतार्थ झालों. तेव्हां व्यास बोलले कीं, हें आपलें साहस नाहीं. का रण व्याकरण, मीमांसा, आदिकरून सर्व आपण जाणतां

आहां. शिवाय आपण गोविंद भगवत्पाद यांचे शिष्य असून ब्रह्मचर्यापासूनच विरक्त होऊन संन्यास केला आहे; तेव्हां आपण कांहीं प्राकृत पुरुष नाहीं. तर साक्षात् शंकर आहां, हें मी जाणतों. कारण त्या शंकरावांचून सांख्यादिक मतांनीं विपरीत झालेला जो वेदार्थ त्याचा उद्धार करण्याविषयीं कोण समर्थ आहे ? तर श्रुतीवर भाष्य करून भेदवाद्यांना जिकावें. तेव्हां आचार्य बोलले कीं, मी उपनिषदभाष्यें पूर्वींच केलीं आहेत. व सर्व भाष्यें शिष्यांना सांगितलीही आहेत, माझें कृत्य आतां कांहींच राहिलें नाहीं. ह्मणून आपण एक मुहूर्तपर्यंत येथें रहावें. कारण माझें आयुष्य पूर्ण झालें आहे, यास्तव या मणिकर्णिकेंत मी हें शरीर ठेवून कैलासाला जातों. असें ऐकून व्यास बोलले कीं, अजून आपलीं कृत्यें वहुत आहेत; करितां मी आपणास आणखीं सोळा वर्षे आयुष्य देतों. आपण केलेलें भाष्य सूर्य चंद्र आहेत तोंपर्यंत जागृत राहील, शिवाय वादामध्यें सर्वांस जिंकून अद्वैतमार्ग स्थापन कराल. याप्रमाणें वर देऊन आचार्यांनीं चरण वंदन केल्यानंतर श्रीवेदव्यास अंतर्धान पावले.

नंतर आचार्य भट्टपादाचें दर्शन घेण्याकरितां शिष्यांसह निघाले. ते प्रथम प्रयागक्षेत्रीं येऊन व त्रिवेणीचा स्तव करून स्नान करण्याकरितां निघाले. इतक्यांत मातेनें स्मरण केलें ह्मणून आचार्यांनीं बाकीचें अनुष्ठान त्वरेनें आटपून व मातेचें दर्शन घेऊन तमालशालिनीतीरीं विश्रांति केली. तों पर्वतावरून उडी टाकून वेदाला प्रामाण्य सिद्ध करणारे, सर्व वेदार्थांतें जाणणारे, धैर्यसंपन्न आणि आस्तिक्यबुद्धिसंपन्न असे भट्टपाद, आपण गुरूचें उन्मथन व अनेक सौगतांचा नाश केला हा मोठा दोष घडला, करितां त्याची निष्कृति व्हावी

१ बुद्ध.

ह्मणून तुषाग्नीमध्यें[1] प्रवेश करून राहिले आहेत. अशी लोकवार्ता ऐकून **आचार्य** त्या स्थानीं गेले. तेव्हां **भट्टपादांला,** आपल्या अशा स्थितींत **आचार्यांचें** दर्शन झालें ह्मणून मोठा संतोष झाला. त्यावेळीं शिष्यांनीं आचार्यांची पूजा केली परंतु ती त्यांना अपेक्षित नव्हती, तथापि तिचा स्वीकार करून त्यांनीं दिलेली भिक्षा घेतली, आणि आपण केलेलें सूत्रभाष्य **भट्टपादांना** दाखविलें. तें पाहून **भट्टपादांना** मोठा संतोष झाला. आणि ते **आचार्यांना** बोलले कीं, या भाष्याचे प्रथमाध्यायांत आठ हजार वार्तिकें होतील परंतु जर मीही अग्निप्रवेशदीक्षा घेतली नसती तर आपल्या भाष्यावर वार्तिकें केलीं असतीं. असो. आज आपल्या दर्शनानें मी कृतार्थ झालों, हें माझ्या पूर्वसुकृताचेंच फल असें मी समजतों. माझें कर्तव्य मीं केलें, तें कोणतें ह्मणाल तर अगोदर कर्ममार्ग स्थापित केला व नैयायिक युक्तिजालाचा निरास केला, तसेंच विषयापासून होणाऱ्या सुखदुःखांचा अनुभवही घेतला. आतां आणखीं कालक्षेप करण्याची इच्छा राहिली नाहीं. आतां ईश्वरनिरास[2] व गुरूद्रोह[3] या पातकद्वयाचे निरसनार्थ मीं प्रवृत्त झालों आहें. याप्रमाणें त्यांचें भाषण ऐकून **आचार्य** बोलले कीं, आपण जें केलें तें कांहीं निंद्य नाहीं, योग्यच केलें. करितां आपल्याला पातकद्वयाचा संभव नाहीं. तेव्हां **भट्टपाद** बोलले कीं, आपल्या दर्शनेंकरून अथवा नामस्मरणेंकरून जरीं मी जगण्याविषयीं समर्थ आहें, तरी आतां मला तशी इच्छा राहिली नाहीं. आपण सर्वज्ञ आहां; तेव्हां हें जाणलेंच असेल. आपण साक्षात् शंकर आहा

---

१ धान्यावरील जो कोंडा त्याची रास करून त्यांत आपण बसून त्याला अग्नी देवून आपला देह दग्ध करून घेणें. २ ईश्वर न मानिता वेदालाच स्वतःप्रामाण्यसिद्ध केलें. ३ सुगतांपासून त्यांचें शास्त्र शिकून त्यांचाच पुढें नाश केला.

असें मी समजतों. व आपण अद्वैतमार्ग प्रकाशित करण्याच्या हेतूनें अवतीर्ण झालां व मला जिंकण्याकरितां येथें आलां हेंही मी समजतों; करितां आपण ज्याची कीर्ति दिगंतरीं गेलेली असा, व जो अजिंक्य, माझा शिष्य **मंडण** या नामेंकरून प्रसिद्ध आहे त्याला जिंकलें असतां आपण सर्व जगत् जिंकलें असें समजावें. तो सर्व शास्त्रांमध्यें माझ्याहून निष्णात आहे, त्याची स्त्री सरस्वती ह्मणून आहे. तिला वादामध्यें मध्यस्थ ठेवून मंडणाला जिंकून स्ववश करावा. ह्मणजे तोच पुढें आपल्या भाष्यावर वार्तिक करील. आतां आपण साक्षात् शंकर आहां तेव्हां मला तारकमंत्राचा उपदेश करण्याकरितां आलां असें मी मानतों. आतां हे निष्कपट, करुणासागर, आपण मुहूर्तमात्र येथें असावें, ह्मणजे मी आपलें स्वरूप पहात हा देह सोडून परमपदाप्रत जाईन. याप्रमाणें **भट्टपादांचें** वाक्य ऐकून **शंकराचार्यांनीं** त्यांना ब्रह्मोपदेश केला. आणि आपण आकाशमार्गानें **मंडणा**कडे जाण्याकरितां निघाले. इकडे अखिलबंधनें नष्ट झालेले असे **भट्टपाद**ही शंकरकृपेनें वैष्णवलोकाला गेले.

नंतर **आचार्य मंडणपंडिता**कडे जाण्याकरितां निघाले ते आकाश मार्गानें माहिष्मती पुरींत आले, आणि तेथें नगराचे समीप एक बाग होता त्या ठिकाणीं आन्हिककृत्य करून दोन प्रहर दिवस आल्यानंतर **मंडणपंडिता**चे घराचा शोध करीत चालले, इतक्यांत त्या पंडितश्रेष्ठाच्या दोन दासी पाणी आणण्याकरितां चालल्या होत्या, त्यांस **आचार्यांनीं मंडणपंडित** कोठें रहातात, असें विचारिलें, तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं;

**स्वतः प्रमाणं परतः प्रमाणं**
**कीरांगना यत्र गिरं गिरन्ति ।**

द्वारस्थनीडांतरसंनिरुद्धा
जानीहि तन्मण्डनपण्डितौकः ॥ १ ॥
फलप्रदं कर्मफलप्रदोजः
कीरांगना यत्र गिरं गिरन्ति ।
द्वारस्थनीडांतरसंनिरुद्धा
जानीहि तन्मण्डनपण्डितौकः ॥ २ ॥
जगत्ध्रुवं स्याज्जगदध्रुवं स्या-
त्कीरांगना यत्र गिरं गिरन्ति ।
द्वारस्थनीडांतरसंनिरुद्धा
जानीहि तन्मण्डनपण्डितौकः ॥ ३ ॥

यांचें तात्पर्य असें आहे कीं वेदवाक्य स्वतः प्रमाण अ किंवा परतः प्रमाण आहे. तसेंच सुखदुःखाचें फल कर्म दे किंवा सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, असा परमेश्वर देतो. तसेंच जग ध्रुव आहे किंवा अध्रुव आहे. हा विचार ज्याचे द्वाराम पिंजऱ्यांत असणाऱ्या कीरांगना (मैना) करितात; तें मंडण डितांचें घर असें आपण समजावें. याप्रमाणें त्यांचें भाषण ऐक आचार्य साश्चर्य होत्साते तेथें गेले, तों त्याठिकाणीं गृहद्वार ब केलेलें पाहून शिष्यांना बाहेर ठेवून आचार्य आकाशमार्गा मध्यांगणांत गेले. आणि त्यांनीं तो मंडण विद्यासंपन्न व यशःसंप असल्यामुळें मोटा तेजस्वी, साक्षात् ब्रह्मदेवच कीं का असा पाहिला. त्या वेळीं तो आपल्या तपोबलानें श्राद्धा निमंत्रित असे जे वेदव्यास, व जैमिनी, त्यांचें पादप्रक्षाल करीत होता. आचार्य जे गेले ते व्यास व जैमिनी यांचे जव जाऊन बसले. तेव्हां ज्ञानशिखा व ज्ञानच यज्ञोपवीत ज्या आहे, व आकाशमार्गानें येऊन व्यास व जैमिनी यांजव बसलेल्या अशा त्या यतीला पाहून मंडनाला क्रोध आल

आणि त्या उभयतांचा प्रश्नोत्तररूपानें संवाद अति रम्य झाला तो असाः—

यांत आचार्यांनीं मंडनाच्या प्रश्नाचा अर्थ निराळा करून उत्तरें दिलीं आहेत.

मंडन.—" कुतो मुंडी " मुंडण केलेला असा तूं कोठून आलास ?

आचार्य.—" आगलात् " कंठापर्यंत मुंडण केलेलें आहे.

मं०—"मयां[2] ते पृच्छते पंथाः" मी तुला मार्ग विचारितों ?

आ०—" किमाह पंथा " पंथा काय बोलला.

मं०—( राग येऊन ) " त्वन्मातामुंडेत्याह " तुझी आई मुंडा असें पंथा बोलला.

आ०—तुझी माता मुंडा असें तुला पंथानें सांगितलें, तें ठीक आहे; कारण तूं त्याला विचारिलेंस. मी त्याला कांहीं प्रश्न केलेला नाहीं. ह्मणून तें उत्तर तुलाच आहे.

मं०—" अहो[3] पीता किमु सुरा " तूं सुरा पियाला आहेस कीं काय ?

आ०—" नैव श्वेता " नाहीं. सुरेचा रंग पांढरा आहे.

मं०—" किं त्वं जानासि तद्वर्णं " तूं तिचा वर्ण जाणतोस. परंतु हें यतीला अनुचित आहे. याप्रमाणें आक्षेप ऐकून,

आ०—" अहं वर्णं भवान् रसं " मी फक्त वर्णच जाणतों, आणि तूं तिची रुचि जाणतोस.

मं०—" कंथांवहसिदुर्बुद्धे गर्दभेनापि दुर्वहां ॥ शिखायज्ञोपवीताभ्यां कस्ते भारो भविष्यति. "—गर्दभालाही

---

१ कोठपासून मुंडन केलें आहे. २ मार्ग तुला काय ह्मणाला. ३ सुरा पिंवळी आहे काय ?

असह्य अशी ही कंथा धारण करितोस आणि शिखायज्ञोपवी ताचा तुला भार होतो, हें एक मोठें आश्चर्य आहे.

आ०—" कंथां वहामि दुर्बुद्धे तव पित्रापि दुर्भराम्॥ शिखायज्ञोपवीताभ्यां श्रुतेर्भारो भविष्यति ॥ "—स्त्रियांनीं वारंवार तिरस्कृत केला तरी त्या स्त्रियांचे ठिकाणीं आसक्त होणारा अतएव गर्दभ असा—जो तुझा बाप त्यालाही वहाण्यास कठीण अशी मी कंथा वहातों. आतां शिखायज्ञोपवीताचा भार मला झाला आहे असें नाहीं; कारण " अथ परिव्राड्[1] विवरणवासा मुंडोपरिगृहम् " इत्यादि श्रुतींवरून तर श्रुतीलाही तो भार आहे.

मं०—"त्यक्त्वा पाणिगृहीतीं स्वामशक्त्या परिरक्षणे। शिष्यपुस्तकभारेच्छोर्व्याख्याताब्रह्मनिष्ठता " आपल्या विवाहित स्त्रीचें रक्षण होत नाहीं. ह्मणून तिचा त्याग करून हे शिष्य आणि पुस्तकभार जमविलेस यावरूनच तुझी ब्रह्मनिष्ठता चांगली व्यक्त होते !

आ०—" गुरुशुश्रूषणालस्यात्समावर्त्य गुरोः कुलात् ॥ स्त्रियाःशुश्रूषमाणस्य व्याख्याता कर्मनिष्ठता " गुरुशुश्रूषेविषयीं आलस्य करून घरीं येऊन स्त्रीशुश्रूषण करितोस यावरून तुझी कर्मनिष्ठता सहज कळून येते.

मं०—" स्थितोसि योषितां गर्भे ताभिरेव विवर्धितः अहोकृतघ्नतामूर्ख कथं ता एव निंदसि " स्त्रियांचे गर्भीं उत्पन्न होऊन ज्यांनीं लालन पालन करून वाढविलेल्या स्त्रियांचीच निंदा करितोस यावरून हे मूर्खा तुझी कृतघ्नता स्पष्ट होते.

आ०—" यासां स्तन्यं त्वया पीतं यासां जातो

१ परिव्राट् इ० संन्यासी, काषायांबर, मुंडी, आणि दारापुत्रादि विरहित असा असावा.

**योनितः ॥ तासु मुर्खतम स्त्रीषु पशुवद्रमसे कथं "** ज्या ठिकाणीं जन्म घेतलें व ज्यांचें स्तनपान केलें त्याठिकाणीं हे महा मूर्खा तूं पशूप्रमाणें कसा रममाण होतोस?

**मं०—" वीरहत्यामवाप्नोसि वन्हीनुद्वास्थयत्नतः "** अग्नित्रयाचे[1] नाशानें वीरहत्येला[2] (इंद्रहत्येला) मात्र प्राप्त झालास.

**आ०—" आत्महत्या मवाप्तस्त्वमवि दित्वापरं पदं "** परमपदातें न जाणिल्यानें तूं तर आत्महत्येला[3] पावला आहेस याचा प्रथम विचार कर !

**मं०—" दौवारिकां वंचयित्वाकथंस्तेनवदागतः "** द्वारपालानां फसवून तूं चोराप्रमाणें आंत कसा आलास ?

**आ०—" भिक्षुभ्योन्नमदत्वात्वं स्तेनवद्भोक्ष्यसेकथम् "** भिक्षूंचा भाग भिक्षूंनां न देतां तूं चोराप्रमाणें कसा भक्षण करितोस ?

**मं०**—( आचार्यांच्या प्रत्युत्तरांनीं कुंठित होऊन बो‍ण्यास

---

१ गार्हपत्य, दक्षिणाग्नि, आणि आहवनीय. हे तीन अग्नि.
२ "**वीरहावा एष देवानांयोग्नीनुद्वासयति**" ह्या श्रुतीरूनव वीरहत्येचा दोष आहे. ३ "**असन्नेवसभवतिअसद्ब्रह्मेतिचेद्वेद**" ह्या श्रुतीचा अर्थ—जो ब्रह्माला असत् जाणतो तो स्वतः असत् म्ह० खोटा होतो. तेव्हां तो आत्महत्या करणारान होतो. "**असूर्यानामतेलोका अंधेन तमसावृत्ताः ॥ तांस्ते प्रेत्याभिगच्छंति येकेचात्म हनो जनाः ॥**" ह्या स्मृतीचा अर्थ—जे लोक अंधारानें युक्त आहेत त्या लोकांना असूर्य लोक ह्मणतात. असे लोक आत्महत्या करणाऱ्या प्राण्याला प्राप्त होतात. "**अन्यथासंतमात्मानं योन्यथा प्रति पद्यते ॥ किं ते न नकृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥**" ह्या स्मृतीचा अर्थ–आत्म्याचें खरें स्वरूप न जाणतां जो अन्यथा प्रतिपादन करितो. अशा त्या आत्मापहरण करणाऱ्या चोरानें कोणतें पाप केलें नाहीं !

असमर्थ झाला, तेव्हां तो मंडन अन्य रीतीनें बोलूं लागला. "कर्मकालेन संभाष्य अहंमूर्खेण संप्रति" कर्मकाल मूर्खाबरोबर भाषण करणें योग्य नाहीं.

आ०—"अहोप्रकटितं ज्ञानं यतिभंगेन भाषिणा।" यतीशीं भाषणांत भंग पावणारा जो तूं त्या तुझें ज्ञान काय आ हें तें समजलें.

मं०—"यतिभंगेप्रवृत्तस्य यतिभंगोन दोषभाक्।" यतिभंगाला प्रवृत्त झालेला जो मी त्या मला यतिभंग ह्म० यती भंग झाला असतां कांहीं दोष नाहीं.

आ०—"यतिभंगे प्रवृत्तस्य पंचम्यंतं समस्यताम्।" यतिभंग हा समास या ठिकाणीं षष्ठीतत्पुरुष न करितां पंचमी त्पुरुष करावा. ह्मणजे यतीपासून भंग झाला असतां मला दो नाहीं असा अर्थ होतो.

मं०—"क ब्रह्म कचदुर्मेधाः क संन्यासः क क कलिः। स्वाद्वन्नभक्ष्यकामेन वेषोयं योगिनांधृतः॥" ब्रह्म कोठें! हा संन्यास कोणीकडे! आणि हा कलिकाल कोठें तर लोकांना फसवून त्यांपासून मिष्टान्न भक्षण करण्याकरितां हा वेष धारण केला आहेस असें मी समजतों.

आ०—"क स्वर्गः क दुराचारः काग्निहोत्रं क क कलिः। मन्येमैथुन कामेन वेषोयं कर्मिणांधृत :॥" तो स्वर्ग कोठें! हा दुराचार कोठें! अग्निहोत्र कोठें! आ कलिकाल कोठें! तर केवळ मैथुनाच्या इच्छेनें कर्म करण ऱ्यांचा तूं हा वेष धारण केला आहेस असें वाटतें.

याप्रमाणें उभयतांचा दुरुक्तीनें संवाद चालला असतां डणाला व्यास बोलले कीं, हे मंडण, ज्यानें आत्मतत्व साक्षा केलें आहे ह्मणजे पूर्णपणें जाणिलें आहे, व ज्याची पुत्र, दा

आदिकरून लोकेषणा नष्ट झाली आहे, अशा यतीला जें तूं बो-
लस तें तुझ्यासारख्या योग्य व आचारसंपन्न पुरुषाला योग्य
नाहीं; करितां असें बोलूं नको. तर हा यती साक्षात् विष्णूच
आला असें मानून त्याचें निमंत्रणपूर्वक पूजन करून त्याला
यतीधर्माला योग्य अशी भिक्षा द्यावी. याप्रकारें **मंडणाला**
सांगितल्यानंतर **मंडणपंडित** शांत होत्साते त्यांनीं **आचार्यांची**
यथाशास्त्र पूजा करून भिक्षेकरितां निमंत्रण दिलें. नंतर **आ-
चार्य** बोलले, हे **मंडणपंडित**, विवाद भिक्षेच्या इच्छेनें मी येथें
आलों आहें तर ती वादभिक्षा द्यावी व त्यांत दोघांपैकीं, जो
जिंकला जाईल त्यानें दुसऱ्याचें शिष्यत्व करावें. ह्या अन्न भि-
क्षेची मला विशेष इच्छा नाहीं. तेव्हां भोजनोत्तर आपण
वाद करूं अशाविषयीं मंडनाकडून अभिवचन मिळाल्यावर
सर्वांचें भोजन झालें. भोजन झाल्यानंतर **व्यास**, **जैमिनी**,
**आचार्य** आणि **मंडण** असे एकत्र बसले. **मंडणपंडित** बोलले
कीं, सहस्रमुखें ज्याला आहेत असा साक्षात् शेष जर मजबरो-
बर वाद करूं ह्मणेल, तर तोही समर्थ होणार नाहीं. मग
दुसऱ्याची तर काय शक्ति ? मजलाही फार इच्छा होती कीं,
कोणी तरी वादी भेटेल ती इच्छा आज पूर्ण होईल असें
वाटतें. आतां माझें सामर्थ्य सांगतों तें ऐकावें; मी **ईश्वराला**
न मानणारा असा असून पूर्वमीमांसक आहें; व मला **निरी-
श्वरवादी** ह्मणतात. आतां जोंपर्यंत माझें भाषण ऐकिलें
नाहीं, तोंपर्यंत आपण वादाविषयीं याचना करीत आहां नंतर
आपोआप हा वाद सोडून द्याल. याप्रमाणें **मंडणपंडितानें**
आपली प्रौढी बहुतप्रकारें सांगितली आणि आपण उद्यांपासून
वाद सुरू करूं असें सांगून **जैमिनी** व **व्यास** यांस वादाविषयीं
साक्षी व्हावें ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां **मंडणपंडिताची** स्त्री ही

**सरस्वती**चा अवतार आहे, असें जाणणारे **व्यास** व **जैमिनी** यांनी तिला साक्षी करण्याविषयीं सांगितलें. नंतर **मंडणा**नें त्या त्रिवर्गांचे उत्तम प्रकारें पूजा केली व पुढें ते त्रिवर्ग मूहूर्तपर्यंत कांहीं विचार करीत बसले होते. नंतर **व्यास** व **जैमिनी** स्वस्थानाला गेले आचार्य मात्र नर्मदातटाकीं, कदंबादिक वृक्षानीं रम्य अशा आ ग्रामामध्यें एक सुंदर देवालय होतें, तेथें जाऊन राहिले. दु सरे दिवशीं सकाळीं नर्मदेचें स्नान करून आपला आन्हिकवि आटपल्यानंतर ब्रह्म जाणणारांमध्यें श्रेष्ठ असे ते **श्रीशंकराचार्य** शिष्यांसह **मंडण**गृहीं येऊन पंडितांनीं युक्त अशी जी त्याची सभ त्यांत प्रवेश करून मोठ्या उत्सुकतेनें वाद करण्याविषयीं **मंडण** पंडिताची वाट पहात बसले. नंतर **मंडण**पंडित भार्येसहवर्त मान येऊन भार्येला सादस्यस्थानीं[१] बसण्याविषयीं आज्ञा करू आपण वादाविषयीं उत्कंठित असे **आचार्यांचे** संमुख बसले नंतर उभयतांनीं प्रतिज्ञा केल्या त्या अशा.

**आचार्य** बोलले कीं, ब्रह्म सत्य आहे व तें मी सिद्ध करितों आतां जर माझा पराजय होईल तर मी काषाय वस्त्राचा व सं न्यासाचा परित्याग करून श्वेत वस्त्र धारण करून गृहस्थाश्रम घेईन. या वादाचा निश्चय ह्मणजे कोणाला जय मिळाला व को णाला नाहीं अशाबद्दल जो निकाल करणें तो **सरस्वती** क रील. याप्रमाणें **आचार्यांची** प्रतिज्ञा झाल्यानंतर **मंडण** आपली प्रतिज्ञा करितात कीं, वेदाचा पूर्व भाग ह्म० कर्मकांड हा प्रमाण आहे व तोच सर्वांना कारण आहे, तो मी सत्य करून दाखवितों. जर माझा पराजय होईल तर तुझ्या उलट मी शुक्ल वस्त्राचा व

---

१ सभेंतील एक मुख्यस्थान आहे. यज्ञामध्येंहि सादस्य म्हणून ऋत्विक् करितात त्यानें कांहीं कृत्य न करितां फक्त कर्म कसें चालतें तें पहावें इतकेंच कृत्य त्याकडे असतें.

ग्रहस्थाश्रमाचा परित्याग करून काषाय वस्त्र व संन्यास यांचा स्वीकार करीन. याला साक्षीभूत तूं सांगितलेली ही **भारती** आहे, असें ह्मणून आपल्या स्त्रियेकडे पाहिलें. तेव्हां तिनें मान्य केलें यांप्रमाणें उभयतांनीं **सरस्वतीला** (मंडणस्त्रीला[1]) साक्षी करून वाद करण्यास तयार झाले; तेव्हां **सरस्वतीनें** उभयतांचे कंठामध्यें पुष्पमाला घालून सांगितलें कीं, ज्याची माळ कोमेजून जाईल त्याचा पराजय झाला असें मी समजेन असें सांगून आपण ग्रहांत गेली. नंतर उभयतांचा वाद सुरू झाला, त्यावेळीं **ब्रह्मदेव** आदिकरून देव विमानांत बसून तो चमत्कार पहाण्याकरितां तेथें अंतरिक्षांत येऊन राहिले.

याप्रमाणें वाद चालला असतां **सरस्वती** मध्यान्ह कालीं येऊन, आपल्या पतीला भोजनाला आणि **आचार्यां**ना भिक्षेला चलावें अशी नित्य प्रार्थना करीत असे आणि मग उभयतांनीं भोजनाला व भिक्षेला उठावें आणि पुनः येऊन वाद सुरू करावा. असा क्रम चालला असतां **आचार्यांनीं मंडणाचें** बहुत प्रकारें खंडण केल्यानंतर तो **आचार्यां**ला बोलला कीं, जीवेश्वराचें ऐक्य आहे, असें जें आपलें मत त्याविषयीं मला कोठें प्रमाण दिसत नाहीं. व जीं उपनिषद्वाक्यें प्रमाण ह्मणून मानतां त्यांला पुरुषार्थत्व[2] नाहीं. ह्मणून त्यांना प्रमाण मानतां येत नाहीं. ह्मणून तुमचा सिद्धांत मला मान्य नाहीं. तेव्हां **आचार्यांनीं** अनेक श्रुतिप्रमाणांनीं ब्रह्मसिद्ध करून अद्वैतच स्थापित केलें; व तें **सरस्वती**ला मान्य झालें. आपल्या भर्त्याचे कंठांतील माला म्लान झालेली पाहून तिनें **आचार्य**मताला अनुमोदन दिलें, आणि उभयतांलाही भिक्षेकरितां चला, असें सांगितलें. नंतर **सरस्वती शंकराचार्यां**ला बोलली कीं, पूर्वी मला **दुर्वास**शाप

---

१ मण्डणाची स्त्री, सरस्वती. २ कर्म सफलता.

झाला होता; त्या शापाची अवधी तुला जय प्राप्त होईपर्यंतच होती. तेव्हां आतां मी स्वस्थानीं जातें असें सांगून निघाली, तेव्हां आचार्यांनीं मंत्र सामर्थ्यानें तिचें बंधन केलें. आतां आचार्यांनीं हें जें सरस्वतीचें बंधन केलें तें, केवल तिच्याशीं वाद करावा या हेतूनें केलें, व तो वादही आपण सर्वज्ञ आहों असें लोकांनीं ह्मणावें अशा प्रतिष्ठेकरितां नव्हे, तर आपल्या अद्वैतमताचा सिद्धि व्हावी ह्मणून होय. कारण सरस्वतीला जें मत मान्य झालें तें इतरांला सहज होईलच. नंतर प्रार्थना करून सांगितलें कीं, मी जोंपर्यंत येथें रहा ह्मणेन तोंपर्यंत आपण रहावें. असें आचार्यांचें वाक्य ऐकून सरस्वतीनें तें मान्य केलें. नंतर मंडणांनीं आचार्यांना, जैमिनीसूत्राचा जो कर्मपर आशय आहे, त्याविषयीं प्रश्न केला. तेव्हां आचार्यांनीं त्याचें यथायोग्य समाधान केल्यानंतरही त्याबद्दल निश्चय होईना ह्मणून, मंडणांनीं जैमिनीचें ध्यान केलें. तेव्हां जैमिनी प्रकट होऊन सांगितलें कीं, शंकराचार्यांनीं जो माझ्या सूत्राचा अर्थ केला तोच खरा आहे. कारण माझ्या गुरुंनीं जीं ब्रह्मसूत्रें केलीं, त्यांचेंही ज्यांनीं यथार्थ व्याख्यान केलें त्यांना माझा आशय दुर्बोध कसा होईल. शिवाय ज्या गुरूपासून मला ज्ञानप्राप्ति झाली, त्यांचें सिद्धांताला माझा सिद्धांत कदापि विरुद्ध होणार नाहीं. करितां जो आचार्यांनीं अर्थ केला तोच खरा आहे. व त्याप्रमाणेंच तूंही त्या अर्थाचा विचार करून स्वीकार करावा. आतां तुला अत्यंत गुह्य गोष्ट सांगतों ती ऐक. संसार समुद्रांत जे निमग्न होऊन गटकळ्या खात आहेत, त्याचे उद्धारार्थ साक्षात् शिवानीं हा शंकराचार्य या नामेंकरून अवतार धारण केला आहे. तेव्हां त्यांजविषयीं शिवस्वरूपाची भावना करून त्यांचे ठिकाणीं विश्वास ठेव. चार युगांमध्यें चार

ब्रह्मनिष्ठ ज्ञानदाते होतील असें **शिवपुराणांत** स्पष्ट सांगितलें आहे. त्यांत पहिला आद्य, कृतयुगांत **कपिलमहामुनि,** त्रेतायुगांत **दत्त,** द्वापारांत **श्रीवेदव्यास,** आणि कलियुगांत **श्रीमच्छंकराचार्य** या नामानें **शंकर.** तेव्हां तूं त्यांला शरण जाऊन संसार समुद्रांतून तरण्याविषयीं यत्न कर. याप्रमाणें **जैमिनींनीं मंडणाला** बोध करून, आपण गुप्त झाले. नंतर **मंडणपंडित** श्रीगुरू **आचार्यांना** वंदन करून बोलले कीं, मी आतां आपण कोण हें निश्चयात्मक जाणलें, आपण साक्षात् **शंकराचा** अवतार आहां. जगताचा उद्धार करावा, या उद्देशानें आपण या भूलोकीं, अवतार धारण केला आहे. तर आपलें स्वरूप न जाणून जें मी कांहीं दुरुक्तीनें बोललों त्याची आपण क्षमा करण्याविषयीं समर्थ आहां. शिवाय श्रुतीच्या निश्चितार्थाविषयीं **कपिल, गौतम, काणाद,** आदिकरून मोठे समर्थ असतां, त्यानांही मोह प्राप्त झाला. परंतु, आपण तो श्रुत्यर्थ यथार्थ केला तेव्हां आपण केवळ **शंकरच** आहां यांत संशय नाहीं; नाहींतर श्रुत्यर्थाच्या निश्चयाविषयीं दुसरा कोणीही समर्थ नाहीं. शिवाय कापिल आदिकरून जीं मतें त्यांचें खंडण करण्याविषयीं कोण समर्थ होईल. आतां आपल्या दर्शनानेंच माझा सर्व संदेह गेला व हा लाभ माझे पूर्व सुकृतानें मिळाला असें मी समजतों. आतां मी कृतार्थ झालों यांत संदेह नाहीं. आतां मी सर्व परित्याग करून आपल्याला शरण आहें, करितां या दासाला जी आज्ञा करणें असेल ती करण्याविषयीं **श्रीगुरु** समर्थ आहेत. याप्रमाणें **मंडणाचें** भाषण श्रवण करून त्यावर प्रसाद करावा, असें मनांत आणून **आचार्यांनीं** त्याची पत्नी जी **सरस्वती** तिजकडे पाहिलें, तेव्हां **आचार्यांचा** अभिप्राय जाणून ती बोलली कीं, हे यतिश्रेष्ठ, मी आपला अभिप्राय समजलें. परंतु माझें

या जन्मीचें भविष्य, एका तापस्याच्या मुखांतून मी ऐकिलें आहे; तें सांगत्यें करितां तें या सर्व सभ्यजनांसहवर्तमान आपण ऐकावें. बालपणांत एकावेळीं मी आपल्या मातेजवळ तिची सेवा करीत असतां, तेथें एक तापसी आला असून त्याचे मस्तकावर जटाभार, सर्वांगास शुभ्र भस्म लाविलेलें होतें, व त्याचें स्वरूप दैदीप्यमान व तेजःपुंज असल्यामुळें हा दुसरा सूर्यच कीं काय ! असा भास होई. याप्रमाणें तो आ- ल्यानंतर माझ्या आईनें त्याची अर्घ्य पाद्य आदिकरून सर्व उ- पचारांनीं पूजा केली, आणि हात जोडून माझें पुढील भविष्य त्याला विचारिलें. ती ह्मणाली हे भगवन्, माझ्या या मुलीचें भविष्य आपण तपोबलानें जाणतच आहां; करितां कृपा करून तेवढें मला सांगावें. ह्या माझ्या कन्येला आयुष्य किती आहे ? व हिला नवरा कसा मिळेल? व ही धनधान्ययुक्त अशी यज्ञादि- कृत्यें करील किंवा कसें ? तें सर्व मला सांगावें. याप्रमाणें आ- ईचा प्रश्न ऐकल्यानंतर त्या तापस्यानें थोडा वेळ नेत्रमीलन करून विचार केला. आणि जरी हें सर्व अत्यंत गुप्त होतें, तथापि त्यानें सांगितलें तो ह्मणाला, या अखिल भूतलावर वेद- बाह्यमत प्रबल झालें आहे, ह्मणून त्याचा नाश करून वेद- मार्गाचा उद्धार करण्या करितां ब्रह्मदेवांनीं **मंडणकवींद्र** या नामें करून अवतार घेतला आहे. तेव्हां **पार्वती** जशी **शंक- राला**, व **लक्ष्मी** जशी **विष्णूला** प्राप्त झाली, तशी ही तुझी कन्या त्या **मंडणकवींद्राला** प्राप्त होऊन तीं उभयतां यज्ञादिकर्मे करून पुत्रासह आनंदानें कालक्रमण करतील. नंतर नष्ट झा- लेला जो उपनिषद्भाग त्याचें संजीवन करण्याकरितां **श्रीशंकर** गुरुरूप धारण करून व दुष्ट मताचे खंडण करून या भूमीला, अलंकृत करतील. नंतर यतिवेष धारण करणारे जे **शंकर**

त्यांचा आणि तुझ्या जामाताचा संवाद होईल. व त्यांत त्यानीं तुझ्या जामातास जिंकल्यामुळें सर्व संग परित्याग करून तो त्यांना शरण जाईल. असें सांगून तो तापसी निघून गेला. तर त्यानें कथन केल्याप्रमाणें सर्व घडून आलें. व माझ्या पतीला आपलें शिष्यत्व हि प्राप्त झालें; कारण मुनीचें भाषण अन्यथा कसें होईल. परंतु मला जिंकल्यावांचून मात्र आपण माझे पतीला जिंकलें असें ह्मणता हें बरोबर नाहीं कारण "[1]आत्मनोर्द्धपत्नीं" अशी श्रुति आहे, करितां मला जिंकून नंतर ह्यांना शिष्य करावें. आतां आपण सर्व जगताला कारण असा जो शंकर त्याचे अवतार असून तें मी न जाणून वादाला प्रवृत्त झाल्यें अशी शंका येईल तर तें सर्व मी जाणत आहें; परंतु आपल्याशीं वाद करण्याविषयीं माझें हृदय अत्यंत उत्सुक झालें आहे. करितां कांहीं वेळ वाद व्हावा. असें तिचें भाषण श्रवण करून आचार्य अत्यंत संतोषी होऊन बोलले कीं, तुझें हृदय वादाविषयीं उत्सुक आहे असें सांगितलें, परंतु आमच्यासारख्यांना स्त्रियांबरोबर वाद करणें हें प्रशस्त नाहीं. तेव्हां वाद कसा करावा? हें भाषण श्रवण करून त्यावर सरस्वती बोलली कीं, जो आपलें मत स्थापन करण्या करितां प्रवृत्त झाला त्याला तद्विरुद्ध खंडण करणारे पुरुष असोत, अगर स्त्रिया असोत, त्यांबरोबर वाद करून आपला पक्ष स्थापन करणें हेंच योग्य आहे व तसें करणारा कोणत्याही रीतीनें प्रत्यवायी होत नाहीं. याला पूर्वीचा इतिहासही प्रमाण आहे. तो असा, याज्ञवल्क्य आणि गार्गी यांचा संवाद झाला आहे. ही कथा बृहदारण्यकांत आहे. तसेंच जनक व सुलभा यांचाही वाद झाला आहे, ही कथा भारतांतील शांतिपर्वामध्यें मोक्ष-

---

१ पत्नीही आत्म्याचें अर्ध आहे

धर्मांत सांगितली आहे. तेव्हां **याज्ञयल्क्य** व **जनक** हे महात्मे होते किंवा नाहीं, कीं आपणच आहां? अशा प्रकारें सयुक्तिक भाषण ऐकतांच **आचार्यांनीं** वाद करण्याचें मान्य केलें; तेव्हां वाद सुरू झाला. नंतर सर्व शास्त्रांत **आचार्यांनीं** तिला जिंकिलें. तेव्हां कामशास्त्रांत प्रश्न केला असतां हे कुंठित होतील, असें तिनें मनांत आणून त्या शास्त्राविषयीं प्रश्न केला कीं, **"कलाः कियंत्यो वदपुष्पधन्वनः किमात्मिकाः किंचपदंसमाश्रिताः । पूर्वेच पक्षे कथमन्यथा स्थिती कथं युवत्यांकथमेव पूरुषे ॥"** (अर्थ) कामाच्या कला किती आहेत? त्या कशा स्वरूपाच्या आहेत, त्या कोणत्या स्थानाचा आश्रय करून राहतात व त्यांची पूर्वींची स्थिति व परिणामस्थिति कशी आहे व स्त्रीपुरुष यांचे ठिकाणीं त्यांचें वैलक्षण्य काय? इत्यादि त्या शास्त्रांतील अनेक प्रकारें प्रश्न केले, तेव्हां **आचार्यांनीं** विचार केला कीं, ह्या कलांची संख्या कशी समजते? बरें ती जाणण्याविषयीं यत्न केला तर यतिधर्माचा भंग होणार. आतां जरीं मी ज्ञानबलानें सांगण्यास समर्थ आहें तरी जगतामध्यें परमहंसव्रताचा नियम रक्षण करण्याकरितां तसें करणें योग्य नाहीं असा विचार करून जसें काय कामशास्त्र अगदीं अवगतच नाहीं अशा रीतीनें कांहीं वेळ स्तब्ध राहून बोलले कीं, तुझ्या प्रश्नाचें उत्तर देण्यास एक महिन्याची अवधी पाहिजे. ह्मणजे त्या शास्त्रांतही तुला कुंठित करीन, तेव्हां तें **सरस्वतीनें** मान्य केलें. तेव्हां **आचार्य** तिचा निरोप घेऊन शिष्यासह आकाशमार्गानें निघाले. आणि संचार करीत असतां एके ठिकाणी राजदेह पाहिला व तेथें त्या राजाच्या स्त्रिया व अमात्य हे त्याविषयीं शोक करीत आहेत; असें पाहून **आचार्यांनीं पद्मपाद** आदिकरून सर्व शिष्यांस

सांगितलें कीं, ज्याच्या अनेक स्त्रिया आहेत, असा हा अमरक नामेंकरून राजा गतप्राण होऊन भूमीवर पडला आहे तर त्याचे देहांत प्रवेश करून तेथें कामशास्त्राचें ज्ञान करून घ्यावें आणि त्याचे पुत्राला राज्यावर स्थापून पुनः योगबलानें परत यावें, असें मनांत आलें आहे, तर या विषयीं तुमचा अभिप्राय कसा आहे, असें आचार्यांचें वाक्य ऐकून शिष्यांनीं सांगितलें; महाराज, आपण सर्वज्ञ अहां, तेव्हां अल्पबुद्धींनीं सांगणें बरोबर नाहीं. तथापि भक्तीस्तव पूर्वीचा एक कथाभाग सांगतों—पूर्वीं **मत्स्येंद्रनाथ** ह्मणून एक महान् योगी होते, त्यांनीं आपला शिष्य गोरक्ष ह्मणून होता, त्याला आपल्या देहाचें रक्षण करण्याविषयीं सांगून आपण विषयसुखोपभोगसेवनाकरितां एका राजाचे देहांत प्रवेश करून ते राज्य करूं लागले. तेव्हां महानीतीनें राज्य करीत असतां प्रजेला दुःख ह्मणून माहित नाहीं असें झालें. व पर्जन्य योग्यकालीं पडूंलागल्यामुळें सर्वत्र सुभिक्ष झालें, तेव्हां त्याच्या प्रधानांनीं विचार केला कीं, ह्या राजदेहामध्यें कोणी तरी दिव्य योग्यानें प्रवेश केला असावा, कारण एकदां राजा गतप्राण झाला असतां सजीव झाला आहे; करितां हा येथून न जाई अशी युक्ति केली पाहिजे, ह्मणून त्यांनीं तो वश होण्याकरितां, व त्याच राजदेहांत रममाण होण्याकरितां सुंदर सुंदर स्त्रिया त्यांजकडे पाठविल्या, आणि त्यांना सांगितलें कीं जेणेंकरून राजाचें रक्षण होईल तसें करा. नंतर तो त्या स्त्रियांबरोबर रममाण होऊन आपला योग वगैरे सर्व विसरून तो प्राकृत पुरुषाप्रमाणें बनला! हें वर्तमान शिष्य गोरक्षानें ऐकून तो गुरूचा देह नीट व्यवस्थेनें ठेवून त्या नगरांत आला. आणि गवय्या बनून त्या स्त्रियांना गान, नृत्य, आदिकरून शिकवूंलागला. तेणेंकरून त्याची दाद

राजापर्यंत लागून त्यांजबरोबर तो राजाजवळ गेला; आणि ए कांतसंधी साधून, त्यानें तत्त्वबोधानें त्याला पूर्वीच्या देहां आणिलें. त्याप्रमाणेंच हाही विषय आहे, करितां त्याचा विचार करण्याविषयीं श्रीगुरु समर्थ आहेत. आतां आपली योग्यता कोठें, आणि तें अति निंद्यकामशास्त्र कोठें! शिवाय:—

"यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनु वर्तते" ॥

असें भगवद्वाक्य आहे कीं, आपल्यासारखे थोर जसें आचरण करतील, तसें लोकवर्तन होणार; करितां याचा विचार करावा. आतां यतिधर्म प्रकाशित करण्याविषयीं कंकणबंधन करणारे जे आपण त्या आपल्याला सर्व विदितच आहे. तथापि प्रेमानें व माझ्या बुद्धिप्रमाणें सूचनार्थ जें बोललों त्याजबद्दल क्षमा असावी. तेव्हां आचार्य बोलले कीं, हे सर्व बंध आसक्तियुक्ताला होतात, निर्मुक्ताला होत नाहींत; कारण श्रीकृष्ण जरी गोपींचा सखा होता, तथापि तो बद्ध झाला नाहीं. कारण बंधन होण्याला संकल्प हा हेतु आहे, तेव्हां सर्व प्रकारें जगन्मिथ्या व ब्रह्म सत्य मानणाऱ्याला कोणत्याही कर्मानें बंधन होत नाहीं. जसें स्वप्नांतील सुकृतें अगर दुष्कृतें हीं केव्हांही फल देणारीं होत नाहींत; कारण तीं खोट्या बुद्धीपासून उत्पन्न असतात. ह्मणून असा जो सर्व जगताला मिथ्या मानतो, तो अश्वमेधादिक सुकृतें करो, अगर ब्रह्महत्यादिक दुष्कृतें करो, तथापि परमार्थवेत्ता असल्यामुळें तो त्या सुकृतानें किंवा दुष्कृतानें युक्त होत नाहीं. कारण त्याचा कर्तृत्वाभिमानच नष्ट झालेला असतो. आतां दुष्कृताविषयीं उदाहरण सांगतों तें ऐका—त्वष्टृपुत्र जो त्रिशिर त्याचा इंद्रानें वध केला, परंतु तो त्या कर्मानें लिप्त झाला नाहीं; अशी क

ऋग्वेदांत आहे. आतां मुक्ताविषयींही आख्यायिका आहे ती अशी एकदां जनकानें अश्वमेध करून ब्राह्मणांस बहुत दक्षिणा दिली. परंतु, तो कर्मानें लिप्त झाला नाहीं. तेव्हां तत्त्ववेत्ता उभयकर्मांनेंही बद्ध होत नाहीं. आतां जरी मीं या शरीरानें कामशास्त्राचा अभ्यास केला तरी चिंता नाहीं. परंतु, शिष्टसांप्रदायाला विरोध येईल ह्मणून, अन्य शरीरांत प्रवेश करून तो अभ्यास करण्याविषयीं यत्न करण्याचें मनांत आणिलें आहे.

याप्रकारें शिष्यांचा संशय दूर करून अति दुर्गम अशा पर्वताच्या शिखरावर जाऊन शिष्यांस सांगितलें कीं, जोंपर्यंत मी कामशास्त्रकलांचा परिचय करून परत येईन, तोंपर्यंत तुह्मीं या गुहेंत माझ्या शरीराचें रक्षण करावें. अशी शिष्यांस आज्ञा करून, योगबलानें आपला स्थूल देह तेथें ठेवून, ज्ञानेंद्रियेंकरून युक्त अशा लिंगदेहानें श्रीशंकराचार्यांनीं, त्या राजदेहामध्यें प्रवेश केला. तेव्हां तो राजा थोडें आंग हालवूं लागला, व पुढें सजीव झाला. तेव्हां त्याला सजीव पाहून सर्व स्त्रियांचीं मुखकमलें अरुणोदयकालच्या प्रफुल्लित कमलांप्रमाणें दिसूं लागलीं. तेव्हां त्यांना व सर्व अमात्यांना व इतर सर्व प्रजाजनाला आनंद होऊन, त्यांनीं शंख आदिकरून वाद्यें वाजविलीं. तेणेंकरून सर्वत्र आनंद झाला. नंतर पुरोहित आदिकरून सर्व ब्राह्मणांनीं शांतिककर्में करून, मोठ्या थाटानें सर्व लोकांनीं राजासह नगरांत प्रवेश केला. नंतर संपूर्ण परिवारजनाचें सान्त्वन करून, आपल्या प्रधानमंडलानें युक्त असा तो राजा, स्वर्गींतील इंद्राप्रमाणें भूमीचें पालन करूं लागला. तेव्हां त्याच्या त्या वर्तनावरून अत्यंत बुद्धिमान् अशा प्रधानांनीं एकत्र होऊन विचार केला कीं, प्रजेच्या भाग्यानें हा राजा मृत

असतां सजीव झाला. परंतु प्रकृतिभाग्यानें हा आमचा पूर्वींचा राजा आहे असें वाटत नाहीं. कारण हा सर्वगुणसंपन्न आहे, जो याचकांना ययातिराजाप्रमाणें धन देणारा, व सुरगुरुप्रमाणें अर्थज्ञ व भाषण करणारा, तसाच परराजाला जिंकण्याविषयीं साक्षात् अर्जुन आणि महादेवाप्रमाणें सर्वज्ञ आहे; तेव्हां याचेसारखा गुणसंपन्न कोणी नसेल, तर परमपुरुष जो ह्मणतात तो हाच आहे, असें वाटतें. शिवाय हा राजा सजीव झाल्यापासून अकालींच सर्व वृक्ष पुष्पानें व फलानें युक्त झाले आहेत! तशाच गाई बहुत दुग्ध देऊं लागल्या! पर्जन्य योग्य व पाहिजे तसा पडत आहे! संपूर्ण धान्यें पूर्णदशेला आलीं, व चारहि वर्ण आपल्या स्वधर्माचे ठिकाणीं रत आहेत. फार काय सांगावें कीं, आज आमच्या महाराजाच्या प्रभावानें संपूर्ण दोषांची खनि जें कलियुग तें, त्रेतायुगाप्रमाणें भासूं लागलें आहे! तेव्हां असें खचित वाटतें कीं, कोणी ऐश्वर्यसंपन्न योगबलानें महाराजांच्या शरीरांत प्रवेश करून हा राज्योपभोग करितो आहे. तेव्हां असा गुणांचा केवल समुद्र पुनः आपल्या स्वशरीरांत परत न जाई, अशी कांहीं तरी युक्ति केली पाहिजे. असा विचार करून दूतांना आज्ञा केली कीं, तुह्मी सर्वत्र शोध करून ज्या ठिकाणीं तुह्माला कोणाचें मृत शरीर सांपडेल तें विचार न करितां एकदम दहन करावें. अशी आज्ञा करून, दूतांना पाठविलें. इकडे राजानें आपला सर्व राज्यकारभार प्रधानावर सोंपवून आपण स्त्रियांबरोबर यथेच्छ क्रीडा करून, अनेक प्रकारें भोग भोगून वात्स्यायन[1] शास्त्राचें पूर्ण अध्ययन करून, त्याचा स्वतः अनुभव घेतला.

---

१ कामशास्त्राचा कर्ता वात्स्यायनऋषि.

इकडे आचार्यांच्या आज्ञेप्रमाणें जे शिष्य त्यांचे शरीराचें रक्षण करीत होते, त्यांनीं विचार केला कीं, गुरूंनीं एक महिन्यानें परत येतों असें सांगितलें होतें, परन्तु त्यास एक महिना होऊन गेला, तथापि अजून परत आले नाहींत; तेव्हां आतां कसें करावें, त्यांना कोठें शोधावें, ते अमुक ठिकाणीं आहेत, असें कोण सांगूं शकेल? आह्माला तर ते कोठें आहेत याचें मुळींच ज्ञान नाहीं. एक मास गुरूचें सान्निध्य नसल्यामुळें आपल्याला अत्यंत दुःख होत आहे. आणि जरकरितां आतां त्यांचें दर्शन न होईल तर आमची गति नीट दिसत नाहीं. याप्रमाणें सर्व शिष्य आचार्यांविषयीं शोक करूं लागले. तेव्हां पद्मपादांनीं त्या सर्वांचें सान्त्वन केलें, आणि ते ह्मणाले, आपण या ठिकाणीं बसून शोक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, तर सर्वांनीं मिळून शोधाला लागावें हें बरें, ह्मणजे कोठें तरी त्यांचें दर्शन होईल. असें सांगून कांहीं शिष्य त्यांच्या शरीराच्या रक्षणार्थ ठेवून बाकीचे निरनिराळ्या दिशेला गुरूच्या शोधाकरितां निघाले. ते फिरत फिरत त्या राजाच्या राज्यांत आले. आणि तेथें ऐकिलें कीं, या देशाचा अमरकनामें राजा मृत झाला असतां पुनः जीवंत होऊन राज्य करीत आहे. तेव्हां त्यांना थोडें धैर्य येऊन त्यांनीं निश्चय केला कीं, हेच आपले गुरु आचार्य आहेत. नंतर त्या नगरींत जाऊन तरुण स्त्रियांच्या गायनामध्यें राजा अगदीं लुब्ध झालेला पाहून तेही गायकवेष धरून राजसभेंत गेले, तेव्हां राजानें त्यांचा सत्कार करून आसन दिल्यावर त्यांनीं गायनास आरंभ केला. त्यांत त्याला सूचना केली कीं, आपण आमचे गुरु आहां, आपल्या आज्ञेप्रमाणें पर्वतावर आपल्या शरीराचें आह्मीं रक्षण करीत आहों. आपल्या विरहानें आह्मी फार दुःखी आहों. आपण

शिवगुरुपासून उत्पन्न झालां आहां. व्याससूत्रावर भाष्य करणारे ते आपण आहां. असा आणखी अनेक प्रकारें प्रपाद आदिकरून शिष्यांनीं बोध केल्यानंतर आचार्यांना पूर्वस्मरण होऊन तो देह सोडण्याची इच्छा करितां एकाएकीं राजाला त्या सभेंतच मूर्च्छा आली. आणि तो राजदेह सोडून आचार्य त्या लिंगदेहानें आपल्या पूर्वदेहांत प्रवेश करण्याकरितां निघून, आपल्या देहाजवळ येऊन जों पाहतात, तों इतक्यांत इकडे ते राजदूत, अमात्यांचे आज्ञेप्रमाणें मृतशरीरें शोधनार्थ फिरत होते त्यांनीं तो आचार्यांचा देह घेऊन त्याचें दहन करण्याकरितां चितेवर ठेवून त्याला अग्नि लाविला होता, तेव्हां आचार्यांनीं त्या देहांत प्रवेश करून त्या संकटांतून, आपलें रक्षण व्हावें ह्मणून नृसिंहाची आराधना केली. तेव्हां नृसिंह प्रकट होऊन त्यांच्या कृपेनें तो अग्नि शांत होऊन, जसा चंद्रमा राहूपासून मुक्त होतो, त्याप्रमाणें आचार्य त्या संकटापासून मुक्त झाले. नंतर सर्व शिष्यांसह पुनः मंडणपंडिताच्या घरीं आले. तेव्हां त्यानें त्यांचा मोठा सत्कार करून त्यांची सर्व उपचारांनीं पूजा करून मोठा उत्सव केला. नंतर सरस्वती आचार्याला वंदन करून बोलली कीं,

"ईशानः सर्व विद्यानां ईश्वरः सर्व देहिनाम् ।
ब्रह्मणोधिपतिर्ब्रह्मन्भवान्साक्षात्सदाशिवः ॥ १ ॥"

अर्थ—हे ब्रह्मन्, आपण सर्व विद्यांचे सर्व भूतांचे ईश आणि ब्राह्मणांचे अधिपति असून साक्षात् सदाशिवच आहां. आतां सभेमध्यें, कामशास्त्रांत मला जिंकण्याकरितां जो आपण यत्न केला तो केवळ मनुष्यधर्माला अनुसरून आहे. वस्तुतः आपण सर्वज्ञ आहां. आपण आह्मां उभयतांना जिंकलें तरी

त्यांत आह्माला कांहींही लज्जा वाटत नाहीं; कारण आपण साक्षात् परब्रह्म असून आपल्याबरोबर आह्मीं वाद केला. तेव्हां सर्वज्ञानें अल्पज्ञाला जिंकणें हें साहजिक आहे. असें सांगून आतां मी स्वस्थानाला जातें, तर आज्ञा असावी. असें ह्मणून ती निघाली, तेव्हां **आचार्यांनीं** तिचा स्तव करून प्रार्थना केली कीं, मी **ऋष्यशृंग** ह्मणून एक स्थान केलें आहे; तेथें तूं येऊन सर्वांच्या इच्छित कामना पूर्ण कराव्या आणि मला सहाय्य करावें. आतां तेथें तूं **शारदा** या नामेंकरून प्रसिद्ध होशील. असें **आचार्यांचें** वाक्य ऐकून, देवीनें तें मान्य करून ती ब्रह्मलोकीं गेली. ती एकाएकीं अदृश्य होतांच सर्वांस मोठा विस्मय वाटला. व **मंडण**पंडितांनाहि मोठा आनंद झाला कीं, आपण संन्यास घेण्याचे पूर्वींच आपल्या स्त्रीनें वैधव्य न स्वीकारितां स्वस्थानीं गेली. नंतर तिचें सत्कृत्य पाहून **आचार्यां**नाहीं बहुत आनंद झाला.

नंतर **मंडणांनीं विश्वजित्** याग करून त्यांत सर्वस्व दान करून **आचार्यां**पासून विधियुक्त संन्यास घेतला. तेव्हां **आचार्यांनीं** त्यांचे कर्णामध्यें उपदेश करून "**तत्त्वमसि**" या वाक्याचा स्पष्ट विचारही सांगितला. आणि अनेक प्रकारें उपनिषदांतील सिद्धांत सांगून व त्यांतील त्यांच्या शंकेचें यथार्थ समाधान करून त्यांला आपल्या शिष्यांमध्यें श्रेष्ठ केलें, आणि त्यांचें नांव **सुरेश्वराचार्य** असें ठेविलें. नंतर **सुरेश्वराचार्यांनीं** कांहीं दिवस नर्मदातीरीं वास करून पुढें मगध देशामध्यें स्थान करून ते तेथें राहिले.

याप्रकारें **मंडणाला** जिंकून व त्याला आपला शिष्य करून सर्व शिष्यांसह **आचार्य** दक्षिण दिशेला निघाले; ते महाराष्ट्रादि

---

१ ज्यामध्यें सर्वस्व दान करितात तो यज्ञ.

देशांत संचार करीत करीत, तेथील कुमतांचें खंडन करून शुद्ध अद्वैताचें स्थापन करीत **श्रीशेषशैलपर्वतीं** गेले. आणि तेथें तुंगभद्रेचें स्नान करून त्यांनीं **श्रीशंकराचें** दर्शन घेतलें, आणि तेथें कांहीं दिवस राहून अनेकप्रकारचीं मतें खंडन करून अद्वैत मताची स्थापना केली.

एकदां **श्रीमच्छंकराचार्य** श्रीशैलपर्वतीं असतां एक कपटवेष धारण केलेला; व बाह्यचिन्हांनीं अति सभ्य दिसणारा, असा भैरवाचा भक्त कापालिक येऊन **आचार्यांना** भेटला. आणि **आचार्य** एकांतीं बसले आहेत असें पाहून, आतां आपला कार्यभाग खास होईल असें त्यास वाटून मोठा आनंद झाला; आणि **आचार्यांना** बोलला कीं, महाराज, आपली कीर्ति मी फार दिवस ऐकत होतों; परंतु माझ्या सुकृतानें आज दर्शनाचा योग आणिला, तेव्हां आज माझें भाग्य उदयाला आलें असें मी समजतों. या जगतामध्यें मोहाला वश जाहले नाहींत असे आपल्यावांचून दुसरे कोणही नाहींत. आतां आपली योग्यता मी तोंडानें काय वर्णन करूं. आपण केवल परोपकाराकरितांच अवतार घेतला आहे. आपल्याजवळ याचक येऊन तो विमुख झाला असें कधींच घडलें नाहीं. आपण मोठमोठीं कृत्यें केलींत, ह्मणून कपाली जो भैरव त्याला संतुष्ट करण्याकरितां मी यत्न करितों. कीं जो संतुष्ट झाला असतां आपल्याला कृतार्थ करील. दैवयोगानें आज मोठा सुदिन आहे. कारण आज आपलें दर्शन झालें. आतां भैरवाच्या संतोषाकरितां एक नरकपाल पाहिजे परंतु तें एक ज्यावर पट्टाभिषेक झाला आहे अशाचें किंवा जो मोठा योगी असेल त्याचेंच पाहिजे. त्यांत राजकपाल तर मला मनानेंही प्राप्त नाहीं. आतां दुसरें कपाल मिळणें हें आपल्या स्वाधीन आहे; आपण कृपा

कराल तर त्याची प्राप्ति होईल. जरकरितां आपण शिर द्याल तर आपली जगामध्यें मोठी कीर्ति होऊन माझी कार्यसिद्धि होईल; करितां शरीर नाशवंत आहे, इत्यादिकांचा विचार करून जसें आपल्याला वाटेल तसें करावें. आतां अशा कर्माला कां प्रवृत्त झालास असें आपण ह्मणाल तर जगामध्यें अनेक क्लेश होतात. करितां त्यांचे निरसनार्थ हा माझा यत्न आहे. जशी पूर्वी **वृत्रासुर**वधाकरितां **इंद्रानें दधीचि**ऋषीपाशीं त्याच्या अस्थीची याचना केली तशी मी आपल्या मस्तकाची याचना केली आहे, तेव्हां परोपकाराकरितां जसें त्या ऋषीनें आपल्या अस्थि दिल्या त्याप्रमाणें आपणही आपलें शिर द्यावें. असें त्याचें भाषण ऐकून **आचार्य** ह्मणाले कीं, मी तुझें निंद्य-कर्म आहे असें ह्मणत नाहीं. मी आपलें मस्तक देण्यास सिद्ध आहे. परंतु एकांतीं तूं व मी जाऊन तेथें मी समाधि लाविल्यानंतर तूं आपलें कार्य करावें; कारण माझे शिष्य तुला प्रसिद्धपणें तसें करूं देणार नाहींत; असा संकेत झाल्यावर तो आपल्या घरीं गेला. दुसरे दिवशीं कंठामध्यें हाडांची माळ घालून हस्तामध्यें त्रिशूल घेतला आणि मद्यप्राशनानें धुंद होऊन **आचार्यां**कडे आला. तेव्हां **आचार्यांनीं** त्याला पाहून आ-पलें मस्तक देण्याचा निश्चय करून सर्व शिष्य दूर गेले आहेत अशी संधी पाहून उभयतां एकांतीं गेले, आणि **आचार्यांनीं** सिद्धासन करून समाधि लाविला. तेव्हां त्या कापालिकानें त्यांचा मस्तक छेदन करण्याकरितां तलवार काढून आतां तोड-णार इतक्यांत **पद्मपादांनीं** योगसिद्धीनें जाणलें कीं, कापालिक **आचार्यांचा** नाश करीत आहे, तेव्हां त्यांनीं **नृसिंहाचें** ध्यान करितांच **नृसिंहांनीं** त्यांच्या शरीरांत प्रवेश करून त्या **नृहरि-**स्वरूपानें जेथें तो कापालिक तें दुष्टकर्म करीत होता तेथें ते

आले; आणि त्यांनीं जसा पूर्वी हिरण्यकशिपूचा नाश केला त्याप्रमाणें त्या कापालिकाला धरून आपल्या तीक्ष्ण नखांनीं फाडून त्याचें कपाळ फोडून टाकिलें. आणि मोठ्यानें सिंहनाद केला. तेव्हां तो भयंकर शब्द ऐकून सर्व शिष्य तेथें आले आणि पहातात तों आचार्यांनीं समाधि केला आहे, आणि छिन्नविच्छिन्न असा कापालिकाचा देह पुढें पडलेला आहे व तेथें नृसिंहस्वरूप धारण केलेला असा एक पुरुष आरक्त नेत्रयुक्त असून मुख अक्राळविक्राळ पसरून जिव्हा हालवित आहे; असा तो भयंकर प्रकार पाहून सर्वांना आश्चर्य व भय वाटलें. नंतर त्या सिंहनादानें आचार्यांनीं आपला समाधि उतरून पाहिलें तों, तो कापालिक मृत झाला आहे, व नृसिंहमूर्ति आपल्या समोर आहे. तेव्हां त्या मूर्तीला अवलोकन करून तिचा स्तव केला. आणि प्रार्थना केली कीं, या देहाचें

---

(१) नरहरे हरकोपनमर्थदं तव रिपुर्निहितो भुवि वर्तते । कुरुकृपां मयि देव सनातनीं जगदिदं भयमेति भवद्दशा ॥ १ ॥ तव वपुः किलसत्वमुदाहृतं तव हि कोपनमण्वपि नोचितं । तदिह शान्तिमवाप्नुहि शर्मणे हरगुणं हरिराश्रयसे कथम् ॥ २ ॥ सकलभीतिषु दैवतमस्मरन्सकलभीतिमपोह्य सुखी पुमान् । भवति किं प्रवदामि तवेक्षणे परमदुर्लभ मेव तवेक्षणम् ॥ ३ ॥ स्मृतवतस्तव पादसरोरुहं मृतवतः पुरुषस्य विमुक्तता । तव कराभिहतो मृतभैरवो नहि स एष पुनर्भवमेष्यति ॥ ४ ॥ दितिजसूनुममुं व्यसनार्दितं सकृदरक्षदुदारगुणो भवान् । सकलगत्वमुदीरतमस्फुटं प्रकटमेव विधित्सुरभूत्पुरा ॥ ५ ॥ सृजसिविश्वमिदं रजसावृतः स्थितिविधौ श्रितसत्व उदायुधः । अवसि तद्धरणे तमसावृतो हरसि देव तदा हरसंज्ञितः ॥ ६ ॥ तव जनिर्नगुणास्तव तत्वतो जगदनुग्रहणायभवादिकम् । तव पदं खलु वाङ्मनसातिगं श्रुतिवचश्चकितं तव बोधकं ॥ ७ ॥ नरहरे तव नाम परिश्रवात्प्रथमगुह्यकदुष्पिशाचकाः । अपसरन्ति विभोऽसुरनायका नहि पुरः स्थितये प्रभवन्त्यपि ॥ ८ ॥ त्वमेव सर्गस्थितिहेतुरस्य त्वमेव नेता नृहरेऽखिलस्य । त्वमेव चिन्त्यो हृदयेऽनवद्ये त्वामेवचिन्मात्रमहं प्रपद्ये ॥ ९ ॥ हतो वराको हि रुषं नियच्छ विश्वस्य

रक्षण करण्याकरितां आपण प्रगट झालां; तें आपलें कार्य झालें, तर या मूर्तीचा उपसंहार करावा. अशी प्रार्थना केल्यानंतर ती मूर्ति गुप्त होऊन **पद्मपाद** आपल्या पूर्वरूपानें दिसूं लागले. आणि त्यांना जसा स्वप्न पडावा तशी स्थिति झाली. असा चमत्कार ऐकून सर्वांनीं व शिष्यमंडळीनीं **आचार्यांचा** स्तव केला. तेव्हां **आचार्य** बोलले कीं, जो हा तुह्मी केलेला स्तव व ही कथा श्रवण करील त्याला कोठेंही भय होणार नाहीं.

नंतर एकदां **आचार्य** सर्व शिष्यांसह तीर्थयात्रा करीत फिरत असतां घोर कलीपासून रक्षण करण्याविषयीं व संपूर्ण पातकांपासून मुक्त करण्याविषयीं समर्थ असें जें गोकर्णक्षेत्र त्याठिकाणीं येऊन ब्रह्मादि देव ज्याचा स्तव करितात, व जो सर्व प्रपंचाचा सूत्रधार ह्मणजे चालक, असा जो **श्रीशंकर** त्याला वंदन करून स्तव केला कीं, हे देवा, तूं सत्त्व, रज आणि तम, या गुणांहून निराळा आहेस. भक्तांची दुःखें नष्ट करण्याविषयीं तूंच एक समर्थ आहेस. अशा प्रकारें गोकर्णनाथ जो **श्रीमहाबलेश्वर** त्याची स्तुति करून तेथें तीन दिवस वास केला, नंतर **हरिशंकर**स्थलीं गेले. तेथें **शंकर** व **विष्णु** हे उभयतां वास करितात; तेथें जाऊन त्या उभयतांचा ऐक्यबुद्धीनें स्तव केला. त्यांत दशावतारांची स्तुति करून त्यांतच त्या शब्दांनीं **शंकराची** स्तुति केली. अशा प्रकारें उभय देवतांची स्तुति करून संतुष्टहृदय होत्साते तेथून नजीकच **मूकांबिकेचें** स्थान आहे, तेथें जाण्याकरितां सर्व शिष्यां-

---

भूमन्नभयं प्रयच्छ । एते हि देवा शममर्थयन्ते निरीक्ष्य भीताः प्रतिखेदयन्ते ॥ १० ॥ द्रष्टुर्नशक्याहि तवानुकंपा हीनैर्जनैर्नानद्भुतकोटिशंपां । मूर्तें तदात्मन्नुपसंहरे मां पाहि त्रिलोकीं समतीतसीमाम् ॥ ११ ॥ इति आचार्यकृतनृसिंव्हस्तवः ॥

सह श्रीगुरु शंकराचार्य निघाले. तों तेथें एक चमत्कार दृष्टीस पडला कीं, एक ब्राह्मणपुत्र मृत झाल्यामुळें त्याचे आई-बाप त्याला मांडीवर घेऊन मोठा आक्रोश करीत आहेत तेव्हां आचार्यांनीं ती त्याची स्थिति पाहून हृदयामध्यें दया उत्पन्न झाल्यामुळें आपणहि शोक करण्यास आरंभ केला. तेव्हां आकाशवाणी झाली कीं, संरक्षण करण्यास जो समर्थ असतो त्याणें दया करणें हें त्यालाच दुःखप्रद होतें. अशी ती वाणी श्रवण करून आचार्य बोलले कीं, हें खरें आहे परंतु, त्रैलोक्य-रक्षण करण्याविषयीं जो समर्थ असेल त्याला हें बोलणें शोभतें करितां आपण सर्वांचें रक्षण करण्याविषयीं समर्थ आहां तर कृपा करून या उभयतांचा शोक दूर करावा. असें आचार्य बोलत असतांच तो मुलगा जसा एखादा निजून उठावा, तसा उठला! तेव्हां सर्वांस आनंद झाला. व त्यावेळीं तेथें प्रत्यक्ष पाहाणाऱ्या सर्व लोकांना आचार्यचरित्राबद्दल मोठा विस्मयही झाला. नंतर आचार्य सिद्धिस्थानीं गेले. व तेथें मूकांबिकेच्या मंदिरांत जाऊन तिची पूजा केली, आणि तिचा स्तव करून तेथून जवळ असणारा; व सर्व ब्रह्मवृंदांस अग्रहार जो श्रीवलिनामक ग्राम तेथें जाऊन त्या ठिकाणी कांहीं दिवस वास केला. त्या गांवांत प्रत्येक घरीं अग्निहोत्र असून दोन हजार तरी ब्राह्मण संपूर्ण वेदाचें पठण करणारे असे होते. व त्या गांवाच्या मध्य भागीं श्रीशंकराचें देवालय असल्या-मुळें तेथें फारच शोभा आली होती. जसा हारामध्यें तो मध्यमणि शोभतो त्याप्रमाणें तो शंकरप्रासाद शोभत असे. अशा त्या गांवांत प्रभाकर ह्मणून एक विद्वान् ब्राह्मण स्नान-संध्याशील असून आपल्या कर्मामध्यें मोठा दक्ष असे. त्यानें अनेक यज्ञ केल्यामुळें त्याची सर्वत्र कीर्ति असून धनधान्या-

दिक सर्व संपत्तीनें युक्त होता. तसेच बांधवजन व आप्तजनहि होते परंतु त्याचा पुत्र मूढ असल्यामुळें तीं सर्व असूनही तो निरंतर चिंताक्रांत असे, ह्मणून त्याला सुखाचा लेशही नव्हता. बरें, पुत्राचें रूप तर केवळ मदनासारखें व तेज सूर्याप्रमाणें, असें असतांहि कोणापाशीं बोलूं नये, व कोणी कांहीं विचारिलें असतां सांगूं नये व आपणच कांहीं तरी ध्यान करीत बसावें, अशी त्याची स्थिति होती. तेव्हां बापानें विचार केला कीं, ह्या पुत्राची जी ही भ्रमिष्टासारखी अवस्था दिसते, ती ग्रहपीडेपासून झाली आहे; किंवा पूर्वकर्मानें झाली हें कांहीं समजत नाहीं. तर आतां काय करावें, कोणाला विचारावें, अशा चिंतेनें तो व्यग्र असतां त्यास असें समजलें कीं, आपल्या गांवांत कोणी मोठे यति आले आहेत, त्यांजबरोबर अनेक शिष्य व पुस्तकांचे मोठे भाऱ्यांचे भारे आहेत, तेव्हां त्यानें विचार केला कीं, ज्या बरोबर अनेक शिष्य व ग्रंथ आहेत; तेव्हां तो कोणी तरी मोठा साधु असावा. असा विचार करून तो **प्रभाकर** ज्या ठिकाणीं **आचार्य** होते तेथें आला आणि साष्टांग नमस्कार करून, आपल्या पुत्रालाहि त्यांचे पायांवर घातलें तेव्हां तो **आचार्यांचे** पाय धरून जो राहिला तो कांहीं केलें तरी उठेना तेव्हां **आचार्यांनीं** त्याला आपल्या स्वहस्तानें उठविलें. नंतर तो **प्रभाकर आचार्यांना** बोलला कीं, महाराज, हा पुत्र असा मूढ कोणत्या कर्मानें झाला, तें मला कृपा करून सांगावें. ह्याला आज तेरा वर्षें झालीं परंतु अजून वेदांचा संस्कार नाहीं व कोणत्या प्रकारचेंही ज्ञान नाहीं. तथापि केलें पाहिजे ह्मणून कसें तरी करून आठव्या वर्षी उपनयन मात्र केलें. बरें अध्ययन न करो परंतु मुलांनीं खेळण्याकरितां बलाविलें असतांही जात नाहीं; तेव्हां हा मूर्ख आहे असें सम-

जून बाकीच्या मुलांनीं ह्याला ताडण केलें असतांहि हा कांहीं रागावत नाहीं. बरें मनाला वाटल्यास भोजन करितो, नाहीं तर कांहीं खात नाहीं. आह्मीं सांगितलें असतां ऐकत नाहीं. ह्मणून जरी ह्याला ताडण केलें तरी तो तें सर्व सहन करितो. कोणालाहि रागानें उलट मारीत नाहीं. याप्रमाणें प्रभाकराचें भाषण ऐकून घेऊन आचार्यांनीं त्या मुलाला विचारिलें; मुला, अशा जड वृत्तीनें राहणारा असा तूं कोण आहेस? तेव्हां त्या मुलानें आचार्यांस वंदन करून उत्तर दिलें, हे गुरो, मी जड नाहीं तर माझ्या सान्निध्यानें मात्र जड रहातें आतां मी कोण ह्मणाल तर, शोक, मोह, क्षुधा, पिपासा, जरा आणि मृत्यु, या सहांनीं रहित असून, उत्पन्न होतो, असतो, वाढतो विपरिणामाला पावतो, अपक्षयाला पावतो, नाशाला पावतो, असे जे सहा विकार त्यांनींही रहित असें अत्यंत सुखाचें स्थान जें परब्रह्म तो मी आहें. असें सांगून बारा श्लोकांनीं आत्मतत्व प्रतिपादन केलें. तेव्हां आचार्यांनीं सर्व श्रवण करून सांगितलें कीं, ह्या श्लोकांनीं हें आत्मतत्व हातांतील आमलकवत (आंवळ्याप्रमाणें) प्रकाशित होतें; करितां ह्या श्लोकांना व ते श्लोक करणारा जो तूं त्या तुला हस्तामलक ही संज्ञा प्रसिद्ध होईल. नंतर आचार्यांनीं विचार केला कीं गुरूच्या उपदेशावांचून ज्याला परमात्मतत्वाचा बोध झाला; तेव्हां हा कोणी तरी योगी आहे. मग त्यांनीं त्याला आपल्याजवळ घेऊन त्याचे मस्तकावर वरदहस्त ठेविला आणि आचार्य प्रभाकराला ह्मणाले कीं, ह्या पुत्रापासून तुला प्रपंचांत कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं; कारण ह्याची आपल्या स्वतःच्या देहावरही प्रीति नाहीं; मग गृहादिक जीं प्रपंचांतील साधनें यांचे ठिकाणीं कोठून असणार. असें त्या प्रभाकराला सांगून आचार्य त्या मु-

लाला घेऊन निघाले ते तुंगभद्रातीरीं **शृंगेरी**नामक पुरीला आले, आणि तेथें कांहीं दिवस वास करून अनेक शिष्यांस भाष्यादि ग्रंथ पढविले. तेव्हां जो मुलगा बरोबर आणिला होता, त्यालाही संपूर्ण ब्रह्मविद्या पढवून त्याचें नांव **हस्तामलक** असें पूर्वी ठेविल्याप्रमाणें सर्वत्र प्रसिद्ध केलें.

पुढें **शृंगेरी** येथें एक मठ स्थापन करून त्या ठिकाणीं आपल्या शिष्यांपैकीं **सुरेश्वराचार्य**नामक शिष्याची स्थापना करून त्याकडे सर्व धर्मसंस्थापनेचें काम सोंपविलें. आणि तेथें शारदेची स्थापना पूर्वींच केली होती; तिचीही व्यवस्था त्याजकडेसच सांगितली. त्याप्रमाणें अद्यापि शृंगेरीमठाकडे ती व्यवस्था चालू आहे व सर्वांला ती देवी अभीष्ट फल देते असा सर्वांना अनुभवही आहे.

**आचार्यांचे** बहुत शिष्य होते, त्यांत एक गिरी ह्मणून शिष्य होता त्यानें नेहमीं **आचार्यां**जवळ असावें आणि त्यांची सेवा करावी. त्यांना स्नानाला उदक देणें, त्यांच्या छाट्या धुणें, त्यांची पूजेची तयारी करणें, वगैरे त्यांचीं स्वतांचीं कामें तो करीत असे. त्यामुळें त्याची भक्ति पाहून **आचार्यां**ची त्याजवर कृपा असे. एकदां **पद्मपाद** आदिकरून सर्व शिष्य पाठ घेण्याकरितां बसले असतां तो **गिरी**नामक शिष्य **आचार्यां**ची छाटी धुण्याकरितां नदीवर गेला होता; त्याला थोडा विलंब लागला, तेव्हां **आचार्य** बोलले कीं, जरा थांबा इतक्यांत तो **गिरी** येईल. तेव्हां **पद्मपाद** बोलले कीं, तो कशाला पाहिजे त्याला काय समजतें आहे; तो असला आणि नसला सारखाच आहे. तेव्हां **आचार्यांनीं** विचार केला कीं, ह्याला आपल्या ज्ञानाचा गर्व झाला आहे, तर तो दूर केला पाहिजे असें मनांत आणून तो नदीवरून परत आल्यानंतर मनानेंच

त्या गिरीला उपदेश केला आणि कृपा करितांच त्याला सर्व विद्या तात्काल प्राप्त झाल्या. नंतर तो छाटी वाळत घालण्याचें काम करून येऊन, त्यानें आचार्यांना वंदन केलें. आणि तोटकवृत्तानें आचार्यांचा स्तव करून सर्व उपनिषद्भागाचें प्रतिपादन केलें. तेव्हां त्याचें तें भाषण ऐकून संपूर्ण शिष्यांना मोठा विस्मय वाटला. कारण, ज्याला कांहीं एक समजत नव्हतें, त्यानें उपनिषद्भागांचे अर्थाचें प्रतिपादन करणें ह्मणजे केवल गुरुकृपाच समजली पाहिजे. त्याची ती वाणी ऐकून पद्मपाद आदिकरून शिष्यांला जे गर्व झाला होता तो आपोआप नष्ट झाला. नंतर तोटकवृत्तानें आत्मतत्व प्रतिपादन केल्यामुळें, त्याचें नांव तोटकाचार्य असें प्रसिद्ध होऊन आचार्यांच्या मुख्य शिष्यांत त्याची गणना झाली. त्या वेळीं आचार्यांचे जे चार शिष्य पद्मपाद, सुरेश्वराचार्य, हस्तामलक आणि तोटकाचार्य, त्यांना संपूर्ण लोक ह्मणूं लागले कीं, हे चार शिष्य धर्म, अर्थ, काम व मोक्षच आहेत. किंवा ऋक्, यजुः, साम, अथर्व, असे चार वेद आहेत; किंवा, सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता ह्या चार मुक्तिच आहेत कीं काय? अथवा हीं चार ब्रह्मदेवाचीं मुखेंच कीं काय?

---

भगवन्नुदधौ मृतिजन्मजले सुखदुःखझषे पतितं व्यथितं ॥ कृपया शरणागतमुद्धरमामनुशाध्युपसन्नमनन्यगतिम् ॥ १ ॥ विनिवर्त्य रतिं विषये विषमां परिमुच्य शरीरनिबद्धमतिम् ॥ परमात्मपदे भव नित्यरतो जहि मोहमयं भ्रममात्ममते ॥ २ ॥ विसृजान्नमयादिषु पञ्चसु तामयमस्मि ममेति मतिं सततम् ॥ दृशि रूपमनन्तमजं विगुणं हृदयस्थमवेहि सदाहमिति ॥ ३ ॥ जलभेदकृता बहुतेव रवेर्घटिकादिकृता नभसोऽपि यथा ॥ मतिभेदकृतानुतथा बहुता तव बुद्धिदृशो विकृतस्य सदा ॥ ४ ॥ दिनकृत्प्रभया सदृशेन मदा जनवित्तगतं सकलं स्वचिता ॥ विदितं भवता विकृतेन सदा यत एव मतोसि सदेव सदा ॥ ५ ॥

याप्रमाणें सर्व शिष्यांनीं युक्त असे आचार्य तेथें ब्रह्मविद्येचा उपदेश करीत आनंदानें राहिले.

एकदां आचार्य एकांतस्थलीं बसले असतां सुरेश्वराचार्य बोलले कीं, महाराज, अधिकारानुरूप ह्या शिष्याला कांहीं आज्ञा व्हावी. कारण शिष्यानें गुरुभक्ति केली तरच त्याचें जीवित सफल आहे; नाहीं तर तें व्यर्थ आहे असें समजावें. याप्रमाणें शिष्याचें भाषण श्रवण करून आचार्य बोलले कीं, माझ्या भाष्यावर वार्तिक[1] करावें. तेव्हां सुरेश्वराचार्य बोलले कीं, महाराज, अनेक तर्कांनीं युक्त असें जें आपलें भाष्य तें केवळ अवलोकन करण्याविषयींही मी समर्थ नाहीं. मग त्यावर वार्तिक करणें तर दूरच आहे. तथापि आपल्या कृपाकटाक्षानें यथामति निबंधन करितों. याप्रमाणें गुरूची आज्ञा शिरसामान्य करून तेथून ते आपल्या स्थानीं गेले.

नंतर भाष्यावर सुरेश्वराचार्य शिष्याला वार्तिक करण्याविषयीं आचार्यांची आज्ञा झाली असें ऐकून इतर पद्मपाद आदिकरून शिष्य आचार्यांकडे येऊन प्रार्थना करून बोलले कीं, महाराज, आपण जी सुरेश्वराला आपल्या भाष्यावर वार्तिक करण्याविषयीं आज्ञा केली, हा उद्योग सफल न होतां उलट बाधक होईल; कारण हा पूर्वींचा कर्ममार्गी मंडण या नामानें प्रसिद्ध होता, परंतु आपण त्याला वादामध्यें जिंकल्यामुळें तो सांप्रत आपला शिष्य होऊन अद्वैतमार्गी झाला आहे. करितां जर यानें वार्तिक केलें तर तो त्यांत कर्ममार्गाकडे वळेल. कारण आजन्म त्यानें कर्मच केलेलें आहे; ह्मणून आपला सिद्धांत एका बाजूला राहील. करितां त्याजकडून आपण वार्तिक करण्याचें करवूं नये. तर या पद्मपादाकडून तें

---

१, टीकारूपव्याख्यान.

काम करवावें, तो त्याविषयीं योग्य आहे. कारण ज्यानें ब्रह्मचर्य धारण करून बाल्यावस्थेंत अद्वैत सिद्धांताचें ज्ञान करून घेतलें आणि तेव्हांपासून आपलें शिष्यत्व केलें, व ज्याची आपले ठिकाणीं पूर्ण भक्ति आहे. शिवाय एकदां आपण गंगेच्या पलीकडे जाऊन सर्व शिष्यांस बोलाविलें; तेव्हां आह्मी इतर शिष्य पलीकडे जाण्याकरितां नौकादिक साधनें शोधूं लागलों परंतु **पद्मपादानें** तसें न करितां तो गुरूचे ठिकाणीं एकनिष्ठ असा तसाच समोर गंगेंतून निघाला. तेव्हां तो जेथें पाय ठेवी, त्या ठिकाणीं सुवर्णाचें कमल उत्पन्न होऊन तो गंगा तरून आपल्याकडे गेला. तेव्हां आपण कृपाळू होऊन त्याचें नांव **सनंदन** असतां **पद्मपाद** असें ठेविलें. तेव्हां आपल्या कृपेनें वार्तिक करण्याविषयीं हाच समर्थ आहे. किंवा आनंदगिरिही तें निबंधन करूं शकतील. कारण त्यांच्या तपोबलानें त्यांना श्रीसरस्वती साक्षात् प्रसन्न आहे, व तिनें आपल्या अभिप्रायाप्रमाणें व्याख्यान करण्याविषयीं त्यांना वरही दिला आहे. तेव्हां कर्मच करणारा जो **विश्वरूप** ह्मणजे **सुरेश्वराचार्य** त्याकडून वार्तिक न करवितां तें **पद्मपादा**कडून अगर **आनंदगिरी**कडूनच करवावें. असें सर्व बोलताहेत इतक्यांत **पद्मपाद** बोलले कीं, महाराज, हा **हस्तामलक**हि आपल्या भाष्यावर निबंधन करील, कारण ज्याच्या हस्तामध्यें आमलीफलाप्रमाणें अशेष सिद्धांताचें तत्व आहे, व ह्मणून आपणही त्याचें नांव **हस्तामलक** असें ठेविलें. याप्रकारें शिष्यांचीं भाषणें ऐकून **आचार्य** बोलले कीं, या **हस्तामलका**प्रमाणें निपुण कोणी नाहीं, तथापि ह्याला बाह्यप्रवृत्ति माहित नाहींत; व ह्यानें वेदाचें पठण केलेलें नाहीं गुरूनें उपनयन केलें आहे, तथापि त्यापासून वेदाचें अध्ययन झालेलें नाहीं.

हा कोणाबरोबर क्रिडा वगैरे करीना, कोणाशीं बोलेना, ह्मणून याला ह्याच्या बापानें मजकडे आणिलें. आह्मांला पाहतांच हा नमस्कार करून पुढें उभा राहिला. तेव्हां असा अद्भुत बालक पाहून सर्व लोकांस विस्मय झाला. नंतर मी त्याला तूं कोण आहेस असा प्रश्न करण्याबरोबर सच्चिदानंदघनस्वरूपी मी आहें, असें त्यानें उत्तर दिलें. तेव्हां ती पुत्राची अपूर्व वाणी श्रवण करून बापाला फार आनंद झाला. आणि तो मला ह्मणाला महाराज, हा कोणी तरी ज्ञानी आहे, व आपला शिष्य आहे असें वाटतें; करितां ह्याला आपण बरोबर न्यावा. नंतर मजबरोबर आला, तेव्हांपासून तो मजबरोबर आहे. आतां तो सर्व शास्त्रांत जरी निष्णात आहे, तथापि ह्याला बाह्यवृत्तीचें ज्ञान नाहीं. कारण, लहानपणापासून जो आत्मतत्वामध्यें निमग्न त्याला बाह्यवृत्तीचें ज्ञान कसें होईल ? तेव्हां शिष्यांनीं विचारिलें, महाराज, ह्याला असें ज्ञान कसें प्राप्त झालें, तें कृपा करून सांगून आमचा संशयवृक्ष छेदन करावा.

तेव्हां **आचार्य** बोलले कीं, पूर्वीं यमुनेच्या कांठीं संसारापासून निवृत्त झालेला व योगाभ्यासानें युक्त असा एक सिद्ध रहात होता. तेव्हां तेथेंच रहाणारी कोणी एक ब्राह्मणाची कन्या यमुनास्नानाकरितां तेथें आली. आणि त्या सिद्धापुढें आपलें मूल ठेवून आपण स्नान करण्याकरितां गेली. तों इकडे तें मूल लोळत लोळत जाऊन उदकामध्यें पडून गतप्राण झालें. तें त्या सिद्धाला ध्यानस्थ असल्यामुळें समजलें नाहीं. तें मूल ज्या ठिकाणीं बाई स्नान करीत होती त्या ठिकाणीं प्रवाहानें वहात आलें तेव्हां तिला मोठें दुःख झालें. नंतर त्या बाईनें तें मूल त्या सिद्धाच्या पुढें ठेवून मोठा आक्रोश केला; तेव्हां तो सिद्ध अत्यंत खिन्न होऊन योगबलानें त्या मुलाच्या

देहांत शिरला. तोच हा हस्तामलक आहे, ह्मणून याला उपदेशावांचून सर्व ज्ञान झालें आहे. परंतु बाह्य प्रवृत्तीचें ज्ञान झाला अगदीं नाहीं ह्मणून वार्तिक करण्याविषयीं हा उपयोगी नाहीं. तर तो **मंडण (सुरेश्वराचार्य)** हें कृत्य करण्याविषयीं योग्य आहे, कारण सरस्वतीच्या संगतीनें त्याला सर्व ज्ञान आहे, व विचार केला तर त्याचे सारखा अनुभवी दुसरा कोणीही दिसत नाहीं; परंतु जर तुह्मां सर्वांला तें इष्ट नसेल तर मी तसें करण्याचा आग्रह करीत नाहीं. कारण **एका कार्यांत जर पुष्कळांची प्रतिकूळता दिसली तर तें कार्य करूं नये.** असा लौकिक न्याय आहे, ह्मणून मलाही आतां याविषयीं संशय उत्पन्न झाला आहे. असें **आचार्यांचें** भाषण ऐकून शिष्य बोलले, महाराज, आपली इच्छा हे **पद्मपाद** पूर्ण करितील, करितां त्यांना वार्तिक करण्याविषयीं आज्ञा असावी. तेव्हां आचार्य बोलले, हा **पद्मपाद** भाष्यावर एकादा निबंध करील; परंतु वार्तिक करणें हें त्याचे हातून होणार नाहीं. कारण तें भाष्य परप्रतिज्ञ आहे; व ती प्रतिज्ञा **सुरेश्वराचार्य** दीक्षित असल्यामुळें त्यांना ज्ञात आहे. असें शिष्यांस सांगून एकांतीं **सुरेश्वराचार्यां**ला बोलले कीं, तूं वार्तिक करूं नको, कारण हे सर्व शिष्य मूर्ख आहेत. त्यांना तें सहन होत नाहीं. ते ह्मणतात कीं, तूं गृहस्थाश्रम केला होता, तेव्हां त्यांतील धर्माचा अभिनिवेश त्यांत होईल. आतां हें जरी मला वाटत नाहीं तरी सर्वांची जर समजूत होत नाहीं तर मी तरी काय करूं. तर आतां तूं एकादा निबंध करून मला दाखीव, ह्मणजे या सर्व शिष्यांची खात्री होईल. असें बोलून आतां आपल्या भाष्यावर वार्तिक होत नाहीं असें जाणून **आचार्यांला** किंचित् खेद झाला. नंतर गुर्वाज्ञेनें **सुरेश्वराचार्यांनीं** थो-

इच्या कालांत नैष्कर्म्यसिद्धि ह्मणून एक ग्रंथ करून आचार्यांला दाखविला. तेव्हां तो ग्रंथ पाहून आचार्यांना फार संतोष झाला. मग आचार्यांनीं सर्व शिष्यांला बोलावून तो ग्रंथ त्यांनाही दाखविला. तेव्हां त्याच्या ज्ञानाबद्दल सर्वांची खात्री होऊन; जे कांहीं सुरेश्वराचार्यांबद्दलचे कुतर्क होते ते आपोआप नष्ट झाले. व तो ग्रंथ अद्यापि लोकमान्य आहे; त्या ग्रंथांत नैष्कर्म्य ह्मणजे मोक्ष त्याची सिद्धि केली आहे. नंतर सुरेश्वराचार्यांनीं सांगितलें कीं, मी वार्तिक करण्याविषयीं गुरूंच्या आज्ञेनें प्रवृत्त झालों असतां जेव्हां इतर शिष्य त्या कृत्याला विघ्न करितात तेव्हां या भाष्यावर जरी कोणी वार्तिक केलें तरी तें लोकांमध्यें चालणार नाहीं. असा शाप देऊन आचार्यांला बोलले महाराज, हा निबंध मी आपल्याला अर्पण केला आहे. ह्यापासून माझी कीर्ति व्हावी, किंवा लाभ व्हावा, असा माझा उद्देश नाहीं. तर आपल्या आज्ञेचा भंग होऊं नये व तो झाला असतां गुरुशिष्यभाव रहाणार नाहीं, करितां अल्पमतीनें हा निबंध केला आहे. आतां गृहस्थाश्रम केला ह्मणून त्याचा अभिनिवेश वार्तिकांत होईल, असें जें ह्मणणें तें बरोबर नाहीं. कारण आश्रमांतर झालें आहे. जशी बालपणांतील बुद्धि तारुण्यावस्थेंत असत नाहीं; व तारुण्यांतील बुद्धि वृद्धावस्थेंत रहात नाहीं. त्याप्रमाणें त्या कालच्या बुद्धींत व आतांच्या बुद्धींत अंतर आहेच. आतां पूर्वाश्रमीं आपण मजकडे आलां तेव्हां माझे घरांत प्रवेश झाला नाहीं. असें जें ह्मणणें त्यास आपण येऊन भिक्षाही घेतली हें

---

१ नैष्कर्म्य म्ह० कर्म नसणें त्याची आहे सिद्धि ज्यामध्यें म्ह० कर्मकरून मानससिद्धि झाल्यानंतर त्याचा त्याग करणें अशा विषयाचें ज्यामध्यें प्रतिपादन आहे तो ग्रंथ.

सर्व आपल्यास विदितच्च आहे. मी पूर्वाश्रमीं न्यायावर अनेक ग्रंथ केले आहेत. परंतु आतां आपल्या चरणसेवेवांचून कांहीं इच्छा राहिली नाहीं. यद्यपि आपली सेवा करण्याचें सामर्थ्य असणें हें एक मोठें दुर्घट आहे तथापि आपल्या कृपेंकरून ती मी करण्याविषयीं इच्छा करितों. नंतर **आचार्य** बोलले कीं, माझी जी **तैत्तिरीयशाखा** तिजवर मीं भाष्य केलें आहे; व तुझी जी **काण्वशाखा** तिजवरहि माझें भाष्य आहे. करितां या दोन भाष्यांवर वार्तिकें करावीत, ह्मणजे तेणेंकरून लोकांना फार उपयोग होईल. कारण "**परोपकाराय सतां विभूतयः**" परोपकाराकरितांच साधूंची प्रवृत्ति आहे. याप्रमाणें **आचार्यांची** आज्ञा प्रमाण मानून दोनहि भाष्यांवर वार्तिकें केलीं. कारण गुरूंची आज्ञा झाल्यानंतर त्याप्रमाणें करणें हेंच शिष्याचें कर्तव्य आहे, त्याजबद्दल विचार उपयोग नाहीं. असें जो करितो तो शिष्य ह्मणावा. नाहीं तर शेंकडों शिष्य असतात ते केवल उदर भरण्याकरितांच गुरूचा आश्रय करितात असें समजावें. नंतर तीं दोनहि वार्तिकें **आचार्यांना** अर्पण केलीं.

**पद्मपादां**नींही **आचार्यांच्या** आज्ञेनें सूत्रभाष्यावर टीका केली. आणि ती गुरुदक्षिणा ह्मणून **आचार्यांना** अर्पण केली व ती **आचार्यांना** मान्य झाली. परंतु भाष्यावरील टीका प्रसिद्ध होणार नाहीं. असा **सुरेश्वरांनीं** शाप दिला होता; ह्मणून **आचार्यांनीं** त्या शापाचें महत्त्व रहाण्याकरितां **सुरेश्वराचार्यांना** सांगितलें कीं, ह्या टीकेंत पांच भाग आहेत, परंतु तूं शाप दिल्यामुळें चारच्च भाग प्रसिद्ध होतील, असें सांगून त्याचें समाधान केलें. आणि **सुरेश्वराचार्याला आचार्यांनीं** सांगितलें कीं, तूं ह्या जन्मसमाप्ती नंतर प्रारब्धवशेंकरून पुढील जन्मीं **वाचस्पती** या नामें करुन उत्पन्न होऊन, माझ्या भा-

त्यावर उत्तम टीका करशील, आणि ती आप्रलयापर्यंत राहील. असें सांगून **आनंदगिरी** आदिकरून जे मोठे शिष्य होते त्यांस बोलाऊन सांगितलें कीं, तुह्मींही अद्वैत सिद्धांतावर निबंध करावे. तेव्हां त्या गुर्वाज्ञेप्रमाणें सर्वांनीं यथामति निबंध करून आत्मतत्वरूपी कमलाला सूर्याप्रमाणें ह्मणजे आत्मतत्वप्रकाशक असे बहुत निबंध केले; ते अद्याप प्रसिद्ध आहेत. व त्यावरूनच आजपर्यंत ब्रह्मविद्या सांकुर आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

एकदां **पद्मपादांचे** मनांत तीर्थयात्रा करावी असें आल्यावरून त्यांनीं **आचार्यांस** विज्ञापना केली कीं, माझे मनांत तीर्थाटन करावें असें आलें आहे; करितां आज्ञा असावी. तेव्हां **आचार्य** ह्मणाले कीं, गुरुजवळ रहाणें हाच क्षेत्रवास आहे. शिष्यानें निरंतर गुरुसेवा करूनच रहावें ह्मणजे त्याला क्षेत्रवासाचें फल प्राप्त होतें. शिवाय तीर्थाटन केल्यानें वाटेंत संन्यासधर्म योग्य रीतीनें चालत नाहीं. कारण मार्ग चालून श्रमानें निद्रा येते व त्यामुळें ब्राह्म चिंतनांत विघ्नें येऊन तें यथास्थित घडत नाहीं.

संन्यास दोन प्रकारचा आहे, एक **विद्वत्संन्यास** ह्मणजे तत्वज्ञान समजलें असून त्याचा नाश न होऊं देतां जीवन्मुक्तिसुखाकरितां यत्न करणें, व दुसरा **विविदिषासंन्यास** ह्मणजे तत्व जाणण्याकरितां **तत्** आणि **त्वं**, या दोन पदांचे अर्थाचा विचार करणें. त्यांत तूं दुसरा संन्यास घेतला आहेस; करितां **तत्वं** पदार्थ अवश्य जाणला पाहिजे, तो तीर्थयात्रा केल्यानें घडणार नाहीं, याचें कारण पूर्वींच सांगितलें आहे. आतां यात्रा करणाराला कशीं दुःखें भोगावीं लागतात तें सांगतों ऐक. कोठें पाणी असतें कोठें नाहीं, तशीच कोठें निद्रा करण्यास जागा मिळते कोठें मिळत नाहीं, ह्यामुळें कोठेंच सुखप्राप्ति

होत नाहीं. बरें एकादा ज्वर किंवा दुसरा रोग झाला असतां उपाय करण्यास साधन नाहीं त्यामुळें पुढें जातां येत नाहीं, व मागेंही येतां येत नाहीं. अशीं अनेक दुःखें आहेत. तेव्हां **पद्मपाद** बोलले महाराज, जरी आपल्या आज्ञेविरुद्ध, माझ्या-सारख्या शिष्यानें बोलूं नये तथापि आपण क्षमा करण्याविषयीं समर्थ आहां; करितां यथामति बोलतों—आपण शिष्यानें गुरु-समीप वास करावा असें सांगितलें तें योग्य आहे. परंतु जे पुरातन साधु आहेत त्यांचीं दर्शनें घेतल्याशिवाय माझें मन स्वस्थ होणार नाहीं. शिवाय जरी तीर्थाटन केलें तरी मन गुरुचरणीं असलें ह्मणजे झालें. गुरुसमीप राहून जर मन स्थिर नाहीं; तर मग समीप रहाण्याचा तरी उपयोग काय ? आतां कोठें जल मिळणार नाहीं; कोठें मार्ग मिळणार नाहीं, तेव्हां अतिशय दुःख होईल अशी आज्ञा झाली. त्यास दुःखावांचून कोठेंहि पुण्यप्राप्ति होत नाहीं. आतां रोगादिक पीडा होईल असें जें ह्मणणें त्यास रोग होणें हें प्रारब्धाधीन आहे, त्याजबद्दल मुळींच वाद नाहीं. परंतु होणारा जो रोग आहे तो येथें अ-सलों, अगर परदेशांत असलों, तरी होणारच कारण **"प्रारब्ध-कर्मणां भोगादेव क्षयः"** ह्मणजे प्रारब्धकर्माचा भोग झा-ल्यावांचून क्षयच नाहीं. आतां मृत्यु तर आयुर्मर्यादा झाल्या नंतर कोठें असलों तरी प्राप्तच आहे; याविषयीं काळजी करणें योग्य नाहीं. बरें **मनु** आदिकरून जे धर्मशास्त्रवेत्ते झाले त्यांनीं देशकालवर्तमान पाहून आचार करावा असें सांगितलें आहे, तेव्हां जरी प्रवासांत आपत्कालीं कदाचित् यथास्थित आचार घडला नाहीं तरी अशुचित्व येऊं शकत नाहीं. आतां दैवानु-कूल्य असल्यावर कोठेंहि अन्नप्राप्ति होईलच. मार्गश्रम झा-ल्यावर निद्रादिक दोषांनीं युक्त होतो करितां ब्रह्मचिंतन घडावें

तसें घडत नाहीं असें जें आपण ह्मटलें त्यास चित्ताची एकाग्रता झाल्यानंतर कोठेंही ब्रह्मध्यान करण्यास हरकत येईल असें वाटत नाहीं. याप्रमाणें **पद्मपादांचें** भाषण ऐकून व त्यांचा यात्रेबद्दल निश्चय पाहून **आचार्यांनीं** जाण्याविषयीं आज्ञा दिली. आणि प्रवासांत कसें वागलें पाहिजे तेंही सर्व सांगितलें.

ते ह्मणाले प्रवासांत साधूंची संगति करावी ह्मणजे त्यापासून सुख प्राप्त होतें. खलांची संगति दुःखप्रद आहे; करितां ती करूं नये. मार्ग चालत असतां एके ठिकाणीं बहुत दिवस वास करूं नये व कोणताही संग्रह करूं नये. कारण त्या संग्रहापासून सर्वस्वहरणाचा प्रसंग घडतो. व त्यापासून गमन करणाराला अनेक विघ्नें येतात. इष्टदेश असेल तेथेंच वास करावा. मध्यंतरीं वास केल्यानें कार्यसिद्धि होत नाहीं. मार्गामध्यें गुप्त चोर असतात, ते बाह्यदृष्टीनें मोठे सभ्य असे दिसतात परंतु त्यांची कृति फार वाईट असते. करितां मोठ्या सावधगिरीनें वागलें पाहिजे. कारण ते दुष्ट चोर, वस्त्र, पुस्तकें इत्यादिक वस्तु नेण्याचे इच्छेनें प्रथम विश्वास दाखवून अखेरीस सर्व हरण करितात. मार्ग चालत असतां आसपास असणारे जे कोणी साधु असतील त्यांचें दर्शन घेऊन, त्यांची पूजा करावी नंतर पुढें जावें. कारण ते इच्छितकार्यसिद्धि करून देण्याविषयीं समर्थ असतात. याप्रमाणें गुरुवाक्य श्रवण करून **पद्मपादांना** मोठा आनंद झाला. नंतर **आचार्यांनीं पद्मपादांची**, तीर्थयात्रेकरितां रवानगी करून, आपण **सुरेश्वर** आदिकरून शिष्यांसह त्या ऋष्यशृंग पर्वतावर कांहीं कालपर्यंत वास केला.

एकदां **ऋष्यशृंग** पर्वतावर **आचार्य** ध्यान करीत असतां

१ हा उपदेश यतिधर्माला अनुसरून आहे, कारण त्या धर्मात देहाविषयीं औदासीन्य असतें.

त्यांनीं जाणलें कीं, आपली माता अगदीं आसन्नमृत्यु झाली असून आपलें निरंतर स्मरण करीत आहे. तेव्हां ध्यान विसर्जन करून सर्व शिष्यांसह आकाशमार्गानें आपल्या मातेजवळ येऊन **आचार्यांनीं** वंदन केलें. आणि प्रार्थना केली कीं, आपण स्मरण केल्याप्रमाणें मी आलों आहें; जी आज्ञा असेल ती करावी. तेव्हां ती बोलली कीं, मला आतां हें जरायुक्त शरीर नको असें वाटूं लागलें आहे; करितां माझा संस्कार करून उत्तम अशा पुण्य लोकाला पाठीव. तेव्हां **आचार्यांनीं** आपल्या मातेला ब्रह्मानंदाची प्राप्ति व्हावी ह्मणून ब्रह्मोपदेश केला. तेव्हां ती ह्मणाली, कीं हें जें तुझें ब्रह्म आहे तें निराकार असल्यामुळें मला समजत नाहीं. करितां सगुण ब्रह्माचा उपदेश सांगून तें माझ्या हृदयांत ठसे असें कर. तेव्हां **आचार्यांनीं** **श्रीशंकरां**चा स्तव केला. तेव्हां **शंकरांनीं** तिला नेण्याकरितां आपले दूत पाठविले. ते आल्यानंतर **आचार्यांनीं** आईला सांगितलें कीं, हे शंकरांनीं दूत पाठविले आहेत, तरी या विमानांत बसून आपण शंकरापाशीं जावें. ह्मणजे त्यांचें दर्शन होऊन ती मूर्ति तुमच्या ध्यानांत ठसेल. तेव्हां तिनें सांगितलें कीं, मी या दूताबरोबर जात नाहीं. नंतर **आचार्यांनीं** त्या दूतांना परत जाण्याविषयीं सांगून सत्वगुणसंपन्न जो **विष्णु** त्याचा स्तव केला. तेव्हां **विष्णु** प्रसन्न होऊन त्यांनीं आपले दूत पाठविले, व स्वतः आपणही आले. तेव्हां तें विमानपाहून तिला आनंद होऊन त्या विमानांत बसून **श्रीविष्णूचें** ध्यान करीत अनेक लोक अवलोकन करीत करीत ती वैकुंठीं गेली. नंतर आईचें और्ध्वदैहिक कर्म करण्याकरितां सर्व बांधवांना बलावून सांगितलें कीं, जरी मीं संन्यासधर्म स्वीकारला आहे, तथापि मातेपाशीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें मी स्वतः संस्कार करणार. तेव्हां कोणी ह्मणाले

कीं, संन्यास घेतल्यानंतर हा अधिकार रहात नाहीं. हा धर्म पूर्वाश्रमांतील आहे. तेव्हां या आश्रमांत तो करणें ह्मणजे शास्त्रविरुद्ध होईल. परंतु तें मनांत न आणितां पूर्वी मातेला सांगितल्याप्रमाणें स्वतः संस्कार करण्याविषयीं आचार्य प्रवृत्त झाले- तेव्हां त्यांना ते बांधवजन विरुद्ध झाले व त्यामुळें अग्निही देईनात. तेव्हां त्यांना क्रोध येऊन त्या बांधवांना शाप दिला कीं, आजपासून तुह्मीं वेदभ्रष्ट व्हाल, आणि तुमचे घरीं यतींची भिक्षा होणार नाहीं. असें सांगून काष्ठें मिळवून मातेच्या दक्षिण बाहूचें मंथन करून त्यापासून अग्नि उत्पन्न केला आणि त्या अग्नीनें आपल्या गृहाजवळच मातेच्या देहाचें दहन केलें.

त्याप्रमाणें हल्लीं त्या देशांत ही चाल चालू आहे ते ब्राह्मण वेदभ्रष्ट असून त्यांकडे कोणीही संन्याशी भिक्षा ग्रहण करीत नाहीं. व अद्याप घरानजीक ( परड्यांत ) प्रेतांचें दहन करितात. तात्पर्य असें कीं, कोणांही महात्म्याचा अपराध करूं नये. कारण जर कदाचित् तो संतप्त झाला तर शासन करण्यास त्याला उशीर लागत नाहीं. जसा चंदनवृक्ष स्वभावानें शांत आहे, तथापि त्यापासून जो अग्नि होतो तो फार तीव्र असतो. करितां महात्म्याचा अपराध न करण्याविषयीं सर्वांनीं दक्ष असावें— इकडे आचार्यांनीं मातेचा संस्कार करून तिला उत्तम गति देऊन आपण अन्य मतें जिंकण्याकरितां सर्व शिष्यांसह देशोदेशीं संचारार्थ निघाले.

इकडे पद्मपाद तिर्थयात्रेला निघाले ते दक्षिण दिशेला जाऊन अनेक तीर्थें करीत करीत श्रीकालहस्तीश्वराचें दर्शन घेऊन पुढें पुंडरीक ह्मणून एक पुरी आहे, तेथें गेले. ज्या पुरींत निरंतर शंकर नृत्य करितात; तेथील भिक्षुकांला पद्मपादांनीं विचारिलें, हें तीर्थ कोण आहे? तेव्हां त्यांनीं सांगि-

तलें कीं, या तीर्थाला **शिवगंगा** असें ह्मणतात. एकदां महादेवांनीं येथें गंगेचें स्मरण केलें, तेव्हां गंगा प्राप्त होऊन ती शिवाज्ञेनें येथें वहाते. कोणी ही गंगा, नृत्यकालीं शंकरजटेंतून उत्पन्न झाली असेंही ह्मणतात. येथें स्नान केलें असतां प्राणी सर्व पातकापासून मुक्त होतो. शिवाय या तीर्थाचा महिमा शंकरावांचून कोणीही सांगण्याविषयीं समर्थ नाहीं. याप्रमाणें तीर्थमहिमा श्रवण करून **पद्मपादांनीं** त्या तीर्थांत यथाविधि स्नान केलें. आणि पुढें **रामेश्वरीं** जाण्याकरितां ते निघाले. जातां जातां मार्गांत कावेरी नदी लागते तेथें आले, आणि तिचें स्नान करून भगवत्पदांबुजाचें ध्यान करून पुढें **अभिरुचित**स्थलीं जाण्याकरितां निघाले ते मार्गांत पूर्वाश्रमांतील मातुलगृहीं गेले. तेव्हां त्यांनीं यांला पाहून मोठा सत्कार केला, आणि बहुत दिवसांनीं गांठ पडल्यामुळें उभयतांसही आनंद झाला. नंतर **पद्मपादांनीं** आपली सर्व हकीगत सांगितली. नंतर त्यांनीं **पद्मपादांना** कांहीं दिवस रहाण्याविषयीं आग्रह केल्यावरून सर्व शिष्यांसह थोडे दिवस राहून सर्वांस गृहस्थाश्रमाचा महिमा सांगून पुढें रामेश्वराला जाण्याकरितां निघाले. तेव्हां **पद्मपादांनीं** आपल्या मातुलाला सांगितलें कीं, मजबरोबर पुस्तकें आहेत, हीं मी परत येईं तों पर्यंत आपल्यापाशीं ठेवावीं. व मी **श्रीगुरुआचार्य** यांच्या भाष्यावर टीका केलेली आहे तीहि आपल्यापाशीं ठेवावी. असें सांगून ती टीका त्यांना दाखविली. तेव्हां ती टीका पाहून तो मातुल स्वतः द्वैतवादी असल्यामुळें व त्या टीकेंत **प्रभाकर** आदिकरून पूर्व मीमांसकांचें खंडन असल्यामुळें त्याला ती टीका सहन झाली नाहीं. **पद्मपादांनीं** पुस्तकें मातुलगृहीं ठेवून निघाले, तेव्हां त्यांना भावी नाशसूचक असे कांहीं अपशकून झाले. परंतु त्यांची

त्यांनीं विशेष गणना न करितां तसेच तीर्थयात्रा करीत रामेश्वरीं गेले. इकडे **पद्मपाद** गेल्यानंतर त्या मातुलानें विचार केला कीं, ही टीका प्रसिद्ध झाली असतां आपल्या मताचे सिद्धांताला बाध येईल, करितां हिचा नाश केला पाहिजे. जरकरितां नुसता पुस्तकाचा नाश केला तर आपण मुद्दाम केला असा आरोप येईल; करितां घरालाच अग्नि लावून दिला असतां घराबरोबर पुस्तक दग्ध झालें असें सांगण्यास ठीक पडेल. व आपल्यावर ब्राह्मदोष येणार नाहीं; आणि गृह पुनः बांधतां येईल. असा बेत करून त्यानें त्या पुस्तकाचें घराबरोबर दहन केलें.

इकडे **पद्मपाद** रामेश्वरादिक यात्रा करून, परत मातुलगृहीं येतात तों ही दुःखकारक वार्ता ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. नंतर मातुलगृहींच काहीं दिवस वास करून पुनः टीका करावी असें मनांत आणून; ती करण्यास आरंभ केला. तेव्हां त्यांची ती बुद्धि पाहून त्या मातुलानें विचार केला कीं, जर ह्यानें ही टीका पुनः केली तर आपण केलेला प्रयत्न व्यर्थ आहे, करितां असें उपयोगी नाहीं तर याची बुद्धि जेणेंकरून मंद होईल, असा कांही तरी पदार्थ याला खाऊं घालून त्याचे बुद्धीची स्फूर्ति नाहींशी करावी. असा विचार करून त्याप्रमाणें भोजनांत बुद्धि नष्ट होणारा पदार्थ घातला. तेव्हां त्या योगानें बुद्धि मंद झाल्यामुळें टीका करण्याची स्फूर्ति नाहींशी झाली, तेव्हां तो उद्योग राहिला. नंतर तेथून पुढें यात्रेकरितां निघाले इतक्यांत बहुत दिवस गुरुदर्शन न झाल्यामुळें दर्शनलालसा उत्पन्न होऊन **पद्मपाद, आचार्य** केरल देशांत आहेत अशी वार्ता ऐकून तात्काल गुरुदर्शनाकरितां निघाले. ते जेथें **आचार्य** होते त्याठिकाणीं येऊन गरूंना वंदन केल्यानंतर **आ-**

चार्यांनीं कुशल प्रश्न केल्यावरून प्रवासांतील सर्व इतिहास सांगण्यास आरंभ केला. **पद्मपाद** ह्मणाले महाराज, मी तीर्थं करीत करीत पूर्वाश्रमींच्या मातुलगृहीं गेलों. तेथें भेदवाद्यांमध्यें चंद्राप्रमाणें जो माझा पूर्वाश्रमींचा मातुल त्याचेपुढें मी केलेली भाष्यटीका पठण केली, तेव्हां त्याचा व माझा त्या संबंधानें वाद होऊन अखेर मीं त्यास जिंकून अभेद सिद्ध केला. ह्याप्रमाणें आपला पराजय झाला. तरी तो न दाखवितां त्यानें माझा असा सत्कार केला कीं, त्यामुळें माझा त्यावर पूर्ण विश्वास बसून मी ती टीका परत येईपर्यंत त्याचेच स्वाधीन करून रामेश्वरीं गेलों. आणि तिकडून परत आल्यानंतर पाहातों तों मातुलगृह दग्ध झाल्यामुळें, तें पुस्तकही दग्ध झालें. बरें, मी पुन्हा टीका करावी तर पूर्ववत् माझी मति चालत नाहीं. तेव्हां आतां या दुःखातून मला आपल्यावांचून कोणीही तारण्याविषयीं समर्थ नाहीं. आपण कृपासागर आहां, व मी आपला दीन शिष्य आहें. असें **पद्मपादाचें** तें दुःखयुक्त भाषण ऐकून **आचार्य** बोलेले कीं, गतगोष्टीचा शोक करूं नये. शिवाय मोहपाश फार दुर्निवार आहे, व कर्माची गति मोठी कठीण आहे. असें मीं पूर्वीच सुरेश्वराला सांगितलें होतें. बरें तें असो, झालें तें झालें आतां तूं शोक करूं नको. कारण तूं ती टीका मला ऋष्यशृंगपर्वतावर असतां दाखविली होती. ती माझे ध्यानांत आहे, करितां आतां तूं लेखनाला आरंभ कर ह्मणजे ती सांगतां असें सांगून त्याकडून ती टीका पूर्ववत् लिहवून त्याला दुःखापासून मुक्त केलें. आतां असें करणें हें **आचार्यां**सारख्यांना मोठें आश्चर्यकारक आहे असें नाहीं. कारण ते श्री **शंकरांचा** अवतार असल्यामुळें **कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ** होते.

---

हा लौकिक ऐकून त्या करेल देशच्या राजानें आचार्यांकडे येऊन विज्ञापना केली कीं, महाराज मीं पूर्वी तीन नाटकें करून, ते तीनही ग्रंथ गुरुमहाराजांना दाखविले होते. परंतु ते कांहीं कारणानें अग्नीनें दग्ध झाले तर कृपा करून पुनः ते सांगितले असतां मोठे उपकार होतील, अशी ती राजाची प्रार्थना ऐकून तीं तीनही नाटकें तोंडानें सांगितलीं. तेव्हां राजानें तीं लिहून घेऊन मोठ्या आनंदानें दंडवत् प्रणाम करून प्रार्थना केली कीं, सेवकाला जी आज्ञा असेल ती करावी. तेव्हां आचार्य बोलले कीं, हे कालटिक ग्रामांत रहाणारे ब्राह्मण ज्यांस तो ग्राम तुजकडून अग्रहार आहे, त्यांस मीं द्विजकर्मापासून भ्रष्ट केलें आहे. तेव्हां तूंही तसेंच त्यांना मानावें. असें सांगून आशीर्वाद देऊन त्याला त्याच्या नगराला पाठविलें. नंतर आचार्य सर्व शिष्यांसह अनेक देशांतील अद्वैतविरुद्धमतें खंडन करण्याकरितां निघाले.

## अथ तृतीय परिच्छेदः

नंतर आचार्यांनीं विचार केला कीं, दिग्विजय करावा, तेव्हां पद्मपाद आदिकरून एक हजार शिष्य बरोबर घेऊन दिग्विजय करण्याकरितां निघून प्रथम सेतुरामेश्वरीं जाण्याचा संकेत केला. वाटेंत मध्यार्जुन ह्मणून एक प्रसिद्ध शिवस्थान आहे, तेथें जाऊन श्रीमध्यार्जुन नामक शंकराची पूजा करून प्रार्थना केली कीं, हे शंभो आपण सर्व उपनिषदार्थ जाणतां व सर्वज्ञही आहां, करितां वेदार्थावरून द्वैत मत सत्य किंवा अद्वैत मत सत्य असा जो संशय आहे, त्याचा निर्णय सर्वांसमक्ष आपणच करावा, ह्मणजे कोणाची शंका रहाणार नाहीं. अशी प्रार्थना केल्यानंतर त्या मध्यार्जुनलिंगांतून सावयव मूर्ति निघून तिनें मेघाप्रमाणें गंभीर वाणीनें दक्षिण हस्त वर करून सांगि-

तलें कीं, "सत्यमद्वैतं सत्यमद्वैतं सत्यमद्वैतं" असें त्रिवार अद्वैतच सत्य आहे. असें सांगून त्या लिंगामध्येंच ती मूर्ति अंतर्धान पावली. तेव्हां तेथें जे प्रेक्षकजन होते; त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें. व जे तद्देशीय केवळ शंकरभक्त होते, ते **आचार्यां**ना साक्षात् शंकर मानून त्यांना सद्गुरु करून त्याचे आज्ञेनें **गणपति, दुर्गा, सूर्य, शंकर,** व **अच्युत** इत्यादि पंचायतनाची पूजा करून वेदमार्गानें कर्म करूं लागले. व शुद्ध अद्वैतमार्गाचें अवलंबन करून तन्मार्गी झाले. याप्रमाणें तद्देशस्थांना अद्वैतवादीकरून सर्व शिष्यांसह **आचार्यां**ची स्वारी **श्रीसेतुरामेश्वरीं** गेली. आणि सागराचें स्नान करून व **श्रीरामेश्वराचें** पूजन करून त्यांनीं तेथें कांहीं दिवस वास केला.

तेथें कांहीं **शाक्त** (देवीची उपासना करणारे) येऊन **आचार्यां**ना वंदन करून ह्मणूं लागले कीं, हे यतिवर्य आमचें मत ऐकावें, कारण ज्याचें अवलंबन केलें असतां इहलोकीं सौख्य भोगून शेवटीं मोक्षप्राप्ति होते; तें असें—जिला आद्यशक्ति ह्मणतात. जी सत्व, रज व तम, या गुणांहून पर असून जिच्यापासून मायेच्या सहाय्यानें महदहंकारपूर्वक संपूर्ण जगत् उत्पन्न झालें. त्या शक्तीपासूनच भवानी आदिकरून देवता उत्पन्न झाल्या, करितां तिची सेवा करणें हेंच योग्य आहे. ह्मणून तिच्या सुवर्णाच्या पादुका करून त्या बाहूंच्या ठिकाणीं धारण केल्यानें आह्मी जीवन्मुक्त असे कृतार्थ आहों. तेव्हां देवीची सेवा करणें यांतच मुक्ति आहे. ह्मणून आपणही तिचीं चिन्हें धारण करून तिची उपासना करावी. असें त्यांचें मत ऐकून **आचार्य** बोलले कीं, तुह्मी ह्मणतां हें खरें आहे, तथापि श्रेष्ठ जो पुरुष त्याच्या ज्ञानानें मुक्ति होते, असें सर्व शास्त्रांत सांगितलें आहे. आत्म्यानें आत्म्याचें ध्यान करूनच प्राणी मुक्त होतो

अन्यथा होत नाहीं. यास प्रमाण "तमेव विदित्वामृतत्व-मानशुः" इत्यादि कोट्यावधि वाक्यें प्रमाण आहेत. सांख्यानींही प्रकृतीहून पर जो ईश व सुखच आहे स्थान ज्याचें त्याच्या ज्ञानानें मुक्ति सांगितली आहे. तेव्हां ज्ञानावांचून मुक्ति नाहीं. आणि ज्ञानाचें व ब्रह्माचें ऐक्य सांगितलें आहे. करितां तुह्मीही तें ज्ञान साधण्याविषयीं यत्न करा, ह्मणजे तीच विद्या अद्वैतबोध (ज्ञान) करणारी आहे. व तिच्या सेवनानें तुमच्या चित्ताची शुद्धि होईल. असें आचार्यांचें तें सप्रमाण भाषण ऐकून त्यांना आपलें मत अगदीं मिथ्या आहे, असें वाटून तात्काल त्यांनीं ते कुंकुमाचे पुंड्र व बाहूंचे ठिकाणीं धारण केलेलीं तीं चिन्हें त्यांचा परित्याग करून आचार्यांना गुरु करून त्यांचे आज्ञेनें स्नानसंध्यादिक वैदिककर्में व पंचोपास्यता स्वीकारून शुद्ध अद्वैतमार्गावर श्रद्धा ठेवून आचार्यांचे शिष्य झाले.

नंतर केवल लक्ष्मीचे भक्त येऊन आचार्यांना वंदन करून बोलले कीं, सर्व फल देण्याविषयीं लक्ष्मीच समर्थ आहे. जिला परपुरुषाची आद्यप्रकृति असें वेदांनींही ह्मटलें आहे. जीपासून ब्रह्मादिदेव उत्पन्न झाले, करितां तीच मुमुक्षूला सेव्य आहे. तिचें आराधन करणारे, व तिचीं चिन्हें ह्मणजे पद्माक्षाची माला आदिकरून धारण करणें, तसेंच बाहूंचे ठिकाणीं कमल व कपाळावर कुंकुम हीं धारण करणारे, जे आहेत त्यांच्या हातांत मोक्ष आहे; करितां तुह्मीही तिची सेवा करावी. असें तें भाषण ऐकून आचार्य बोलले कीं परमात्म्यावांचून दुसरा स्रष्टा नाहीं तोच ब्रह्मस्वरूप, अद्वितीय, आनंदरूपी, असा आहे, करितां त्याचे स्वाधीन जी प्रकृति तिला मुक्त करण्याचें सामर्थ्य नाहीं. तेव्हां आपण जें ह्मणतां त्या मताची संगति बरोबर नाहीं.

१ त्यालाच जाणून मोक्षाला पावले.

आतां "**अहं ब्रह्मेति**" मी ब्रह्मस्वरूप आहें असें जो ध्यान करितो त्याच्या मात्र हातांत मुक्ति आहे. शिवाय अनित्याची उपासना करणारांना अनित्यच लोकप्राप्ति होणार, करितां तुह्मीं हीं सर्व चिन्हें टाकून शुद्ध अद्वैतविद्येचा आश्रय करून मुक्त व्हावें. असें **आचार्यांचें** भाषण ऐकून तात्काल त्यांनीं त्या चिन्हांचा परित्याग करून शुद्ध अद्वैतमार्ग स्वीकारून ते **आचार्यांचे** शिष्य झाले.

नंतर पुस्तक व पुंड्रकादि चिन्हें धारण करणारे **शारदोपासक** येऊन **आचार्यांना** वंदन करून बोलले कीं, स्वामिन्, वेदाला नित्यत्व आहे, करितां तत्स्वरूप जी शारदा तिलाही नित्यत्व आहे. सर्व लोकांना कारण व जगत्कर्त्री, नित्या, अशी वाणी आहे; असें **वेदामध्यें** सांगितलें आहे. **ब्रह्मा, विष्णु**-आदि करून जीं नांवें आहेत, तीं सर्व तिचींच वाचक आहेत. **सत्व, रज, तम,** असे जे तीन गुण त्यांहूनही ती निराळी आहे. करितां मोक्षाची इच्छा करणारांनीं तिची उपासना केली-पाहिजे. तेव्हां आपणही अतःपर त्या वाणीचीच उपासना करावी. तेव्हां **आचार्य** बोलले कीं, कंठ तालु इत्यादि स्थानांपासून उत्पन्न जो शब्दरूपी वेद त्याला नित्यत्व कसें येईल. कारण सर्व लय होतो, तेव्हां वर्णांचा ही लय आहे; शिवाय "**यस्य निःश्वसितं वेदाः**" या वाक्यानें परमात्म्याचा जो निःश्वास त्यासच वेद असें ह्मटलें आहे, तेव्हां तो परमात्मा वेदाचा जनक आहे, व तो वेदजन्य आहे. व "**यज्जन्यं तदनित्यं**" ह्म० जें जन्य तें अनित्य असें प्रमाण आहे. व प्रलयकालीं वेद आपल्या अंगांनीं युक्त असे लीन होतात, असें **सूर्यानें** ऋषींना कथन केलें आहे, ही कथा **सूर्यसिद्धांतांत** वर्णिलेली आहे. आतां वेदाला जरी अनित्यत्व असलें तथापि ब्रह्म नित्य आहे; ह्मणून वाणीहून पर असें जें **सत्** आदिकरून शब्दांनीं वाच्य ब्रह्म तें

जाणण्याविषयीं यत्न करावा; व तें जाणलें ह्मणजे तात्काल मुक्तिपद प्राप्त होतें. त्यावांचून दुसरें साधन नाहीं असें वेदामध्यें सांगितलें आहे. याप्रमाणें आचार्यांचें भाषण ऐकून ते शारदोपासक शुद्ध अद्वैतमताचें अवलंबन करून आचार्यांचे शिष्य झाले.

पुढें वामाचारसंपन्न असून विद्योपासक असे कांहीं पंडित येऊन आचार्यांना वंदन करून बोलले कीं, वंध्यापुत्राप्रमाणें शून्य असें हें आपलें अद्वैत मत मुक्ति देणारें नाहीं. तर जिच्या योगानें परेश जो भगवान् त्याच्या सर्व क्रिया चालतात; व जी निरंतर स्वतंत्र जगत् उत्पन्न करणारी व विद्यास्वरूपा, तिचे ठिकाणीं प्रीति केली असतां मुक्ति हस्तगत होते. त्यावांचून अन्य साधन नाहीं. जी भृग्वादि महर्षींला मान्य व जिची सेवा करीत असतां विधिनिषेधाची प्रवृत्तिच होत नाहीं करितां आपणही तिचा आश्रय करून मुक्त व्हावें. तेव्हां आचार्य बोलले कीं, एका आत्म्यावांचून सर्व अनित्य आहे, असें वेदांमध्यें सांगितलें आहे. व चिदात्मा प्रकृतीहून पर (निराळा) आहे. निषेध न मानून कलंज[१] भक्षण व सुरापान केल्यामुळें मात्र तुमचें ब्राह्मण्य अगोदर नष्ट झालें आहे, करितां त्याची निष्कृति केली पाहिजे. आतां भृगु, अगस्ति यांचीं उदाहरणें घेणें तुह्माला योग्य नाहीं. कारण भृगूनें विष्णूला लाथ मारिली होती व अगस्तीनें समुद्रपान केलें. ती शक्ति तुह्मांमध्यें नाहीं. करितां ब्राह्मणजातीपासून भ्रष्ट झाल्याबद्दल प्रायश्चित्त करून शुद्ध अद्वैतमार्गाचा स्वीकार करा. अशी आज्ञा होतांच त्याप्रमाणें करून ते आचार्यांचे शिष्य झाले. आतां हें जें आचार्यांनीं केलें तें आपली प्रसिद्धि होण्याकरितां नसून केवळ लोकहिताकरितांच केलें असें समजलें पाहिजे.

---

१ विषयुक्त शस्त्रानें मारलेलें जनावर किंवा त्याचें मांस.

याप्रमाणें आचार्यांनीं रामेश्वरीं भिन्न भिन्न शास्त्रमतांचें खंडन करून श्रीरामेश्वराची पूजा केली आणि तेथून श्रीकांचीक्षेत्रीं जाऊन तेथें दोन महिने वास केला. तितक्यामध्यें अद्वैत मताचा द्वेष करणारे शिवचिन्हांनीं ज्यानीं आपल्या भुजा चिन्हित केल्या आहेत, असे जंगम येऊन आचार्यांना बोलले. हे आचार्य, विरूपाक्षच मुख्य दैवत असून तोच मुमुक्षूला शरण्य आहे. व जे शिवचिन्हांनीं युक्त आहेत, त्यांना त्या शिवलोकाची प्राप्ति होते. आणि मीच पुराण देव आहें माझ्यापासून सर्व उत्पन्न झालें; असें साक्षात् शंकरांनीं जगताला कारण कोण ? अशी शंका उत्पन्न झाली तेव्हां सांगितलें. उत्पत्ति व पालन हीं तोच करितो. कारण "रुद्राणां शंकरश्चास्मि" ह्मणजे रुद्रांमध्यें शंकर ही माझी विभूति आहे. असें भगवद्वाक्य आहे. शिवाय दुर्वासाला शंकरांनीं जो उपदेश सांगितला त्यांत "अहमेकाक्षरः कर्ता" हा० अक्षर असा मीच एक कर्ता आहें इत्यादि विशेषणें आहेत. व आणखी सर्वांस मीच कारण आहें, असा उपदेश करून शेवटीं भस्म, रुद्राक्ष धारण करण्यास सांगून महादेवाची पूजा करा असें सांगितलें. आतां "आसीन्नारायणः पूर्वं नेशानो न विधिस्तथा" हा० पूर्वीं नारायणच होता शंकर किंवा ब्रह्मा हे नाहींत या ठिकाणीं नारायण शब्दानें शंकरच उक्त आहे. करितां ईश आराधना व त्याचे चिन्हांचें धारण हेंच मुक्तीला साधन आहे. असें ऐकून आचार्य बोलले, तुह्मीं जीं चिन्हें धारण करितां ह्यास प्रमाण नाहीं, करितां त्यांचा त्याग करावा. कारण देहावर अनेक देवता राहतात, असें श्रुतीमध्यें प्रमाण आहे. व तें ब्रह्मदेवानें

---

१ अर्थ.—वेद व वेदांगें जाणणारा जो ब्राह्मण त्याच्या नाभीच्या वर सोमपा देवता रहातात व नाभीच्या खालीं असोमपा देवता रहातात.

अरुणकेतूला सांगितलें आहे. ह्मणून त्यांना या चिन्हधारणापासून ताप होतो; व त्या देवता त्यास शाप देऊन निघून जातात. आणि मग हा देह पतित होऊन काष्ठवत् रहातो, करितां विनाकारण देह भाजून चिन्हें धारण करूं नयेत. आणि व्याधीवांचून जर ब्राह्मणाचे शरीरावर चिन्हें पाहिलीं तर त्या दोषपरिहारार्थ सूर्यावलोकन करावें, अथवा स्नान करावें असें सांगितलें आहे. करितां जो आत्मा सर्वव्यापक व विभु आहे त्याचें ध्यान केल्यानें व त्याचे ज्ञानानें मोक्ष आहे; ह्मणून आत्मविद्या गुरूपासून प्राप्त करून घेऊन अभेदरूप जें अमृत त्याच्या पानानें तृप्त व्हावें. असें आचार्यांचें भाषण ऐकून तत्काल ते अद्वैतमतावलंबन करून आचार्यांचे शिष्य झाले.

नंतर भस्म, रुद्राक्ष धारण करणारे व लिंगादि चिन्हें ज्यांनीं धारण केलेलीं आहेत, असे कांहीं शैव आचार्यांकडे येऊन मोठ्या रागानें बोलले कीं, अरे, कपटवेष धारण केलेला, आणि प्रामाणिकमतापासून भ्रष्ट करणारा असा तूं सर्वांस फसवून कोठें जातोस ? शुष्कमतें जिंकल्यामुळें गर्व वाहूं नको. आतां आमचें मत ऐक—ब्राह्मणांत वैष्णव श्रेष्ठ आहेत, आणि त्यांहून शैव श्रेष्ठ आहेत, असें अज जो विष्णु त्यानें नारदाला सांगितलें. तेव्हां जे त्या शैवपदावर आरूढ झाले, त्यांना तूं खालीं पाडण्याविषयीं यत्न करितोस हें योग्य नाहीं. "नमस्ते रुद्र" इत्यादि वाक्यांनीं वेदामध्यें महेश्वर जो शिव त्याचीच स्तुति आहे, व सर्वभूतीं तोच व्यापक आहे. सर्व श्रुतींमध्यें त्यालाच जगत्कारण मानिलेलें आहे, ह्मणून त्याचीं चिन्हें, व भस्मरुद्राक्ष ह्यांचें धारण, तसेंच त्याचें अर्चन, व रुद्राध्यायाचा जप, हीं केलीं असतां सर्व पापापासून मुक्त होऊन शिवरूपी होतो. असें रुद्रकांडामध्यें उत्तम रीतीनें प्रतिपादन

केलेलें आहे. सुरापान, ब्रह्महत्या, गुरुस्त्रीशीं गमन इत्यादि महापातकानें जरी युक्त आहे, तरी भस्मधारणानें व रुद्राध्याय जपानें सर्व पातकांपासून मुक्त होतो, असें **शिवगीते**मध्यें सांगितलें आहे. तसेंच **पाशुपददीक्षा** धारण करून जर शिव**सहस्रनामा**चा जप करील तर तोही मानुषतनूला सोडून शिवरूपी होईल; व पुढें शंकरापासून कैवल्यपदाचीही प्राप्ति होते, असें **कालाग्निरुद्रोपनिषदांत** सांगितलें आहे. जर विभूति धारण करील तर तो साक्षात् शंकर आहे; असें **अगस्त्यसंहिते**मध्यें सांगितलें आहे. असें भाषण ऐकून **आचार्य** बोलले कीं, अग्निदाहानें तप्त तनु होऊन उपयोग नाहीं, तर ती कृच्छ्रचांद्रायणादिक तपानें झाली पाहिजे, असा "**अतप्ततनूर्नतदामोअश्नुते**" या श्रुतीचा अर्थ आहे. नाहीं तर **बृहन्नारदीयपुराणां**त जो निषेध आहे, त्याला विरोध येतो; कारण त्यांत लिंगादिचिन्हें धारण करूं नये याविषयीं निषेध सांगितला आहे. व **मार्कंडेयपुराणा**मध्येंही स्पष्ट सांगितलें आहे, ह्मणून लिंगादिचिन्हें धारण न करितां "**यतो वाचो निवर्तंते**" इत्यादि श्रुतींनीं प्रदिपादित जें ब्रह्म त्याची साक्षात् उपासना आरंभीं संभवत नाहीं; करितां त्या ब्रह्माचा अवतार जो शिव त्याची उपासना वेदामध्यें सांगितली आहे. तिचें निराकरण करण्याविषयीं कोणीही समर्थ नाहीं; तसेंच भस्मरुद्राक्ष यांचेंही धारण करावें; परंतु लिंगादिचिन्हें धारण करण्यास प्रमाण नाहीं; करितां त्यांचें धारण उपयोगी नाहीं. असें **आचार्यां**चें भाषण ऐकून, ती बुद्धि टाकून अद्वैतमताचा स्वीकार करून तेही **आचार्यां**चे शिष्य झाले.

नंतर **आचार्य** सर्व शिष्यांसह **अनंतशयनदेशीं** गेले, आणि देवदर्शन करून तेथें एक महिना वास केला.



सहाप्रकारचे **वैष्णव** आले. तेव्हां त्यांला **आचार्यांनीं** प्रश्न केला कीं, तुमचें लक्षण काय? तेव्हां ते बोलले कीं, ज्या वासुदेवानें रामकृष्णादि अवतार धारण केले, त्याची उपासना केली असतां त्याचे सलोकतेला पावतात; असें **कौंडिण्यऋषीं**चेंही मत आहे. आमचा आचार दोन प्रकारचा. एक क्रिया व दुसरें ज्ञान. त्यांत **ब्रह्मगुप्त** आदिकरून हे कर्मठ आहेत, आणि **विष्णुशर्मा** आदिकरून जे आह्मी ते ज्ञानसंपन्न, असे येथें रहातों.

नंतर विष्णुशर्म्यानें आचाराबद्दल प्रश्न केल्यावरून, **आचार्य** सांगतात कीं, ज्याच्या सत्तेवांचून एक काडीही हालत नाहीं असा जो ईश त्यानें वैदिकमार्ग उत्पन्न केला. "**जन्मना जायते शूद्रः कर्मणा जायते द्विजः**" या वाक्यावरून ब्राह्मण प्रथम उत्पन्न होतो त्यावेळीं शूद्रवत् असतो. व नंतर संस्काररूप कर्मानें ब्राह्मणत्व पावतो. ब्राह्मणानें नित्य संध्यादि कर्में केलीं पाहिजेत; नाहीं तर तो दोषी होतो. तसेंच अग्निहोत्रादि कर्मेंही करावीं, तेणेंकरून तो सुख पावतो. याविषयीं "**प्रातरादिषु कालेषु अग्निहोत्रादिकं बुधः॥ कुर्वन्वै ब्राह्मणो विद्वान्सकलं भद्रमश्नुते**" इत्यादि वेदवाक्यें प्रमाण आहेत, ह्मणून श्रुतीनें सांगितलेंकीं, सर्वांनीं कर्में अवश्य केलीं पाहिजेत. जो तसें करीत नाहीं त्याला प्रलयापर्यंत नरकप्राप्ति आहे. नंतर विष्णुशर्मा आदिकरून सर्व **आचार्यां**ना शरण येऊन कर्मलोपाबद्दल प्रायश्चित्त करून कर्मनिष्ठ झाले; व विष्णुशर्मा स्मार्ताचारसंपन्न होऊन पांचही देवतांची उपासना करूं लागला.

---

**१ भक्ता भागवताश्चैव वैष्णवाः पांचरात्रिणः॥ वैखानसाः कर्महीनाः षड्विधा वैष्णवा मताः॥**
**अर्थ**—असे सहा प्रकारचे वैष्णव मानिले आहेत.

नंतर ब्रह्मगुप्तादिक येऊन **आचार्यांनां** वंदन करून त्यांपासून ज्ञानसंपन्न होत्साते कृतार्थ होऊन तेही अद्वैतमताचा स्वीकार करून पंचोपासक झाले.

याप्रमाणें **आचार्यांनीं** जीं कांहीं विष्णु व शिव यांचा भेद करणारीं मतें होतीं, तीं सर्व श्रुतिवाक्यप्रमाणानें व युक्तीनें खंडित करून अद्वैतमताचें स्थापन केलें.

नंतर **हिरण्यगर्भोपासक** येऊन **हिरण्यगर्भच**[1] मुख्य आहे, असें एकदेशीय श्रुतिवाक्यांनीं सिद्ध करूं लागले, तेव्हां त्यांचेंही यथायोग्य खंडन केलें. आणि त्यांना अद्वैतमार्गी करुन **आचार्यांनीं** आपले शिष्य केले. नंतर कोणी **अग्न्युपासक**, कोणी सूर्योपासक, असे जे वादाकरितां प्राप्त झाले, त्यांचें खंडन करून **आचार्य** शिष्यांसह **गणवर** ह्मणून एक नगर आहे तेथें गेले. त्यांनीं प्रथम **कौमुदी नदीचें** स्नान करुन व गणपतीची पूजा करुन, त्या ठिकाणीं एकमास पर्यंत वास केला. तेव्हां तेथील पंडीतांनींही **आचार्यांचा** थाट व अद्वैतमार्ग पाहून मोठें आश्चर्य केलें आणि **आचार्यांकडे** येऊन ह्मणाले कीं, हें आपलें मत चांगलें नाहीं. कारण जें ब्रह्म मनाला व वाणीलाही अगोचर आहे, तर मग तें फलद्रूप कसें होईल ? व अज्ञाला त्याचा बोध तरी कसा व्हावा ? करितां आमचें **गाणपतमत** आपण स्वीकारावें.

ह्या मताचे सहा भेद आहेत, व हे वेदतात्पर्यानें सिद्ध आहेत. असें ह्मणून त्याला प्रमाणें वगैरे सांगूं लागले तेव्हां **आचार्य** बोलले कीं, हे मूढ जो गणपति शिवाचा पुत्र त्याला जगत्कारणत्व कसें संभवेल ? शिवाचे पुत्र बापाला उत्पन्न करतो असें कसें संभवेल ? अशाप्रकारें त्यांचें सप्रमाण खंडण करून **आचार्यांनीं** त्यांस आपले शिष्य करून अद्वैतमार्गी केले.

---

१ ब्रम्हदेव.

नंतर **हरिद्रागणपति, उच्छिष्टगणपति, नवनीत गणपति,** इत्यादि जे गणपतीचे भेद त्यांची उपासना करणारे येऊन ती देवता मुख्य आहे, असें प्रतिपादन करूं लागले, तेव्हां **आचार्यांनीं** त्या सर्वांचें समाधान करून ब्रह्मच मुख्य उपास्य आहे; परंतु त्याची उपासना करितां येणें कठीण, ह्मणून त्याचेच अंश असे जे पांचही देव, ते उपास्य आहेत; करितां सर्वांची उपासना करावी. असें सांगून त्यांना अद्वैत मार्गी केले. मग ते पांचही देवतांची पूजा करूं लागले.

नंतर **गणपति, कुमार, भैरव,** इत्यादिक जे शिवाचे गण त्यांचे पूजक **हेरंब, सुत,** आदि करून होते, ते येऊन **आचार्याला** ह्मणाले कीं, स्वामिन् हें संपूर्ण जगत् गणपत्यात्मक असें आह्मी चिंतन करितों तेव्हां आपण दोष कसा देतां ! तेव्हां **आचार्य** ह्मणाले. हे मूढहो तुह्मांला शास्त्रतत्त्व सांगतों ऐका—पुरुषाधिष्ठित जी प्रकृति तिजपासून अगोदर महत्तत्त्व झालें, त्यापासून अहंकार झाला. तो सत्व, रज, तमात्मक असून रुद्र, विष्णु, ब्रह्मा, या स्वरूपानें आहे. नंतर रुद्रापासून गणपति, कुमार, व भैरव हे उत्पन्न झाले. तेव्हां त्यांची पूजा त्या त्या अधिकारस्थानीं करावी. ते संपूर्ण जगतांला कारण नाहींत. जगताला कारण ब्रह्मच आहे. याकरीतां पांचही देवतांची पूजा ब्रह्मभावनेनें करावी, हेंच मुक्तीला साधन आहे. असें **आचार्यांचें** भाषण ऐकून त्यांनीं **आचार्याला** वंदन केलें, व सर्व चिन्हांचा परित्याग करून ते **आचार्यांचे** शिष्य झाले. व तेव्हांपासून पांचही देवांची पूजा करूं लागून अद्वैतमती झाले.

नंतर **आचार्यांनीं** जेथें शंकर, मूर्तिमान् **अंबरेश** या नामानें प्रसिद्ध आहे. अशा त्या **कांचीनगरांत** एक महिनापर्यंत वास करून व तेथें उत्तमप्रकारें देवाचें मंदिर करवून

त्यांत शंकराची प्रतिष्ठा केली; आणि त्या नगराला **शिवकांची** असें नांव दिलें. व तेथून जवळच **विष्णूची** स्थापना करून त्याला **विष्णुकांची** असें नांव दिलें. आणि त्या दोनही स्थानीं पूजा वगैरे करण्याकरितां ब्राह्मणांची व भक्तजनांची नेमणूक करून, व्यवस्था केली. हीं दोन्हीं स्थलें अद्याप प्रसिद्ध आहेत.

नंतर त्या देशांतील **ताम्रपर्णातीरीं** रहाणारे कांहीं भेदवादी येऊन **आचार्यांला** ह्मणाले, महाराज, यालोकीं देहभेद प्रत्यक्ष असून परलोकींही त्या त्या कर्माप्रमाणें व त्या त्या देवतेच्या उपासनेनें त्या त्या देवतेच्या लोकांची प्राप्ति होते. असें श्रुतिपुराण इत्यादि ग्रंथांवरून सिद्ध आहे, तेव्हां भेद सत्य आहे असें आह्मी ह्मणतों. तर आपण अभेद ह्मणतां हें कसें ? असा प्रश्न केल्यानंतर **आचार्य** ह्मणाले कीं हें जें तुह्मी ह्मणतां तें परमार्थ न जाणल्यामुळें आहे. कारण, "**सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येदिति**"[1] इत्यादिक श्रुतींनीं, तत्त्वज्ञान होऊन त्या ज्ञानानें पापपंजर दग्ध झाल्यानंतर मुक्त दशेंत भेदाचा अभाव प्रतिपादन केला आहे. तसेंच "**तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत इति**"[2] या वाक्यानें व "**अनेन जीवेनात्मनानुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणीति**"[3] इत्यादि श्रुतिवाक्यांच्या तात्पर्यानें जगत्कर्तृ ब्रह्माचाच जीवरूपानें या जगतामध्यें प्रवेश आहे. तसेंच देव किती आहेत असा उपक्रम करून एकच देव अंतर्यामित्वानें आहे असें श्रुतीनें सांगितलें आहे व "**बहुस्यां प्रजायेय**"[4] इत्यादि श्रुतींनीं भोक्तृभोग्यात्मक जो सकल प्रपंच

१ सर्वच आत्मस्वरूप आहे तर कोणी कोणाला पाहावयाचें ?
२ तें जगत् उत्पन्न करून त्यांतच स्वतः प्रवेश करिता झाला.
३ या जीवस्वरूपानें आत्म्याशीं प्रवेश करून नामरूपाला पावलो.
४ [illegible] झाला.

त्याला परमार्थता सांगितली आहे. करितां सर्वज्ञ, नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, अशा स्वभावानें युक्त, व सर्वांला अधिष्ठानभूत, अशा ब्रह्माचीच मुमुक्षूंनीं उपासना करावी; ह्मणून तुह्मींही जीव व परमात्मा यांचा भेद व देवतांचा भेद टाकून शुद्धाद्वैत ब्रह्माच्या उपासनेनें मुक्त व्हावें. अशाप्रकारें उपदिष्ट, **कांची, ताम्रपर्णी** इत्यादि देशांत रहाणारे जे जन ते शुद्धाद्वैतमार्गी झाले.

नंतर कांहीं **आंध्रदेशां**तून आलेले त्या लोकांनांही याचप्रमाणें उपदेश करून व त्यांजवर अनुग्रह करून **आचार्य, श्रीव्यंकटेशगिरी**ला गेले आणि **श्रीव्यंकटेशाला** वंदन करून **विदर्भदेशाच्या** राजधानीला गेले, तेथें त्या देशाच्या राजानें **आचार्यांचा** सत्कार करून पूजा केली, नंतर **आचार्यांनीं** आपल्या शिष्यांकडून **भैरवमताचें** खंडन करवून त्यांना स्वमतावलंबी केलें.

नंतर **आचार्य कर्नाटकदेशांत** जाण्याकरितां निघाले, तेव्हां त्या राजानें सांगितलें कीं, महाराज आतां आपण ज्या प्रांतीं जाण्याविषयीं इच्छा करितां, तिकडे आपल्या यशाचा द्वेष करणारे व भैरवाची उपासना करणारे **कापालिक** महाक्रूर, असे बहुत आहेत, करितां आपल्याला तिकडे फार सावध राहिलें पाहिजे. असें राजाचें भाषण ऐकून **सुधन्वा**नामक राजा **आचार्यांचा** शिष्य तेथें होता तो ह्मणाला, महाराज कांहीं चिंता नाहीं. मी बरोबर असतां कोणतीही चिंता करण्याचें कारण नाहीं. ते कापालिक कसेही क्रूर असोत, किंवा कसेही पराक्रमी असोत, माझ्यापुढें त्यांच्या पराक्रमाचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. नंतर त्या कापालिकांस जिंकण्याकरितां **आचार्य सुधन्वा** व इतर शिष्य यांसह उज्जयिनीला गेले. तेथें

आचार्य आले असें समजतांच कापालिकांचा राजा जो क्रकच नामें होता तो अंगाला चिताभस्म लावून व हस्तामध्यें मनुष्य-मस्तकाचें कपाल धारण करून आपल्या सर्वमंडळीसह आचार्यांजवळ येऊन मोठ्या गर्वानें बोलला कीं, हे यते तूं भस्म धारण केलें हें ठीक आहे, परंतु पवित्र असें नरकपाल धारण करण्याचें सोडून, हें अपवित्र असें खापर कशाकरितां धारण केलें आहे? व कपाली जो भैरव त्याची उपासना कां करीत नाहीं; व त्याची पूजा जर केली नाहीं तर त्याचा संतोष कसा होईल? याप्रमाणें त्याचें तें सगर्व भाषण ऐकून सुधन्व्यानें हा कोणी कुत्सित पुरुष आहे, असें समजून आपल्या सेवकांकडून त्याला तेथून घालवून दिलें.

तेव्हां त्याला मोठा राग येऊन त्यानें भोंवया चढवून व ओंठ चावून डोळे लाल केले आणि हातांतील शस्त्र वर करून मोठ्या आवेशानें ह्मणाला, जर तुमचीं सर्वांचीं मस्तकें या शस्त्रानें तोडिलीं नाहींत तर मी क्रकच या नांवाचा त्याग करीन. असें सांगून तो क्रकच निघून गेला. आणि आपली मंडळी जमाकरून आचार्यांचे मंडळीचा नाश करण्याकरितां पाठविली. तेव्हां ते कापालिक येऊन ब्राह्मणाला फार त्रास देऊं लागले. मग सुधन्व्यानें युद्धाची तयारी केली. तेव्हां त्याची व याची मोठी लढाई झाली. त्यांत सुधान्व्यानें त्या सर्व कापालिकांचा नाश केला. सुधान्वा तिकडे युद्ध करीत असतां कांहीं कापालीक ज्याठिकाणीं आचार्य होते तिकडे येऊन, त्यांनीं इतर शिष्यांचा नाश करण्यास आरंभ केला. तेव्हां शिष्य भय पावून गुरूला शरण आले. नंतर आचार्यांनीं एका हुंकारानें त्या सर्व कापालिकांचा नाश केला. याप्रमाणें आपल्या सर्व सेनेचा नाश झाला असें ऐकिल्यावरोवर त्या क्रकचाला फारच राग-

येऊन तो हातांत मद्यानें पूर्णभरलेलें असें नरकपाल घेऊन आचार्यांजवळ आला. आणि त्यांतील अर्धे प्राशन करून त्यानें भैरवाचें ध्यान केलें, तेव्हां भैरव प्रत्यक्ष जवळ येऊन उभे राहिले आणि ध्यान करण्याचें कारण त्या ककचाला विचारितांच तो बोलला, महाराज तुझ्या भक्तांचा द्रोह करणारा जो त्याचा वध करावा. असें त्याचें भाषण ऐकून भैरव क्रोधानें बोलले कीं, हा माझा अवतार असून तो मत्स्वरूप आहे; करितां याचा तूं कसा द्रोह केलास, हा माझा मोठा अपराध घडला; करितां त्याजबद्दल तुला शासन केलें पाहिजे. असें बोलून त्या ककचाचेंच शीर तोडिलें. नंतर आचार्यांनीं भैरवाची स्तुति केली. आणि ह्मणाले महाराज, तुझ्या ह्या भक्तानें आमचा अपराध केल्यावरून माझ्या शिष्यांनीं त्याला ताडण केलें. तेव्हां त्यानें आपलें स्मरण केलें. नंतर जें काय झालें तें सर्व आपल्यास विदितच आहे. तेव्हां भैरव बोलले; कुमति अशा विप्रांस दंड करण्याकरितां आपला अवतार आहे व आपण साक्षात् शंकर आहांत करितां आपण जें कराल तें मला मान्य आहे. आतां हे जे अन्यकापालिक माझे भक्त आहेत यांना ब्राह्मणाचारसंपन्न करावें. आतां मी जो ह्यांना प्रत्यक्ष होतों तो केवळ मंत्रबद्ध आहें. ह्मणून होतों ह्याच्या आचारानें किंवा भक्तीनें होत नाहीं. असें सांगून भैरव अंतर्धान पावले. नंतर तें भाषण बाकीच्या कापालिकांनीं ऐकून मोठे भयभीत झाले; आणि आचार्यांना शरण जाऊन त्यांनीं प्रार्थना केली कीं, महाराज आह्मी मूढ आहोंत, करितां आतां आमचें रक्षण आपणच करावें. कारण आपण "कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ" आहां. आह्मी आपल्यास शरण आहों. आमचें रक्षण करावें. असें त्याचें भाषण ऐकून आचार्यांनीं कृपाळू होऊन आपल्या शिष्यांना त्यांना शुद्ध

करण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां **पद्मपाद** आदिकरून शिष्यांनीं त्यांना ब्रह्मकर्माचा मार्ग सांगून पांचही देवांची उपासना सांगितली–नंतर पंचमहायज्ञ करणारे असे ते परम गुरूचा आश्रय करून **आचार्यांचे** शिष्य झाले. नंतर नास्तिकमताग्रणी जो **चार्वाक** तो सभेमध्यें येऊन बोलला कीं, हे **आचार्य** आपण वेद प्रमाण मानतां हें ठीक नाहीं, व त्यांतील तात्पर्यही चुकीचें आहे. कारण देह व आत्मा एकच आहे, देहाचा लय होणें हाच मोक्ष, दुसरा मोक्ष आहे असें मूढ जन ह्मणतात, परंतु तें सत्य नाहीं. आतां जो मृत होतो त्याला पुनः जन्म नाहीं. कारण जसें समुद्राप्रत गेलेलें नदीचें पाणीं पुनः परत येत नाहीं, त्याप्रमाणें एकदां प्राणी मरण पावला असतां पुनः जन्माला येत नाहीं. ह्मणून देहलय हाच मोक्ष आहे. आतां मृतांचें श्राद्ध केलें असतां मृत झालेल्याची तृप्ति होते, असें जें वेदाचें ह्मणणें या विचाराला काय ह्मणावें? शिवाय स्वर्ग आहे, नरक आहे, व पुण्य पापानें ते अनुक्रमें प्राप्त होतात असें जें ह्मणणें तेंही बरोबर नाहीं. कारण जो सुखाचा भोक्ता आहे त्याला तो सुखोपभोगच स्वर्ग आहे. आणि दुःखोपभोग हाच नरक आहे. मिळून सर्व कांहीं याच ठिकाणीं आहे अनुभवही असाच आहे ह्मणून प्रत्यक्ष प्रमाणानें अनुभव असतां परलोकीं जातो, असें जें ह्मणणें हें स्वरूपहीन जीवाला कसें संभवेल? तेव्हां खरा विचार केला असतां ते परलोक वगैरे कांहीं नाहींत ह्मणून वेदमत व आपलें मत हीं दोनही युक्त नाहींत. ह्मणून मान्य करण्यास योग्य नाहींत.

असें भाषण ऐकून **आचार्य** ह्मणाले कीं, हें तुझें मत श्रुतिबाह्य आहे करितां प्रमाण धरतां येत नाहीं. आतां माझें मत सांगतों ऐक. देहाहून आत्मा भिन्न आहे, व तो मुक्त आहे. त्या

आत्म्याच्या ज्ञानानें मुक्ति होते असें श्रुतीनें सांगितलें आहे "[1]ज्ञानाग्निदग्धकर्माणो यान्ति ब्रह्म सनातनं" अशी जी श्रुति आहे ती जर प्रमाण न मानली तर तुझें कुत्सित ह्मणणें तरी कसें प्रमाण मानावें ? आतां स्थूलदेह दग्ध झाला तरी तो जीव लिंगदेहानें परलोकीं गमन करितो. याविषयीं ज्योतिष्टोमादिक वाक्यें प्रमाण आहेत. हा जीव या देहापासून दुसऱ्या देहांत [2]जलौकेप्रमाणें जातो अशाविषयीं वेदामध्यें प्रमाण आहे. आतां त्याचें प्रेतत्व नाहींसें होण्याकरितां व पुण्यलोकप्राप्ति होण्याकरितां पुत्रानें श्राद्धादिक हीं अवश्य केलीं पाहिजेत, व मुक्ति होण्याकरितां गयेमध्यें पिंडदानही करावें. अशीं, स्मृति व पुराण यांमध्यें प्रमाणें आहेत. हीं प्रमाणेंही जर तुला मान्य नसतील तर तूं मूढ आहेस करितां येथून निघून जा. कारण वादालाच तूं योग्य नाहींस. असें आचार्यांचें भाषण ऐकून त्यानें आपला वेष व भाषण यांचा परित्याग करून तत्काल आचार्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना शरण गेला.

नंतर सौगत, क्षपणक, जैन, बौद्ध इत्यादिक मताभिमानी येऊन त्यांनीं आपलीं मतें प्रदर्शित केलीं. तेव्हां आचार्यांनीं सप्रमाण त्या सर्वांचें खंडन करून वेदमार्ग स्थापित केला. आणि शिष्यांसह स्वारी निघाली ती अनुमल्लपुरीला गेली आणि तेथें एकवीस दिवस मुक्काम केला. तेथें मल्लारीचे भक्त येऊन मल्लारीच मुख्य देव आहे असें ह्मणूं लागले, तेव्हां आचार्यांनीं त्यांचें श्रुतिवाक्यानीं खंडन करून प्रायश्चित्त देऊन त्यांसही शुद्धाद्वैत मार्गी केले.

---

१ ज्ञानरूप अग्नीनें दग्ध आहेत कर्में ज्यांचीं असे सनातन ब्रह्माप्रत पावतात.

२ जलौका ह्मणून एक कीटक आहे तो गमनकालीं देहाचें पूर्वार्ध प्रथम टेंकून नंतर पाठिमागचें अर्धांग सोडतो.

नंतर तेथून पश्चिमदिशेला **मरुंध** ह्मणून एक नगर आहे तेथें गेले. तेथें **विष्वक्सेन** मताचें खंडन करून त्यांस आपले शिष्य केले.

नंतर **मन्मथाचे** भक्त आले, तेही मुख्य मोक्ष दाता मन्मथ आहे असा आक्षेप करूं लागले, तेव्हां **आचार्य** बोलले कीं हें तुमचें मत अगदीं वाईट आहे. कारण अंगहीन जो मदन त्याला मोक्ष देण्याविषयीं शक्ति कशी संभवेल ? शिवाय **शंकरांनीं** ज्याला दग्ध केलें त्याला मुख्यत्व तरी कसें संभवेल. तेव्हां श्रुतिविरुद्ध असें हें तुमचें मत बरोबर नाहीं; असें ऐकून त्यांनीं तें मत सोडून अद्वैत मताचें अवलंबन करून ते **आचार्यांचे** शिष्य झाले.

नंतर तेथून उत्तरदिशेला **मागधपुराला** गेले, तेथें **कुबेरमताचें**, व **इंद्रमताचें** खंडन केलें. व तेथून **यमप्रस्थपुराला** जाऊन **याम्यमताचें** खंडण करून सर्व शिष्यांसह **आचार्य श्रीप्रयागाला** आले व तेथें कांहीं दिवस त्यांनीं वास केला. तेव्हां **वरुणाचे** भक्त येऊन **वरुणच** मुक्तिदाता आहे असें कांहीं प्रमाण दाखवून प्रतिपादन करूं लागले तेव्हां **आचार्यांनीं** त्यांचें युक्तीनें व श्रुतिप्रमाणानें खंडन करून त्या सर्वांस शुद्धाद्वैतमार्गी केले. नंतर **शुन्यवादी** आले त्यांनांही वादामध्यें जिंकून ब्रह्मोपासक केले.

नंतर **वाराहमताचें** अवलंबन करणारे येऊन **वराहच** मुख्य मुक्तिदाता आहे व तो सर्वांस धारण करितो इत्यादि प्रकारें आक्षेप करूं लागले, तेव्हां तो विष्णूचा अंश आहे. ह्मणून त्याला मुख्यता संभवत नाहीं असें **आचार्यांनीं** त्यांचें अनेकप्रकारें खंडण करून त्यांस अद्वैतमार्गी केले. नंतर कांहीं लोक**संघच** मुख्य आहे व कोणीं **गुणच** मुख्य आहे. असें ह्मण-

णारे आले; परंतु त्यांचें यथायोग्य खंडन केल्यामुळें, तेही ब्रह्मोपासना करूं लागून शिवाय **आचार्यांचे** शिष्यही झाले.

नंतर **सांख्य, कापिल,** या मतांचें खंडन करून **आचार्यांची** स्वारी सर्व शिष्यांसह **श्रीवाराणसीक्षेत्रीं** गेली. आणि त्या ठिकाणीं **आचार्यांनीं** तीन महिने वास केला, तेव्हां **कर्मवादी** येऊन **कर्मच** मोक्षाला साधन आहे असा आक्षेप करूं लागले; तेव्हां **आचार्य** बोलले कीं कर्म हें साक्षात् मोक्षाला साधन नसून मनाच्या शुद्धीकरितां आहे; व मन हें ज्ञानाचें अधिष्ठान आहे, तेव्हां ज्ञानानेंच मोक्ष आहे असें सांगून त्याविषयीं श्रुतींतील, अनेक प्रमाणें दाखवून त्यांना ब्रह्मतत्त्व आणि अद्वैतमार्गी केलें.

नंतर, **चंद्र, मंगल** इत्यादि नवग्रह व **पितर, गंधर्व, भूतें** यांचे उपासक आपआपली उपास्य देवताच मुख्य मोक्ष देणारी आहे असें एकदेशप्रमाणांनीं प्रतिपादन करूं लागले. तेव्हां **आचार्यांनीं,** त्या सर्वांस अन्याधीनत्व[१] आहे करितां त्यांना मोक्षाविषयीं स्वतंत्रता नाहीं, असें सांगून ब्रह्मच मुख्य उपास्य आहे. असें सांगून त्यांना अद्वैतमार्गी केलें व ते **आचार्यांचे** शिष्य झाले.

नंतर **आचार्य** शिष्यांसह **पश्चिमसमुद्रीं** जाऊन, तेथील कुमतांचें खंडण करून, तसेच **गोकर्णक्षेत्राला** गेले; आणि समुद्राचें स्नान करून **महाबलेश्वराची** पूजा करून त्यांनीं त्यांचा स्तव केला आणि तेथें जे शरण आले त्यांना शिष्य करून, ब्रह्मविद्येचा उपदेश केला.

तेव्हां **आचार्यांचा** पराक्रम पाहून कोणी **हरदत्तनामक**

---

१ परतंत्रता (ईश्वरावांचून सर्वांस परतंत्रता "**सूर्यस्तपतियद्भयात्**" इत्यादि अनेक श्रुतिप्रमाणें आहेत).

ब्राह्मणानें आपले गुरु जे **नीलकंठ** त्यांला हें सर्व वर्तमान सांगितलें. तो ह्मणाला; महाराज, कोणी **शंकराचार्य** या नामेंकरून यति, ज्यानें **मंडन, भट्टपाद** आदिकरून मोठमोठ्या पंडितांना जिंकून त्यांना स्ववश केलें, असा, तो आपल्याल जिंकण्याकरितां येथें येऊन शिवमंदिरांत राहिला आहे. असे शिष्याचें भाषण ऐकून ज्यानें "**अथातो धर्मजिज्ञासा**" या पूर्वमीमांसेवर भाष्य केलें व परम शिवोपासक असा तो **नीलकंठ** थोडें हास्य करून मोठ्या गर्वानें बोलला कीं, ह्या यतीनें जरी समुद्राचें शोषण केलें, अथवा आकाशापासून सूर्याला खालीं आणिलें किंवा आकाशाला वस्त्राचें वेष्टन केलें; ह्मणजे अशीं अशक्य कृत्यें जरी कदाचित् केलीं तरी तो मला जिंकण्याविषयीं समर्थ होणार नाहीं. आतां माझे तर्क परमत जिंकण्याविषयीं कसे समर्थ आहेत, हें आजच हा यति पाहील. असें बोलून अंगाला भस्म लावून कंठामध्यें रुद्राक्षधारण करून शैवशास्त्र ज्यांनीं पूर्ण जाणिलें आहे असे, अनेक शिष्य बरोबर घेऊन तो **नीलकंठ, आचार्यां**कडे निघाला तेव्हां आचार्यांनीं लांबून त्याला पाहिलें.

नंतर तो **आचार्यां**जवळ येऊन अभिवंदनादि प्रकार कांहीं एक न करतां जसें **ब्रह्मसूत्र** होण्याचे पूर्वीं कपिलादिकांनीं आपलीं शास्त्रें स्थापन केलीं त्याप्रमाणें आपले मताचा अभिप्राय स्थापन करूं लागला. इतक्यांत **सुरेश्वरांनीं आचार्यांना** सांगितलें कीं, आपण स्वस्थ असावें. मी याबरोबर वाद करितों. आपण दोघांचा संवाद ऐकावा. असें सांगून तो वाद करण्याविषयीं सज्ज झाला. तेव्हां तो **नीलकंठ** बोलला कीं तुझें वाक्कौशल्य मला माहित आहे. करितां ह्यांनींच बोलावें. असें ऐकून **आचार्य** पुढें झाले व उभयतांचा वाद सुरू झाला.

आचार्यांनीं नीलकंठस्थापित मताचें खंडन केलें. तेव्हां तो नीलकंठ आपल्या मताचें रक्षण करण्याचें सोडून अद्वैत मताचें निराकरण करण्याविषयीं यत्न करूं लागला. तो ह्मणाला; हे स्वामिन्, आपण जो "तत्वमसि" या उपनिषद्वाक्यानें जीवेश्वरांचा अभेद मानितां हें बरोबर नाहीं; कारण जसें तेज व तिमिर यांचें ऐक्य विरुद्धधर्मामुळें संभवत नाहीं त्याप्रमाणें जीवेश्वर यांचाही विरुद्ध धर्म असल्यामुळें, अभेद संभवत नाहीं, याप्रमाणें अनेक उदाहरणें देवून, त्या नीलकंठानें भेद सिद्ध करण्याचा यत्न केला तेव्हां आचार्य ह्मणाले कीं, तुला "तत्वमसि" या वाक्याचा अर्थ समजला नाहीं तो तुला सांगतों ऐक. जीव कार्योपाधि आहे व ईश्वर कारणोपाधि आहे तथापि त्यांचा चिदंश एकच आहे करितां भागलक्षणेनें दोहोंचें ऐक्यच आहे तेथें कोणताही विरोध येत नाहीं. याप्रमाणें शेंकडों प्रमाणें देवून श्रुतीला विरुद्ध असें जें त्याचें मत त्याचें खंडन करून त्यांनीं आपलें मत स्थापित केलें, नंतर त्या नीलकंठानें आपण केलेलें भाष्य व गर्व हीं सर्व सोडून देऊन हरदत्त आदिकरून शिष्यांसह आचार्यांना शरण जाऊन तो त्यांचा शिष्य झाला.

नंतर आचार्य सौराष्ट्र आदिकरून देशांमध्यें आपलें भाष्य विस्तृत करून तद्देशीय पंडितांनीं स्तव केलेले असे आचार्य द्वारकापुरीला गेले, तेथें शंखचक्रादि चिन्हें धारण केलेले, ऊर्ध्व पुंड्र लावून कर्णामध्यें तुलसीदलें घातलेले असे, पांच प्रकारचा भेद मानणारे जे वैष्णव त्यांचें त्यांनीं खंडन करून अभेद स्थापित केला; आणि वैष्णव, शैव, शाक्त, सौर इतक्या मतांचें खंडन करून तेथून उज्जयिनीला गेले. आणि तेथें

१ कांहींचा स्वीकार व कांहींचा त्याग अशी जी जहदजहल्लक्षणा तिनें.

**महाकालेश्वराचें** दर्शन घेऊन त्या देवालयाच्या मंडपामध्येंच थोडी विश्रांती घेण्याकरितां बसून आपण आलों हें वर्तमान **भट्ट भास्कर** कवीला समजविण्याकरितां **पद्मपाद** शिष्यांला त्याजकडे पाठविलें, तेव्हां **पद्मपाद** त्याजकडे जाऊन बोलले कीं हे आर्य, ज्यांची दिगंत कीर्ति असून ज्यांनीं अद्वैत मतस्थापित करून त्याला जीं विरोधी मतें त्यांचें खंडन केलें, व जगताचे गुरु **शंकराचार्य** या नामानें प्रसिद्ध, असे जे ते येथें येऊन श्रीशंकर मंदिरांत राहिले आहेत व त्यांनीं आपल्याला असें सांगितलें आहे कीं तुझें जें कुत्सित मत आहे तें टाकून शुद्धाद्वैत मताला स्वीकार, नाहीं तर वादाला तयार हो. असें भाषण ऐकून तो **भट्ट भास्कर** बोलला कीं, असे किती जरी यति आले तरी माझ्या मताचा लेशही नष्ट होणार नाहीं. माझे वाणीपुढें कोणत्याही वाणीचें पांडित्य चालणार नाहीं, तेव्हां **पद्मपाद** बोलले कीं, असें बोलूं नकोस, कारण दगड फोडण्यास जो समर्थ असतो तो हिरा फोडील असें मात्र होणार नाहीं. असें बोलून गुरुपाशीं आले. नंतर तो **भट्ट भास्करही** **आचार्यांकडे** आला पुढें उभयतांचा वाद जाहाला. त्यांत **भास्करानें** भेद सिद्ध करण्याकरितां अनेक युक्ति व श्रुतिप्रमाणें दिलीं; परंतु **आचार्यांनीं** त्याचे ते श्रुत्यर्थ यथार्थ लावून त्याचे मताचें खंडन करून अभेद स्थापित केला, तेव्हां **भट्ट भास्करही** अद्वैतवादी झाला.

नंतर **आचार्य** सर्व शिष्यांसह **बाल्हिक** देशांत संचारार्थ निघाले. तेव्हां **अर्हत** संज्ञक जैनधर्मी, यांचा व **आचार्यांचा** वाद झाला तेव्हां त्यांस **आचार्यांनीं** युक्तींनेंच जिंकिलें.

नंतर **दरदादिक देश** जिंकून आपल्या भाष्याचें खंडन करणारा जो **श्रीहर्ष** त्याबरोबर अनेक प्रकारें वाद करून

त्याला त्यामध्यें जिंकिलें. नंतर **कामरूप** देशांत जाऊन **अभिनवगुप्त** ह्मणून जो शाक्त, भाष्य करणारा त्यालाही जिंकिलें. तेव्हां त्यानें विचार केला कीं मला जिंकण्याविषयीं कोणही समर्थ नसतां जेव्हां ह्यानीं जिंकिलें तेव्हां हे कोणी तरी देवतांश आहेत यांत संशय नाहीं, ह्मणून हे समोर जिंकले जाणार नाहींत, करितां कांहींतरी कपट केलें पाहिजे.

नंतर मंत्रशास्त्रप्रयोगानें यांचा नाश करावा, असा विचार करून आपला गर्व, शक्ति व भाष्य ह्यांचा परित्याग केल्याचें निमित्त करून तो **आचार्यां**पाशीं शिष्यमिषानें राहिला.

याप्रमाणें उत्तरेकडील देश जिंकून नंतर **अंग, वंग, कलिंग,** इत्यादि देशांत जाऊन तेथील पंडितांस जिंकून **आचार्य गौड** देशांत गेले. तेथील रहाणारे जे **मुरमिश्र** आदिकरून पंडित त्यांना जिंकून **आचार्यांनीं** त्या देशांत आपलें यश विस्तृत केलें. याप्रमाणें अनेक मतांचें खंडन करीत अनेक देशांमध्यें संचार करून अद्वैत मताचें स्थापन केलें व सर्वत्र **दिग्विजय** करून जगतामध्यें शुद्ध अद्वैताचा झेंडा लावून सर्वांस अद्वैत मार्गी केलें.

पूर्वी दिग्विजयाचे वेळीं जेव्हां **अभिनवगुप्ता**ला जिंकलें तेव्हांपासून तो **आचार्यां**च्या वधाविषयीं यत्न करूं लागला आणि आपल्या मांत्रिक विधानानें आभिचारिक[१] कर्म करून त्या योगानें त्यानें **आचार्यांना भगंदर** रोग उत्पन्न केला. जेव्हां तो रोग **आचार्यांना** झाला तेव्हां त्या योगानें देहाला फार पीडा होऊं लागली; व तो रोग इतका बलवान् झाला कीं त्याची चिकित्साही होणें कठीण झालें! तेव्हां त्याची व्यवस्था ह्मणजे नित्य त्याचें प्रक्षालन करणें, त्यावर जो कोणी

---

१ दुसऱ्याचा नाश होण्याकरितां जें कर्म करितात तें.

सांगेल तो उपचार करणें, हे **त्रोटकाचार्य** स्वतः करीत. असा तो भयंकर रोग पाहून एकदां सर्व शिष्यांनीं 'आचार्यांची प्रार्थना केली कीं, महाराज या रोगाची उपेक्षा करणें चांगलें नाहीं करितां एकादा चांगला वैद्य आणून उपचार करावा. आपली शरीरावर ममता नाहीं तेव्हां या रोगपीडेची आपण गणना करित नाहीं हें ठीकच आहे; परंतु आह्मांसर्वांस आपला समागम पाहिजे आहे; तेव्हां जर आपण स्वस्थ असलां तर आह्मीं सर्व स्वस्थ, करितां चिकित्सा करण्याविषयीं आज्ञा असावी. ह्मणजे कोणी तरी वैद्य बलावून आणूं.

याप्रमाणें शिष्यांचें भाषण ऐकून **आचार्य** बोलले कीं, **"प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः"** ह्मणजे भोग जो आहे तो जन्मांतर पापपुण्यापासून उत्पन्न होतो. तो भोगल्यावांचून सुटत नाहीं. याकरितां जरीं त्यावर चिकित्सा केली तरीं तो पूर्वकर्म क्षीण झाल्यावांचून क्षयाला पावत नाहीं. तो आपोआप कर्मक्षयानें नष्ट होईल; ह्मणून चिकित्सा करण्याविषयीं मी इच्छित नाहीं. तेव्हां शिष्य बोलले महाराज, आपल्यासारखे जे समर्थ आहेत, त्यांची जरी देहावर प्रीति नसली तरी ते दुसऱ्याच्या हिताकरितां देह रक्षण करितात. असें शिष्यांचें भाषण ऐकून आचार्य ह्मणाले कीं, ठीक आहे तुमच्या इच्छेप्रमाणें कां होईना ? कोणी तरी चांगला वैद्य आणून उपचार करा. कदाचित् कर्मक्षय झाला असेल तर उपयोग होईल. तेव्हां शिष्यांस आनंद होऊन त्यांनीं ज्यांना शेंकडों रोगांचे अनुभव असून, तसेच अनेक रोग ज्यांनीं बरे केले आहेत, असे मोठमोठे राजवैद्य आणिले, परंतु कांहीं उपयोग होईना. तेव्हां त्यांनीं अनेक देशांत शोध करून आ-

णखीं एक उत्तम राजवैद्य आणिला, कीं जो भूमंडळीं केवल अश्विनीकुमार ह्मटला तरी हरकत नाहीं. नंतर शिष्यांनीं **आचार्यांना** प्रार्थना केली कीं, महाराज, एक उत्तम राजवैद्य आणिले आहेत, करितां जी आज्ञा असेल ती करावी. तेव्हां **आचार्यांनीं** त्या वैद्यबुवांना आपला रोग दाखवून योग्य चिकित्सा करण्याविषयीं सांगितलें, आणि माझे मतानें पूर्वकर्मांचा क्षय झाल्यावांचून हा रोग बरा होणारा नाहीं. असें असतां शिष्यमंडळीच्या आग्रहास्तव चिकित्सा करावी, असें मनांत आणिलें. असें त्यास सांगून इतके दिवस ह्याची उपेक्षा कां झाली त्याचेंही हेंच कारण असेंहि सांगितलें. नंतर त्या वैद्यबुवांनीं अनेक प्रकारें उपचार केले तरीं त्यांपासून कांहीं उपयोग झाला नाहीं. असें पाहून **आचार्य** वैद्यबुवांस ह्मणाले वैद्यराज, आपण आपल्या स्थानीं जावें, कारण इकडे येऊन बरेच दिवस झाले. त्यांत आपण राजाचे आश्रित आहां. तेव्हां जर कदाचित् तेथें आपली गरज लागली तर विनाकारण बोभाट होऊन आपला आश्रयही कदाचित् नाहींसा होईल. बरें तिकडे दुर्लक्ष करून येथें राहिलें असतां विशेष उपयोग होतो, असें आहे तर मग ठीकच आहे; परंतु तसा उपयोग आहे असें नाहीं. मग उगाच कालक्षेप कां? असें सांगून, त्या वैद्यबुवांची रवानगी केली. नंतर **आचार्यांनीं** हा रोग औषधीपासून बरा होत नाहीं, असें समजून **शंकराचें** स्मरण केलें. तेव्हां **शंकरानीं** अश्विनीकुमारांना आज्ञा केल्यावरून ते ब्राह्मणवेष धारण करून **आचार्यांकडे** आले. आणि निदान करून सांगितलें कीं, हे **यतिवर्य**, हा आपला रोग कोणी तरी आभिचारकर्म केल्यामुळें प्राप्त झाला आहे; करितां हा चिकित्स्य[1] नाहीं. याचा उपशम उलट मांत्रिक

---

१ औषध देण्यास योग्य.

योग केला असतां होईल, असें सांगून ते स्वस्थानीं गेले. नंतर मंत्रशास्त्रांत परम निपुण असे जे **पद्मपाद** त्यांनीं **आचार्य** नको ह्मणत असतां गुरूचा द्रोह करणारा जो **अभिनवगुप्त** त्याचें कर्म सहन न होऊन त्याला आभिचारादिक कर्मांच्या योगानें तो भगंदर रोग उत्पन्न केला; नंतर त्या रोगानेंच तो पुढें मरण पावला; व **आचार्यां**ची प्रकृति चांगली झाली.

एकदां **आचार्य,** गंगेच्या वाळवंटांत प्रवाहावरून येणारा जो शीतवायु त्यानें गार अशा स्थानीं ब्रह्मध्यान करीत असतां, एकाएकीं, एका हातांत स्वच्छ उदकानें भरलेला तो कमंडलु, व एका हातांत ती रुद्राक्षांची माला घेऊन एकसारखा जप चालला आहे; अशी ती तेजःपुंज व भव्य, गौडपादांची मूर्ति पाहून **आचार्यांनीं** उठून त्यांस वंदन केलें. तेव्हां **गौडपादांनीं** आशीर्वाद देऊन उभयतां आसनावर बसले; नंतर सर्व कुशल-वृत्त विचारून **गौडपाद** बोलले कीं, **गोविंदपादानें** तुझी फार किर्ती सांगितली ह्मणून ती प्रत्यक्ष पहावी; व ब्रह्मसूत्रा-वरील भाष्य पहावें ह्मणून मी येथें आलों आहें, तर तें भाष्य दाखवावें. तेव्हां **आचार्यांनीं** परमगुरूचा स्तव करून त्याचे-पुढें संपूर्ण भाष्य पठन केलें, व आपण केलेले सर्व ग्रंथ दाखविले. आणि सांगितलें कीं, आपल्या कृपादृष्टीनें जो युक्त आहे. त्याला कांहींही दुर्लभ नाहीं कारण आपल्यासारख्यांचा कृपाकटाक्ष, मूकाला देखील वाग्मी, मंद बुद्धीला पंडित, पाप्याला पुण्यवान्, असा एका क्षणमात्रानें करण्याविषयीं समर्थ आहे. नंतर **मांडूक्यभाष्य** व **गौडपादीय कारिकाभाष्य,** इत्यादि भाष्येंही दाखविलीं. तेव्हां गौडपाद बोलले कीं, या तुझ्या भाष्यांनीं मला फार संतोष झाला; ह्याकरितां तो संतोषच तुला वर मागण्याविषयीं प्रेरणा करितो, करितां इच्छितवर माग. तेव्हां

**आचार्य** ह्मणाले कीं, साक्षात् विष्णुस्वरूपी असे जे आपण त्यांचें मला आज दर्शन झाल्यानंतर मग इश्वर तो कोणता राहिला ? कोणताच नाहीं ! तथापि आपली इच्छा आहे तर मला निरंतर ब्रह्मचिंतन घडावें, असा वर असावा. याप्रमाणें **आचार्यांचें** भापण ऐकून तथास्तु असें ह्मणून **गौडपादांनीं** यदृच्छेनें गमन केलें.

एकदां काशी क्षेत्रामध्यें–**आचार्य** प्रातःकाळीं उठून सर्व शिष्यांसह गंगेवर जाऊन स्नानादि नित्य उरकून ब्रह्माचें निदिध्यसन करून शिष्यांना पढवीत असतां अशी वार्ता ऐकिली कीं, **काश्मीरदेशामध्यें** एक **शारदेचें** स्थान आहे, तेथें **सर्वज्ञपीठ** आहे; परंतु जो सर्वज्ञ आहे तोच त्यावर चढूं शकेल. दुसरा चढण्याविषयीं समर्थ नाहीं. त्या देवालयाला मोठा मंडप असून त्याला चार दरवाजे आहेत, त्यांत दक्षिण दरवाजा नेहमीं बंद आहे; कारण प्रत्येक दिशेकडून विद्वान् येऊन त्यांनीं परीक्षा दिली; व तीन दिशेचे दरवाजे उघडले. आतां फक्त दक्षिण दरवाजा मात्र बंद आहे, तो उघडण्याविषयीं कोणी समर्थ नाहीं. असें ऐकल्याबरोबर तें द्वार उघडावें, व सर्वज्ञ पीठावर आरोहण करावें,- असें मनांत आणून **आचार्य** सर्व शिष्यांसह निघाले, ते त्या स्थानीं आले. तेव्हां द्वाराजवळ जातांच त्यांना प्रतिबंध करून सांगितलें कीं, येथें परीक्षा देऊन मग आंत जावें लागतें, करितां परीक्षा देऊन मग जावें. असें ऐकल्याबरोबर **आचार्य** ह्मणाले ज्या कोणाला प्रश्न करणें असेल त्यांनीं प्रश्न करावा, ह्मणजे मी त्याचें उत्तर देतों. तेव्हां प्रत्येक मतांत त्यांची परीक्षा झाली. त्यांत सर्व मतांचें मर्म बरोबर सांगितल्यामुळें व सर्व शास्त्रांत उत्तरें दिल्यामुळें सर्वांस आनंद होऊन त्यांनीं **आचार्यांची** पूजा केली आणि दरवाजा उघडून दिला. तेव्हां

**आचार्य** आंत जाऊन पद्मपाद शिष्याचा हात धरून त्या विद्याभद्रासनावर चढूं लागले, तेव्हां आकाशवाणी झाली कीं, तूं सर्वज्ञ आहेस यांत संशय नाहीं, कारण ती परीक्षा पूर्वींच झाली आहे. जर सर्वज्ञता नसती तर ब्रह्मदेवाचा अवतार असे जे **विश्वरूप** (मंडनमिश्र) त्यांना कसें जिंकिलें असतें ? तेव्हां आतां त्याबद्दल विचार नाहीं. परंतु परिशुद्धता आहे किंवा नाहीं, ह्याचा विचार करण्याजोगा आहे; करितां थोडा वेळ थांबावें. अशी त्वरा करून साहस करणें उपयोगी नाहीं. आपण यतिधर्मामध्यें असतांना अनेक अंगनांचा उपभोग घेतला तेव्हां आपण शुद्ध नाहीं ! व या पदावरोहणाला जशी सर्वज्ञता लागते, तशी शुद्धताही पाहिजे. असा दोषारोप केला तेव्हां **आचार्य** ह्मणाले कीं,

**नास्मिञ्छरीरे कृतकिल्बिषोहं जन्मप्रभृत्यंब नसंदिदेहम्।**
**विधायिदेहान्तरसंश्रयाद्यं न तेन लिप्येत हि कर्मणान्यः॥**

**अर्थ**—हे अंब जन्मप्रभृति या शरीरामध्यें मी कोणचेंही पातक केलें नाहीं; ह्मणून मला मुळींच संशय नाहीं. आतां देहान्तरानें जें कांहीं केलें त्या कर्मापासून हा देह लिप्त होत नाहीं करितां ही जी तुह्मीं शंका केली ती बरोबर नाहीं. कारण अन्य देहानें केलेलें कर्म अन्य देहाला लागून नाहीं, असें लोकप्रसिद्ध असून शास्त्रसिद्धही आहे; व तें **सरस्वती**ला मान्य असून शिवाय पंडितांनाही मान्य आहे. असें सांगून त्यांच्या सर्व शंकांचें त्यांनीं समाधान करून त्या **विद्यापीठा**वर आरोहण केलें. त्या कालीं देवांनीं दुंदुभी वाजवून पुष्पवृष्टि केली. पूर्वीं जसे **याज्ञवल्क्य** सर्वज्ञतेनें शोभले त्याप्रमाणें **आचार्य** त्या पीठावर शोभूं लागले.

याप्रमाणें पीठारोहण केल्यानंतर **शृंगेरी** आदिकरून जीं स्थानें तेथें **सुरेश्वरादि** शिष्यांची स्थापना करून कांहीं शिष्य

येऊन **बद्रिकाश्रमाला** गेले आणि तेथें कांहीं दिवस वास करून **पातंजलमताचे** लोकांना आपलें भाष्य पढवून त्यांना अद्वैतमार्गी केलें. इतक्यांत **आचार्यां**चे आयुष्याची मर्यादा नजिक आल्यामुळें बत्तीस वर्षे पूर्ण होण्यास थोडे दिवस राहिले. नंतर हिमालयावर **केदार** ह्मणून स्थान आहे त्या स्थानाला गेले. तेथें अतिशय थंडी असल्यामुळें सर्व शिष्यांस मोठें दुःख होऊं लागलें; तेव्हां **आचार्यांनीं शंकरा**ची प्रार्थना करून एक उष्णोदकाचा झरा उत्पन्न केला. तो चमत्कार अद्यापि आहे. याप्रमाणें कलिकल्मषनाशक अशीं चरित्रें करून आपल्या निर्मल यशानें हें जगत्पूर्ण करून संपूर्ण जगताचे गुरु व **आचार्य**, तसेच, साक्षात् शंकराचा अवतार असे जे **श्रीमच्छंकराचार्य** ते तेथें कांहीं दिवस राहिले.

याप्रमाणें संपूर्ण देवकार्य झाल्यानंतर **आचार्यांना** कैलासशिखरीं नेण्याकरितां **ब्रह्मदेवा**दिदेव तसेच **ऋषि, गंधर्व**, इत्यादि अनेक देव तेथें आले. तेव्हां तेथें सर्व आकाश विमानांनीं व्याप्त झालें. नंतर त्या सर्वांनीं **आचार्यां**ची पूजा केली, आणि स्तव करून प्रार्थना केली कीं, हे **शंकर**, हे **आदिदेव**, हे **कामदहन**, हे **त्रिनयन**, आपण ज्या कार्याकरितां या भूमीवर अवतार धारण केलात तें कार्य तर झालें; करितां आतां आह्मांला कैलासीं येऊन सनाथ करावें. अशी देवांची वाणी ऐकून **शंकरांनीं** ती मान्य करून कैलासीं जावें, असें मनांत आणितांच संपूर्ण शिवगणांनीं युक्त असे **नंदिकेश्वर** येऊन पुढें उभे राहिले, तेव्हां **ब्रह्मदेवांनीं** हात देतांच तो हात धरून **श्रीशंकर** त्या स्वीयवाहनावर आरूढ होऊन **इंद्रा**दिदेवांसहवर्तमान वंदीजनाची तशीच संपूर्ण देवांची स्तुति श्रवण करीत करीत, स्वारी स्वकीयस्थान जें कैलास त्या कैला-

साला गेली. त्या वेळीं देवांनीं दुंदुभी वाजविल्या, गंधर्व गायन करूं लागले. याप्रमाणें **श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य श्रीमच्छंकराचार्य** संपूर्ण जगतामध्यें अद्वैतमार्ग स्थापन करुन आपल्या वयाच्या बत्तिसावे वर्षी कैलासास गेले. ही कथा जो श्रवण करील तो या भवसमुद्रापासून मुक्त होऊन अन्तीं **श्री शिव**पदाला जाईल.

---

## आनंदगिरीकृतशंकरविजयाचें सार.

आचार्यांचे शिष्य **आनंदगिरी** यांणीं एक **शंकरविजय** ग्रंथ केला आहे त्याचीं प्रकरणें चवऱ्याहत्तर आहेत. त्यांत माधवकृत शंकरविजयापेक्षां बराच भाग निराळा आहे तो समजण्याकरितां प्रकर्णांतील तात्पर्य काय हें सांगणें अवश्य आहे करितां तें खालीं देतों.

प्रथम प्रकरणांत आचार्यांनीं केलेल्या ठळक गोष्टींचें थोडक्यांत वर्णन आहे. दुसऱ्यांत नानाप्रकारचे उपासनाभेद होऊन वैदिक मार्ग नष्ट झाला आहे असें नारदवचन ऐकून ब्रह्मदेवानें शंकराकडे जाऊन प्रार्थना केली; तेव्हां शंकरानीं मी **शंकराचार्य** या नांवानें अवतार घेऊन तुमचें कार्य करितों असें सांगितलें; नंतर शंकर चिदंबर पुरांत **आकाशलिंग** या नामेंकरून प्रगट झाले. तेथें **सर्वज्ञ** या नामेंकरून ब्राह्मण होता त्याची स्त्री **कामाक्षी** त्यांनीं चिदंबेश्वराची आराधना केल्यामुळें त्यांस एक कन्या झाली. तिचा विवाह आठव्या वर्षी **विश्वजित्** या नामें करून एका ब्राह्मणाबरोबर केला. ती नेहमीं आकाशात्मक जो शिव त्याचें सेवन करीत असे. अशी उत्तम शीलादिकांनीं युक्त होती तरी विश्वजित् तिचा त्याग करून निघून गेला आणि अरण्यांत तप करूं लागला.

त्या दिवसापासून तर तिनें शंकराचे सेवेवांचून कांहींच न करितां केवल शंकराला संतुष्ट केलें. नंतर शंकरांनीं तिच्या मुखांतून प्रवेश करून तिच्या उदरामध्यें आपलें तेज प्रगट केलें. तेव्हां इतर लोकांना मोठा विस्मय झाला. नंतर बाप आदिकरून सर्व लोक तिची सेवा करूं लागले आणि तिसऱ्या महिन्यापासून तिचे सर्व संस्कार केले. नंतर दाहाव्या महिन्यांत शंकराचार्य या नामेंकरून शंकर प्रगट झाले त्या कालीं देवांनीं पुष्पवृष्टी केली व दुंदुभी वाजविल्या आणि मोठा आनंद केला.

तिसऱ्या प्रकरणांत शंकराचार्य बाल्यावस्थेंतच मागध भाषा जाणूं लागले; नंतर तिसऱ्यावर्षी त्यांचें चौल झालें पांचवे वर्षी ब्राह्मणांनीं मौंजीबंधन केलें; नंतर आचार्य गुरूकडे जाऊन सर्व विद्या शिकले; व अनेक शिष्य करून त्यांस आत्मविद्या सांगितली; आणि आठव्या वर्षी श्रीमद्गोविंदयतीन्द्रापासून उपदेश घेऊन त्यांनीं परमहंस आश्रम स्वीकारिला.

चतुर्थ प्रकरणांत संन्यास घेऊन सर्व प्रपंचाचा त्याग करून व्याससूत्रावर भाष्य केलें आणि पद्मपाद, हस्तामलक, सत्पाणी, चिद्विलास, ज्ञानकंद, विष्णुगुप्त, शुद्धकीर्ति, भानुमरीचि, कृष्णदर्शन, बुद्धिवृद्धि, विरंचिपाद, शुद्धानन्द, आनन्दगिरी इत्यादि शिष्यांसह प्रदक्षिण मार्गानें मध्यार्जुनीं जाऊन मध्यार्जुनाची प्रार्थना केली कीं, अद्वैतमत सत्य आहे किंवा द्वैतमत सत्य आहे, याचा निवाडा करावा; तेव्हां शंकरांनीं त्या लिंगापासून स्वस्वरूपानें प्रगट होऊन दक्षिणहात वर करून सांगितलें कीं अद्वैत सत्य आहे; नंतर अदृश्य झाले. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला; तेव्हां त्या प्रांतांतील सर्व ब्राह्मणांस अद्वैतमतानुयायी करून सर्व शिष्यांसह रामेश्वरीं

गेले; तेथें श्रीरामस्थापित रामेश्वर नामक महादेवाची गंगोदकादि उपचारांनीं पूजा करून त्यांनीं तेथेंच दोन महिने वास केला. आणि त्रिशूलादि धारण करणारे जे शैव त्यांच्या मताचें खंडण केलें.

पंचम प्रकरणांत **परमतकालानल** नामक आराध्य जातीय शैवास आचार्यांनीं जिंकून आपला शिष्य केलें.

नंतर सहा, सात, व आठ, यांत आचार्य **अनंतशयन**स्थलीं गेले. तेथें देवाचें दर्शन करून एकमासपर्यंत राहिले. आणि वैष्णवमती **विष्णुशर्मा** आदिकरून यांस जिंकून आपल्या मतांत आणिलें.

नवव्या प्रकरणांत वैखानसमती जो **व्यासदास** त्याचें खंडण केलें.

दहाव्या प्रकरणांत मंत्रहीन वैष्णवमताभिमानी जो **विष्णुदासा**ग्रगण्य त्याचें खंडण करून त्यास पांच पूजा व तितक्या उपासना सांगून आपला शिष्य केलें.

अकराव्या प्रकरणांत आचार्य अनंतशयनाहून निघून कार्तिकस्वामिक्षेत्रीं सर्व शिष्यांसह आले; आणि **कुमारधारे**मध्यें स्नान करून कार्तिकस्वामीची पूजा केली; आणि तेथें **हैरण्यगर्भ**मताचें खंडण केलें.

बाराव्या प्रकरणांत अग्नित्रयोपासकांचें खण्डण केलें.

तेराव्या प्रकरणांत सौरमतवादी जे दिवाकरप्रभृति त्यांचें खंडण केलें.

चवदाव्या प्रकरणांत **गणवरपुरांत** जाऊन गणपआश्रमीं गेले आणि तेथें कौमुदीनदीमध्यें स्नान करून विघ्नेश गणपतीचें पूजन करून एकमासपर्यंत राहिले. तेथील नित्यक्रम असा होता कीं पद्मपाद आदिकरून शिष्यांनीं भिक्षा आणून गुरूला अर्पण

करावी आणि मग सायंकाळीं ब्रह्मविचारकरीत सर्वांनीं गुरूंचा स्तव करित बसावें.

पंधराव्या प्रकरणापासून अनुक्रमें अठरा प्रकरणापर्यंत **महागणपतिमत, हरिद्रागणपतिमत, उच्छिष्टगणपतिमत,** व **नवनीतस्वर्णसंतानगणपतिमत,** इतक्यांचें खंडण केलें आहे.

एकुणीस प्रकरणीं आचार्य शिष्यांसह **भवानीनगरांत** जाऊन तेथें एकमासपर्यंत वास करून तत्रस्थ शक्तिमतानुयायी यांचें खंडण करून अद्वैतमती केलें.

विसाव्या प्रकरणांत आचार्य भवानीनगरांत असतां आसमंत देशांतून व कुवलयपुरापासून कांहीं महालक्ष्मीमताभिमानी आले आणि आपलें मत सत्य आहे असें ह्मणूं लागले, तेव्हां आचार्यांनीं समर्पक उत्तरांनीं त्यांचें खण्डण केलें व शुद्धाद्वैतमार्गी करून आपले शिष्य केले.

एकविसाव्या प्रकरणांत **शारदोपासकांचें** खण्डण केलें.

बेविसाव्यांत **वामाचारमताचें** निरसन केलें.

तेविसाव्यांत तेथून आचार्य उज्जयिनीला आले आणि दोन महिने मुक्काम करून त्यांनीं **कापालिकमताचें** खंडण केलें.

चोविसाव्यांत **कापालिक, चार्वाक, सौगत, क्षपणक, जैन, बौद्ध,** इत्यादिकांचीं मतें एकदम खण्डण केलीं.

पंचविसाव्यांत पुनः चार्वाक मत खंडित केलें.

सव्वीस सत्तावीस अठ्ठावीस याप्रकरणीं अनुक्रमें बौद्ध **सौगत,** आणि जैन इत्यादिकांचीं मतें सप्रमाणानें खंडित करून शुद्धाद्वैतमताची स्थापना करून सर्वांना पांच उपासना देवून आपले शिष्य केलें.

एकोणतिसाव्यांत आचार्य शिष्यांसह वायव्य दिशेस असणारें जें पट्टणपुर तेथें गेले आणि एकवीस दिवस वास केला व

तेथील लोक आचारभ्रष्ट पाहून त्यांचे **मल्लारीमताचें** खंडण केलें आणि पंचपूजा करवून त्यांस आपले मतानुयायी केलें.

तिसाव्या प्रकरणांत तेथून पश्चिमदिशेस **मरुंध** ह्मणून नगर आहे तेथें जाऊन विष्वक्सेनमताचें[1] खंडण केलें आणि सर्वांस अद्वैतमती केलें; याप्रमाणें विष्वक्सेनमताचें खंडन केल्यानंतर एकतिसावे प्रकरणांत विष्णुसुत आदिकरून जे मन्मथमतानुयायी त्यांचें खंडन केलें; नंतर बत्तिसाव्यांत आचार्य शिष्यांसह मागधपुराला गेले तेथें यक्षालय नामक प्रसिद्ध देवस्थान आहे तेथें पंधरा दिवस वास करून कौबेरमताचें खंडन केलें; नंतर तेहतिसावे प्रकरणांत **आचार्य** शिष्यांसह प्रसिद्ध जें इंद्रप्रस्थपुर तेथें जाऊन ऐंद्रमताचा नाश करून त्यांस पंचोपास्य करून आपले शिष्य केलें. चवतिसाव्यांत **आचार्य** यमप्रस्थपुरींत जाऊन एकमासपर्यंत वास केला आणि यममताचें खंडण केलें. पसतिसाव्या प्रकरणीं गुरुशिष्यांसह पुण्यकारक असें जें प्रसिद्ध प्रयागक्षेत्र त्या ठिकाणीं येऊन वरुणमताचें खण्डण केलें. पुढें वायुमती आले त्यांचें खण्डण केलें तसेंच भूमि, उदक इत्यादिमतांचें खण्डण केलें. छत्तिसाव्यांत शून्यमतवाद्यांचें निराकरण केलें. सदतिसाव्यांत वराहमताचें खंडण. अडतिसाव्यांत चतुर्दश लोकांची उपासना करणाऱ्यांचे मताचें खंडण केलें. एकुणचाळिसप्रकरणांत गुणमताचें खंडण. चाळिसाव्या प्रकरणीं सांख्यमताचें खंडण केलें. एकेचाळीस प्रकरणांत योगवेत्ते जे कापिल त्यांचें खंडण. बेचाळिसाव्यांत पीलुवादी जे कार्तिक त्यांचें खंडण केलें. त्रेचाळिसाव्यांत **आचार्य** शिष्यांसह काशीला गेले; तेथें तीन महिनेपर्यंत वास केला; तितक्यांत जे वादी आले त्यांचें यथायोग्य खंडण केलें. त्यांत कर्मच प्रधान असें ह्मणणा-

---

१ वैकुंठसेनाधिपति. ( कलकत्ता पुस्तक पत्र १६४ ओ० १६.)

राचे मताचें **आचार्यांनीं** निरसन केलें. चव्वेचाळिसांत चंद्रमताचें खंडण केलें. पंचेचाळिसांत भौमादि ग्रहमताचें खंडण, शेचाळिसाव्यांत क्षपणकमताचें खंडण; सत्तेचाळीस प्रकरणीं पितृमताचें निरसन, अठ्ठेचाळिसाव्यांत शेषमत व गरुडमत या दोहोंचें खण्डण केलें, एकुणपन्नासाव्यांत सिद्धमताचें खंडण, पन्नासाव्या प्रकरणांत गंधर्वमताचें निरसन केलें; एकावन्नाव्यांत भूत वेतालादि मतांचें निरसन केलें. बावन्नाव्या प्रकरणीं, या प्रमाणें सर्वमतांचें निरसन करून **आचार्य** एकेदिवशीं काशीमध्यें मनकर्णिकेवर सर्व शिष्यांनीं वेष्टित असे, परमगुरु जे **श्रीशंकराचार्य** त्यांना पाहून वृद्ध ब्राह्मणाचा वेष धारण करून **व्यासांनीं** आपण कोण असा प्रश्न केला; तेव्हां शिष्यांनीं उत्तरें दिलीं कीं, हे आमचे शंकर या नामेंकरून गुरु आहेत. ज्यांनीं व्याससूत्रावर भाष्य केलें आणि अद्वैतार्थबोधानें सर्व शिष्यांस विवेकी केलें ते हे गंगातीरीं शोभताहेत. नंतर तो वृद्ध ब्राह्मण **आचार्यां**पाशीं गेला आणि प्रश्न केला कीं हे शिष्य ह्मणतात कीं तूं व्याससूत्रावर भाष्य केलें करितां मी विचारितों कीं "तदंतरप्रतिपत्तौ रंहतिसंपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाभ्यामिति" या सूत्राचा अर्थ सांग. तेव्हां **आचार्यांनीं** त्याचा अर्थ सांगून शिवाय त्यासंबंधीं उभयतांचा वाद झाला त्यांत अखेर शिष्यांकडून त्यांला घालिवलें तेव्हां परमशिष्य **पद्मपाद** बोलले कीं आतां जो वृद्धब्राह्मण वाद करीत होता ते साक्षात् व्यास आहेत, तेव्हां **आचार्य** बोलले कीं मी जो सूत्राचा अर्थ केला तो जर यथार्थ असेल तर व्यास साक्षात् स्वस्वरूपानें दर्शन देतील. तेव्हां **व्यास** प्रगट होऊन गुरूंनीं वंदन केल्यानंतर **आचार्यांचा** स्तव केला आणि सांगितलें कीं माझे सूत्राचें तात्पर्य तूंच जाणिलें तस्मात् तूं आचार्य आहेस. आतां सर्व पृथ्वीवर संचार करून शिष्यांस

भाष्याचा उपदेश करून त्यांना अद्वैतमार्गी करावेत. त्रेपन्नाव्या प्रकरणीं **आचार्यांनीं** आयुष्य पूर्ण झाल्यामुळें मी आतां जाणार अशी इच्छा दर्शविल्यावरून **व्यासांनीं** सांगितलें कीं अजून पुष्कळ कृत्यें राहिलीं आहेत व तूं गेल्यानंतर या भाष्याची प्रसिद्धी कशी होईल. तेव्हां **व्यासांनीं ब्रह्मदेवाचें** स्मरण केल्यावरून ते तेथें प्रगट झाले आणि गुरूंला ह्मणाले कीं तूं साक्षात् कैलासनायक आहेस आणि हा अवतार दुष्टाचार विनाशार्थ आहे; करितां आपल्या इच्छेप्रमाणें येथें राहून नंतर कैलासीं जावें. चौपन्नाव्यांत याप्रमाणें **ब्रह्मदेव व व्यास** यांणीं बोलून गंगोदकानें **आचार्यांना** प्रोक्षण करून आशीर्वाद दिला कीं तुला वहुत वर्षे आयुष्य असो. मग त्या उभयतांला वंदन केल्यानंतर ते अंतर्धान पावले. पंचावन्न प्रकरणीं नंतर **आचार्य** उत्तर मार्गानें, **अमरलिंग, केदारलिंग, कुरुक्षेत्र,** इत्यादि स्थलें पाहून **वदरीनारायणाला** गेले, तेथें अत्यंत थंडपाणी पाहून प्रार्थना केली कीं नारायणा उष्णोदक पाहिजे. तेव्हां नारायणांनीं तेथें उष्ण तीर्थ उत्पन्न केलें. नंतर सर्वांनीं स्नानें केलीं व **आचार्यांचा** स्तव केला. मग द्वारकेस जाऊन अयोध्येला आले. तेथून गयेला जाऊन जगन्नाथाला गेले तेथून मल्लिकार्जुनीं जाऊन तेथें महिनाभर वास केला तेथें असें ऐकिलें कीं ज्यांनीं सर्व जैनांचा नाश केला असे भट्टपादाचार्य ते रुद्रपुरामध्यें विजयी व निर्भय असे आहेत तें ऐकून आचार्य त्यांजकडे जाण्याकरितां निघाले. त्यापूर्वीं दाहा दिवस भट्टाचार्य यांणीं सर्व जैनांचा नाश केला व जैनगुरूपासून विद्या शिकून अखेर त्यांचा नाश केल्यामुळें प्रायश्चित्ताचा विचार करून होमानें हा देह दग्ध करावा असा विचार करून एकांतस्थलीं तें प्रायश्चित्त करण्याकरितां कारीष पर्वतावर जाऊन आ-

रंभ केला इतक्यांत आचार्य जाऊन भेटले आणि ह्मणाले, हे भट्टपाद अज्ञानानें तुला ही अवस्था प्राप्त झाली. कारण "हंता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतम्॥ उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते" ह्म० मारणारा जर मी मारणारा असें मानतो आणि मरणार मेलों असें मानतो तर ते दोघेही कांहीं जाणत नाहींत कारण तो मारीत नाहीं व तो मरत नाहीं. अशी श्रुति आहे असें आचार्यांचें भाषण ऐकून गुडघ्यांपर्यंत ज्याचे पाय दग्ध झाले आहेत असे भट्टपाद आचार्यांना न ओळखून बोलले कीं माझ्या जागृतकालीं आपण आलां नाहीं; नवी व जैनमताभिमानी असा कशाकरितां आलां? तेव्हां आचार्य बोलले मी बुद्ध नव्हें; मला अद्वैतमार्गी शंकराचार्य ह्मणतात. मी वादाकरितां आलों आहें; तेव्हां भट्टपाद बोलले कीं माझे भगिनीचा भर्त्ता मंडणमिश्र या नामेंकरून सर्वज्ञ व सर्व विद्येमध्यें निष्णात आहे त्याच्याशीं वाद कर; मी आतां परलोकीं जातों, आतां तुमच्या दर्शनानें मी कृतार्थ झालों; नंतर ब्रह्माचें ध्यान करून भट्टपाद त्यावर आरूढ झाले. नंतर आचार्य तत्रस्थांना शुद्ध अद्वैतमार्गी करून निघाले. छपन्नाव्यांत आचार्य सर्व शिष्यांसह उत्तर मार्गानें जाऊन हस्तनापुरचे आग्नेय दिशेस विद्यालय ह्मणून अति प्रसिद्ध नगर आहे, तेथें गेले आणि तेथें एका बागांत राहिले. इकडे पितृतिथि असल्यामुळें मंडणमिश्रांनीं पितृस्थानीं वेदव्यासांना बसवून विश्वेदेवस्थानीं व्यासाप्रमाणें ब्राह्मण नसल्यामुळें शालिग्राम ठेवून पूजा करितो आहे; इतक्यांत आचार्यांनीं नगरांत येऊन विचारिलें कीं मंडणाचा आश्रम कोठें आहे? तेव्हां तेथील स्त्रियांनीं सांगितलें कीं, ज्याचे द्वारांत मैना आदिकरून पक्षी नानाप्रकारचे शास्त्रीयवाद करिताहेत तें मंडणमिश्राचें घर असें समजावें; तें भाषण ऐकून आचार्य आश्चर्य करीत मंडणमिश्राच्या घराप्रत आले—तेव्हां

तो, द्वार बंदकनरू श्राद्ध करीत होता; आचार्य आकाशमार्गानें आंत गेले; तेव्हां त्यांचीं प्रश्नोत्तरें होऊन पुढें वाद करण्याचें ठरलें व त्याची स्त्री हा सरस्वतीचा अवतार होता; तिला मध्यस्थ करून वाद झाला, त्यांत असें ठरलें कीं, जो ज्यास जिंकील त्याणें तो आश्रम सोडून जिंकणाराचा आश्रम स्वीकारावा; त्याप्रमाणें आचार्योनीं त्या मंडणमिश्राला जिंकिलें तेव्हां त्याणें आश्रम घेऊन आचार्योचें शिष्यत्व स्वीकारिलें. मंडणमिश्रांनीं संन्यास घेतल्यामुळें ती सरस्वती गगनमार्गें निघाली; तेव्हां आचार्योच्या प्रार्थनेवरून ती तशीच तेथें राहून तिनें वादाला आरंभ केला. सत्तावन्न प्रकरणांत सरस्वतीचा आणि आचार्योचा वाद झाला; तेव्हां सर्व शास्त्रांत आचार्योनीं तिला कुंठित केलें; परंतु तिणें कामशास्त्राविषयीं प्रश्न केला तेव्हां त्याचा अनुभव नसल्यामुळें आचार्य स्तब्ध राहिले. अठ्ठावन्न प्रकरणीं आचार्यानीं सहामहिन्यांची मुदत घेऊन कामशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां आपला देह वृक्षकोटरांत ठेवून व शिष्यांस रक्षणाविषयीं सांगून आपण एका चितेवर राजदेह पाहून त्याच्या ब्रह्मरंध्रानें त्यांनीं शरीरांत प्रवेश केला तेव्हां राजा सजीव होऊन आपल्या घरीं मोठ्या थाटानें आला. नंतर स्त्रियांशीं रममाण होऊं लागला. तेव्हां त्यांत जी श्रेष्ठ स्त्री होती तिनें हा देह मात्र राजाचा आहे जीव अन्य कोणी आहे; असें जाणून सेवकांस आज्ञा केली कीं पन्नास कोशांत जितकीं शवें सांपडतील तितकीं एकदम जाळून टाकावीत. एकुणसाठाव्या प्रकरणांत ते दूत शोध करीत असतां त्यांना आचार्योचा देह सांपडला तेव्हां त्यांणीं तो देह चितेवर ठेवून त्याला अग्नि लाविला इतक्यांत सर्व शिष्य नगरांत जाऊन राजाची प्रार्थना केली कीं, आपण राजे नव्हत आचार्य अहां तेव्हां आपण आपल्या पूर्वदेहीं चलावें. साठाव्यांत शिष्यांनीं बोध केल्यावरून आचार्य तो

देह सभेमध्यें ठेवून लिंग शरीरानें इकडे येतात तों स्वकीय देह दग्ध होत आहे तेव्हां नृसिंहाचा स्तव केल्यावरून ते साक्षात् प्रगट होऊन अग्नीपासून तो देह काढून त्यांनीं आचार्याला दिला आणि त्यांना सजीव करून सर्व लोकांला जिंक असा आशीर्वाद देऊन गुप्त झाले.

एकसष्टावे प्रकरणांत आचार्य शिष्यांसह मंडणमिश्राचे नगरांत येऊन सरस्वतीबरोबर वाद करून तिला जिंकिलें; तेव्हां तूं सर्वज्ञ आहेस असें ह्मणून तिनें स्तुति केली. बासष्टाव्यांत आचार्यांनीं सरस्वतीला मंत्रानें बद्ध करून आकाशमार्गानें शृंगीपुरासमीप तुंगभद्रानदीकाठीं एकचक्र करून तिची स्थापना केली; आणि एक विद्यापीठ[2] स्थापून तेथें भारती सांप्रदाय देऊन आपल्या शिष्यांची स्थापना केली. तेथील परंपरा अनुक्रमानें लिहिली आहे ती अशी; मूळ नारायण, पुढें ब्रह्मदेव नंतर वसिष्ठ, शक्ति, पराशर, व्यास, शुक, गौडपाद, गोविंदयोगींद्र नंतर शंकराचार्य त्यांचे शिष्य पद्मपाद, हस्तामलक, तोटक इत्यादि झाले. त्रेसष्ट प्रकरणीं नंतर आचार्य बारा वर्षें शृंगपुरीं राहून अनेक शिष्यांना शुद्धाद्वैतविद्या पढवून सुरेश्वराचार्य नामेंकरून जो मुख्य शिष्य त्याची तेथें स्थापना केली. नंतर अहोबलस्थलीं जाऊन तेथून कैवल्यगिरीला गेले. तेथून कांचीला गेले; तेथें अंबरेश ह्मणून श्रीमहादेवलिंग आहे. तेथें एकमास वास्तव्य करून शिवकांचीपट्टण निर्माण करून त्या जवळच ब्रह्मयज्ञापासून उत्पन्न जो विष्णु तेथें विष्णुकांचीपट्टण निर्माण केलें; आणि तेथील व्यवस्थेकरितां ब्राह्मणांची योजना करून, त्या प्रांतांतील सर्व लोकांना अद्वैतमार्गी करून आपले शिष्य केलें. चवसष्टावे प्रकरणांत कामाक्षीची स्थाप-

---

१ शृंगेरि २ मठ.

ना करून तेथील राजाकडून उत्तम देवालय बांधविलें. पांसष्ट प्रकरणीं तेथेंच श्रीचक्राची स्थापना केली. सहासष्ट प्रकरणांत सर्व शिष्यांनीं मोक्षमार्ग सांगण्याविषयीं प्रार्थना केल्यावरून सर्वांस मोक्षमार्ग सांगितला. सदसष्टाव्यांत शिवाची पूजा करण्याविषयीं सांगितलें परंतु अद्वैत मार्गानें व लिंगादि चिन्हें धारण न करितां उपासना करावी असें स्थापित केलें. अडसष्टाव्यांत त्याचप्रमाणें वैष्णवमत स्थापलें. एकुणसत्तरांत सौरमत. सत्तरांत शक्तिमत, एकाहत्तरांत गाणपत्यमत, बाहत्तरांत कापिलमत, त्र्याहात्तरांत सर्वांनीं परमगुरु श्रीशंकराचार्यांची स्तुति केली; ती वर्णिली आहे. चवऱ्याहत्तराव्यांत, आचार्यांची समाधी कांची नगरींत होऊन शिष्यांनीं तेथें समाधि करून पुढें त्यांचें पूजन वगैरे अद्याप पर्यंत चालत आहे. नंतर आनंदगिरींनीं गुरूची स्तुति करून ग्रंथ समाप्ति केली आहे.

---

## शंकरविजयविलास.

**शंकरविजयविलास** ह्मणून बत्तीस अध्यायांचा असा एक **आचार्य**चरिताबद्दल ग्रंथ आहे. त्यांतील वर्णन व विद्यारण्यकृत शंकरविजयांतील वर्णन हें तात्पर्यानें बहुधा एकच आहे तथापि क्वचित् टिकाणीं वर्णन करितांना वर्णन कर्त्याच्या ज्ञानाप्रमाणें फेर येतो तसा स्थलविशेषीं आला आहे तो समजण्याकरितां शंकरविजयविलासामध्यें काय काय वर्णन केलें आहे तें संक्षेपानें त्या ग्रंथांतील प्रथम अध्यायांत **श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्चिद्विलासयतींद्रस्वामी** व त्यांचे शिष्य **विज्ञानकंदतपोधनेन्द्र** यांचे संवादरूपानें आहे. तें येथें दिलें असतां या ग्रंथांतील तात्पर्य समजेल.

**शंकराचार्यचरितं भक्तितः पठ्यते त्वया ।**
**पवित्रं तच्चरित्रं तु श्रोतुं मेऽस्ति कुतूहलम् ॥**

अन्तेवासिनि मय्येवा अनुकंपा तवास्तिचेत् ।
कलितापोपशमनं स्मृतिमात्रेण धीमताम् ॥
तत्त्वज्ञानप्रदमिति बहुशः कथितं पुरा ।
आविर्भावं समारभ्य सद्वृत्तान्तमशेषतः ॥
जगतीमवितुं जेतुं दुर्मतान्यखिलान्यपि ।
शंभोः कृतावतारस्य शंकराचार्यसंज्ञया ॥
चिद्विलासयतिश्रेष्ठ शिष्यहृन्मोहभास्कर ।
कथयाद्य कलावासस्तमिंदुरिव भूतले ॥
अन्तेवासीप्रियो यस्माच्छ्रीगुरावतिभक्तिमान् ।

श्रीचिद्विलास उवाच ॥

साधुपृष्टं त्वया प्राज्ञ गुरुभक्तिकृतादर ।
सहस्रास्योऽपि तद्वक्तुं लिखितुं वा दिवाकरः ॥
न शक्नोति किमेकास्यो ब्रूयां विस्तरतः कथाम् ।
प्रश्नेनानेन तुष्टोस्मि यच्छ्रुतं मद्गुरोर्मुखात् ॥
तत्ते प्रियाय शिष्याय वक्ष्यामि शृणु सादरम् ।
भगवत्पूज्यपादानामाविर्भावं सतां हितम् ॥
कृतोपनीते पञ्चाब्दे सर्वविद्यासमागमः ।
मकरग्रहकालीनसंन्यासाश्रमसंभवः ॥
बदर्यागमनं पश्चाद्गोविंदभगवद्गुरोः ।
क्रमसंन्यासलाभश्च व्याससूत्रार्थनिर्णयः ॥
स्वीयं भाष्यं बोधयितुं सच्छिष्याणां परिग्रहः ।
स्नातुं सुरतटिन्याश्च पापहारिणि वारिणि ॥
शिष्यैः सहैव गमनं स्वीयभाष्यार्थचिंतकैः ।
पुण्यश्रेण्यां त्रिवेण्यां च भूयः स्नात्वा निवेशनम् ॥
पूजयित्वा च विश्वेशं पशुपाशविमोचकम् ।
पाराशर्येण सल्लाभः सहैवांभोजजन्मना ॥

प्रचारणाय भाष्यस्य सर्वत्र जगतीतले ।
तदर्थश्रुतितुष्टाभ्यां ताभ्यामायुर्विवर्धनम् ॥
युधांनिधनगर्यां च भट्टाचार्यस्य दर्शनम् ।
काश्मीरदेशे मच्छिष्यो वेदवेदांगपारगः ॥
यद्वीथिका गृहद्वाराकूजत्कीरव्रजैरपि ।
वाङ्मुखं संमुखीनैर्यैः क्रियते शास्त्रसंततेः ॥
यदंगनाभवत्साक्षाद्गिरांदेवी पुरा किल ।
दुर्वासमुनिना शप्ता किंचित्कारणवैभवात् ॥
विवाद्य तेन शास्त्रेषु यदि शक्नोषि तं जय ।
इत्थं निशम्य तद्वाक्यं भट्टाचार्यविपश्चितः ॥
शिष्यैः सार्कं तत्र गत्वा जित्वा मंडनमिश्रकम् ।
तद्धर्मदारां निर्जेतुं कायांतरनिवेशनम् ॥
कलाशास्त्रपरिज्ञानं स्वशिष्यपरिबोधनात् ।
कोटरस्थापितं देहं गत्वा दृष्ट्वा स देशिकः ॥
चितावारोपिते देहे प्रविश्य परितापिनि ।
साक्षात्कृतिर्नृसिंहस्य स्तोत्रेणानेन तुष्यतः ॥
ततो वाणिं विनिर्जित्य तयासार्कं जगद्गुरोः ।
श्रीमच्छृंगपुराभ्यर्णगमनं शिष्यसंयुतम् ॥
विभांडकमुनेर्यत्र भासते दिव्यमाश्रमम् ।
तुङ्गभद्रातरङ्गौघवारिताशेषकल्मषम् ॥
मलहानिकरो नाम देवो यत्र विराजिते ।
देव्याः संस्थापनं तत्र निगमोक्तविधानतः ॥
निर्माय श्रीमठं तत्र विशालं सुविनिर्मलम् ।
देशिकेन्द्रः सुरेशाख्यं नानाविद्याविशारदम् ॥
शिष्यं संस्थाप्य तत्रैकं काञ्चीनगरमाविशत् ।
तत्र निर्माय नगरीं श्रीचक्रं स्थाप्य शास्त्रतः ॥

कामाक्षीमपि संस्थाप्य दुर्मतानां निबर्हणम् ।
सर्वज्ञपीठसंस्थानं विजित्य द्वैतवादिनः ॥
ततश्चिदम्बरक्षेत्रं गमनं देशिकेशितुः ।
तत्राश्रितानां विप्राणां सौराणां मतखण्डनम् ॥
सेतुस्नानं समुद्दिश्य शिष्यैः सह गतिर्गुरोः ।
तत्रैडभैरवीयाणां खंडनं दुर्मतस्य च ॥
ततः क्रमाद्वक्रतुण्डपुरीं प्राप जगद्गुरुः ।
गाणपतं मतं तत्र खण्डयित्वा सभामुखे ।
अनंतशयनं गत्वा खण्डयन्वैष्णवं मतम् ।
अवाप वासुकिक्षेत्रं कुमारो यत्र विद्यते ॥
स्नात्वा कुमारधारायां तरङ्गिण्यां स तापसः ।
सुब्रह्मण्यं समभ्यर्च्य सर्वरोगभयापहम् ॥
ततो मृडपुरीं लब्ध्वा बौद्धध्वांतनिबर्हणम् ।
ततो गोकर्णगमनं द्रष्टुं देवं महाबलम् ॥
स्नात्वा रत्नाकरे भूयः कोटितीर्थनिषेवणम् ।
महाबलेशमभ्यर्च्य लब्ध्वानुज्ञां महेश्वरात् ॥
जगन्नाथस्य गमनं पुण्यक्षेत्रे तु तत्परम् ।
अन्तेवासिनिवासार्थं विनिर्माय मठं पुनः ॥
तत्र छात्रं प्रतिष्ठाप्य परिज्ञाताखिलागमम् ।
ततश्चोज्जयिनीं प्राप्य नगरीं देशिको गुरुः ॥
शाक्तानामतिदृप्तानां तन्मतस्य च खण्डनम् ॥
द्वारकागमनं पश्चात्तत्रैकं मठनिर्मितम् ॥
तत्र शिष्यं प्रतिष्ठाप्य देशिकेन्द्रो मुदान्वितः ।
मायापुरीं समासाद्य षण्मतस्थापनं ततः ॥
बदर्यागमनं पश्चात्तत्रैको मठनिर्मितः ।
तोटकाचार्यनामानं शिष्यं संस्थाप्य यत्नतः ॥

तत्रैव सुचिरं स्थित्वा दत्तात्रेयस्य दर्शनं ।
भाष्यार्थबोधतुष्टस्य विष्णोः साक्षात्कृतिस्ततः ॥
दत्तात्रेयगुहाद्वारात्कैलासगमनं गुरोः ।
एतत्सर्वं समासेन वक्ष्यामि शृणु निश्चल ॥

**अर्थ**—साधूंच्या हिताकरितां आचार्यांचें जन्म झालें; व पुढें पांचवे वर्षी त्यांचें उपनयन झालें; तेव्हां त्यांना सर्वविद्या अवगत झाल्या. नंतर नदीमध्यें स्नानाकरितां गेले असतां मगरानें धरलें त्यामुळें संन्यासग्रहणाला आईची परवानगी मिळाली. नंतर **बदरी** वनांत जाऊन **गोविंदभगवत्पादपूज्य** यांना गुरु करून त्यांपासून संन्यासदीक्षा घेतली; नंतर **व्याससूत्रावर** भाष्य केलें; तें सांगण्याकरितां शिष्यांचा संग्रह केला, नंतर त्या शिष्यांसह भागीरथीचें स्नान करण्याकरितां **काशीला** गेले; तेथें **श्रीविश्वनाथाची** पूजा करून कांहीं दिवस वास केला; तेथें **व्यासदर्शन** झालें; व ब्रह्मदेव यांचेंही दर्शन झालें; तेव्हां भाष्याचा प्रसार होण्याकरितां व वेदमार्ग चांगला चालण्याकरितां त्या दोघांनीं आचार्यांचें सोळावर्षांचें बत्तीस वर्षें आयुष्य केलें. पुढें भट्टपादांचें दर्शन व मंडणमिश्राशीं वाद झाला; व मंडणमिश्राची स्त्री जी सरस्वती तिशीं वाद झाला; त्यांत तिला जिंकण्याकरितां देहांतर केलें; नंतर शिष्यांनीं सूचना करितांच तो देह टाकून आपल्या देहांत प्रवेश करण्याकरितां आले, तों तो देह चितेवर आहे असें पाहून त्या आपल्या देहांत प्रवेश करून नृसिंहाचा स्तव केला; तेव्हां **नृसिंह प्रकट** होऊन त्या संकटापासून त्यांस मुक्त केलें. नंतर सरस्वतीला जिंकून **शृंगपुराला**[१] गेले; तेथें **विभांडकमुनीचा** आश्रम **तुंगभद्रेच्या** कांठीं आहे, व **मलहानिकर** देव ज्या ठिकाणीं आहे; तेथें देवीचें स्थापन करून एक

---

१ शृंगेरी.

मोठा मठ स्थापन केला; आणि त्यांत मुख्यशिष्य जे **सुरेश्वराचार्य**[1] त्यांची स्थापना करून **कांची** नगरीं गेले. तेथें उत्तम मंदिर करून यथाशास्त्र **श्रीचक्राची** स्थापना केली; व **कामाक्षीची**-ही स्थापना केली; व तेथील दुर्मत्यांना जिंकून **सर्वज्ञपीठावर** आरोहण करून द्वैतमत्यांना जिंकलें; पुढें **चिदंबरक्षेत्रीं** जाऊन **सौरमत खण्डण** केलें. तेथून **रामेश्वरीं** शिष्यांसह जाऊन तेथें स्नान करून **श्रीरामेश्वराचें** पूजन करून **भैरवमताचें** खण्डण केलें. तेथून फिरत फिरत **वक्रतुंडपुरीला** गेले; तेथें सभेमध्यें **गाणपत्यमताचें** खण्डण केलें. नंतर **अनंतशयनक्षेत्रीं** जाऊन **वैष्णवमताचें** खण्डण केलें. नंतर ज्या ठिकाणीं **कार्तिकस्वामी** वास करितात असें जें **वासुकिक्षेत्र** तेथें जाऊन **कुमारधारा** नदीचें स्नान करून सर्वरोग व भयाचा नाश करणारा जो **सुब्रह्मण्य** त्याची पूजा करून **मृडपुरीला** गेले, तेथें **बौद्धमताचें** खण्डन करून **श्रीगोकर्णक्षेत्रीं** आले. तेथें समुद्रस्नान करून **श्रीमहाबलेश्वराचें** पूजन करून शिवाय तेथील **कोटितीर्थाचें** स्नान करून **श्रीमहाबलेश्वराची** आज्ञा घेऊन **पूर्वसमुद्रीं श्रीजगन्नाथ** क्षेत्राला गेले, तेथें एक मठ स्थापन करून त्याठिकाणीं अखिल वेदातें जाणता अशा शिष्याची स्थापना करून तेथून **उज्जयिनीला** आले. तेथें **शाक्तमताचें** खण्डन करून पश्चिम समुद्रीं **द्वारकाक्षेत्राला** आले; तेथें एक मठ करून एका शिष्याला तेथें ठेवून नंतर **मायापुरीला** गेले; तेथें **षट्मतांचें**[2] स्थापन करून तेथून **बदरिकाश्रमीं** जाऊन तेथें **त्रोटकाचार्य** या नामेंकरून शिष्याची स्थापना केली; आणि तेथेंच बहुतदिवस वास केला. तेथें श्रीदत्तात्रेयाचें व भाष्यार्थ

---

१ मंडनमिश्र यांचें संन्यास घेतल्यानंतरचें नांव. २ शिव, विष्णु, गणपति, सूर्य, व देवी, हीं पांच व अद्वैत मिळून सहा.

बोधानें संतुष्ट झालेल्या विष्णूचें दर्शन होऊन, **दत्तात्रेय**गुहेंतून **श्रीदत्तात्रेयाचें** दर्शन होऊन **आचार्य** पुढें कैलासास गेले.

याप्रमाणें ग्रंथांतील सारांश आहे. आतां हें पुस्तक एकच मिळाल्यामुळें जसा ग्रंथ आहे तसाच लिहिला आहे. हा ग्रंथ फार अशुद्ध आहे, शिवाय याचा कर्ता कोण हें समजत नाहीं. एकंदरींत ह्या ग्रंथांत **आचार्यांचे** लीलेपैकीं ठोकळ गोष्टी आहेत. ह्यांत बत्तीस अध्याय आहेत. श्लोक बहुधा अनुष्टुप् असून प्रत्येक अध्यायाचे शेवटीं दोन अगर तीन असे मोठ्या वृत्ताचे श्लोक आहेत. हा ग्रंथ कैलासवासी **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक** ह्यांच्या पुस्तकसंग्रहांत सांपडला. दुसऱ्या प्रतिबद्दल शोध केला, परंतु कोठें आढळत नाहीं; विस्तरेण अलम्.॥

**समाप्त.**

# प्राकृत पुस्तकें.

याज्ञवल्क्यस्मृति व्यवहाराध्याय प्राकृत भाषान्तरसहित–मूलश्लोक मिताक्षरा टीका आणि दोहोंचीं निरनिराळीं भाषान्तरें. किं. रु. ६ ट. ६ आणे.

श्रीमद्भगवद्गीता.– भाषाविवृति–मराठी भाषांतर–सहित. तृतीयावृत्ति. किं. रु. ४ ट. ५ आणे.

बाणकादंबरी.– भाग पहिला, गोडबोलेकृत. किं. ११॥ आणे ट. १॥. आ.

भाग दुसरा, गुर्जरकृत. किं. १४ आ. ट. १ आ.

उदारदामोदरनाटक.– किं. रु. १। ट. १ आ.

# सार्थ सत्यनारायणकथा पूजासहित.

उत्तम टाइपांनीं सुशोभित छापलेली पोथी. किं. ६ आणे. ट. १ आणा.

श्रियाळचरित्र.–हें नवीन गद्यरूप. किं. १॥ आणा. ट. ०॥. आणा.

गद्यरत्नमाला.–ह्यांत निबंध ५१ आहेत. किं. १० आ. ट. १॥ आ.

ध्रुवचरित्र.–नवीन गद्यरूप. किं. २ आणे. ट. ०॥. आ.

सीतामंदोदरीभेट.– हेंही नवीन गद्यरूप. किं. १ आ. ट. ०॥. आ.

**सीतास्वयंवर.**– नवीन गद्य आणि पद्यरूप. किं. ३॥ आ. ट. १ आ.

**सार्थशिवगिता.**– अध्याय १८ रेशमी बुक्. किं. १ रु. ट. २ आ.

**सार्थगणेशगीता.**– रेशमी बुक्. किं. १२ आ. ट. १ आणा.

**सार्थरामगीता.**– मूलश्लोक, संस्कृत टीका, वामनी समश्लोकी आणि मराठी भाषांतर. किं. ८ आणे. ट. १ आ.

**लघुयोगवासिष्ठसार.**– मूलश्लोक सं. टीका आणि मराठी भाषांतर. किं. १२ आ. ट. १ आ.

**चंद्रहासचरित्र.**–बोधपर व मनोरंजक. किं. ३॥ आ. ट. ०॥· आणा.

**यशोदानंदशांतवन.**– किं. २॥ आ. ट. ०॥· आ.

**नौकानयनाचाइतिहास.**– आवृत्ति दुसरी. किं. ६ आ. ट. १ आ.

**मुंबईचावृत्तांत.**– प्राचीन व अर्वाचीन वर्णन व नकाशे ह्यांसह. हें पुस्तक वाचल्यानें मुंबई शहराची सर्व माहिती मिळेल. किं. २ रु. ट. ३ आणे.

**क्याटलाग.**– अर्धा आणा पोस्टेज पाठविला कीं फुकट मिळतो.

**व्हाल्युपेएबलनें पुस्तकें पाठवितों.**